# मॉडर्न

८२-८३

modern

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न महाविद्यालय, पुणे ४११ ००५.

# मॉडर्न

## १९८२-८३

**वर्ष तेरावे, अंक तेरावा**

◊ ◊ ◊

**संपादक :**

भीमराव कुलकर्णी

◊ ◊ ◊

**संपादन-समिती :**

प्राचार्य स. य. गंभीर
उप-प्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ
उप-प्राचार्य सीताराम रायकर
उप-प्राचार्य प. स. चिरपुटकर
प्रा. अ. ग. गोसावी
प्रा. यशवंत सुमंत
प्रा. अनिल दांडेकर
कु. सुरेखा परब

◊ ◊ ◊

**विद्यार्थि-प्रतिनिधी**

अजय वेदपाठक

....जे गरीब लोक उपासमारीने मरत होते. त्यांना मी कसा वाचवू शकेन याची मला कित्येक वर्षे चिंता लागून राहिली होती. ज्या भूमीच्या पोटी आपण जन्मलो तिच्याच पोटी ही लेकरे झाली ! त्यांनी अन्नावाचून उपाशी मरावे आणि आपण कुत्र्याप्रमाणे पोट भरीत रहावे हे मला पाहवले नाही आणि म्हणून ब्रिटिश सरकारविरुद्ध मी सशस्त्र बंड पुकारले.....

....अहो, माझे देशबांधव हो, तुमच्या कल्याणासाठी मी माझा देह खर्ची घालीत आहे. यात मी काहीसुद्धा पुरुषार्थ केलेला नाही. दधीची ऋषींनी आपल्या अस्थीही नाही का देवाच्या कल्याणासाठी आपल्या हातांनी काढून दिल्या ? तसेच ईश्वराने माझे प्राण घ्यावे पण तुम्हा सर्वांना सुखी करावे अशी मी उभय कर जोडून प्रार्थना करतो..

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या आत्मचरित्रातून—

क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, मृत्युशताब्दी —( मृत्यु १७ फेब्रुवारी १८८३ )

श्रुति नि श्रौत ( संस्कृती ) त्या काळच्या जगात त्यांच्या शत्रूशी लढताना दिग्विजय गाजवू शकली म्हणून आजच्या विज्ञानयुगातही तसा टिकाव धरू शकतील ही आशा व्यर्थ आहे....

महाभारतातील गांडीव धनुष्य भंगले ! आता मशीनगन्सशी गाठ आहे. जर हे सांगितल्याने स्वतःच्या प्रौढीच्या पोकळ वल्गना करीत रहाणाऱ्या आमच्या ‘बाबा वाक्यं प्रमाणं’ प्रवृत्तीचे अवसान खचले, तेजोभंग झाला तर त्यातच राष्ट्राचे हित आहे.

**—स्वातंत्र्यवीर सावरकर**

सावरकर जन्मशताब्दी – ( मे १९८३ )


मुखपृष्ठ : राजीव कुलकर्णी

प्रकाशक : प्रा. स. य. गंभीर, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५.

मुद्रक : सा. रा. भंडारी, भंडारी मुद्रणालय, २७१ नारायण पेठ, पुणे ३०.

ठसे व मुखपृष्ठ छपाई : श्री. जंगम, ‘त्रिमूर्ति एन्टरप्रायजेस’, शुक्रवार पेठ, पुणे २.

# संपादकीय

' मॉडर्न 'ला यंदा तेरा वर्षे पूर्ण झाली.

महाविद्यालयाच्या इतिहासाचे आणखी एक पान उलटले.

वाढता अनुभव, वाढता आत्मविश्वास, वाढते प्रश्न व वाढत्या जबाबदाऱ्या...

महाविद्यालयाच्या वर्षभराच्या वाढत्या स्थितिगतीचा आलेख रेखाटणारे हे तेरावे वार्षिक...ते सादर करताना साहजिकच आनंद होत आहे.

## शिक्षणाचे खरे उद्दिष्ट व सद्यःस्थिती

शिक्षण कशासाठी ? त्याची उद्दिष्टे कोणती ? त्याचे अंतिम पर्यवसान काय ? असे प्रश्न नेहमी विचारले जातात आणि त्यासंबंधाने कधीही न संपणारी चर्चा चालूच असते. तिच्यातून कधीमधी नव्या वाटा, नवी वळणे दिसून येतात. परंतु शिक्षणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर केवळ नव्या वाटा चोखाळणे, नवे नवे प्रयोग करीत राहणे नेहमीच इष्ट ठरत नाही. परंपरा आणि नवता यांच्या कुशल नियोजनातून राजरस्त्यांची मांडणी करावी लागते. त्याखेरीज दुसरा पर्याय नसतो.

इंग्रजांनी त्यांच्या राज्यव्यवस्थेसाठी सामान्य पातळीवर नोकरशाहीचे जाळे विणले आणि त्या धोरणाने व्यावहारिक शिक्षणाची देशभर आखणी केली. ' नोकरीचे साधन ' हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट बनले. नोकरी–भाकरी–छोकरी अशी त्याची फलितं सुशिक्षितांना दिसून आली आणि राज्यकर्त्यांच्या फडावर कामे करणाऱ्या बुद्धिजीवी वर्गाला हा खांदेपालट म्हणजे एक सुखाची सोन्याची बेडी ठरली. परंतु जगामध्ये अल्पावधीतच आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या प्रगतीची बिजेही याच शिक्षणात लपलेली होती. ती काही विचारी सुशिक्षितांच्या मनोभूमिकेत रुजली आणि त्यामुळेच लोकशाही परंपरेचा एक अनोखा वटवृक्ष डौलात उभा राहिला. औद्योगीकरण, विज्ञाननिष्ठा, तंत्रज्ञान इ. प्रचंड शाखा या वटवृक्षाला फुटल्या आणि बेकारी, दारिद्र्य, बकाल शहरे, झोपडपट्ट्या इ. त्याच्या पारंब्यांनी मूळ शाखाविस्तारापेक्षाही अधिक जागा व्यापली.

या स्थित्यंतरात आमचे शिक्षण मात्र नोकरी–भाकरीच्या उद्दिष्टाभोवती गच्च वेटाळून उभे राहिले.

या वेटोळ्यातून त्याची कशी सुटका करावी हाच खरा यक्षप्रश्न आहे. शहाणे लोक महाभारतकर्त्याप्रमाणे बाहू उंच उभारून ( उर्ध्वबाहूविरोन्मेष ) आक्रोश करीत आहोत की, जीवन आणि शिक्षण याची फारकत झाली आहे. आंधळेपणामुळे चालू असलेल्या या साचेबंद शिक्षणपद्धतीमुळे स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याची आपली शक्तीच क्षीण झाली आहे. शिक्षणव्यवस्थेच्या प्रचंड चक्रातून ठरीव साच्याची आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त न झालेली मनेच बाहेर पडताहेत. सुरक्षिततेच्या हव्यासाने ती पछाडली गेली आहेत आणि ती मिळत नाही म्हटले की ती निराशेने ग्रस्त झाली आहेत. केवळ लौकिक प्रतिष्ठा हेच त्यांचे ध्येय बनले आहे. या सुरक्षिततेच्या हव्यासाने मनाची सहजावस्था हरवली गेली आहे आणि भीतीने मने झाकोळून गेली आहेत. जीवनाचा अर्थ शोधण्याची प्रेरणा त्यामुळे संपुष्टात आली आहे आणि माणसे असहाय्य, यंत्रवत झाली आहेत. एका नव्या दैववादाच्या फेऱ्यात सापडल्यागत झाले आहे.

शिक्षण म्हणजे माहितीचा संचय, शिक्षण म्हणजे तांत्रिक कुशलता, शिक्षण म्हणजे सुखासीनता मिळविण्यासाठी प्राप्त करून घेतलेली पुस्तकी कार्यक्षमता,

आणि हे सारेच परीक्षा आणि पदव्या यांच्या फुटपट्ट्यांच्या साहाय्याने मोजले जाणारे. अलीकडे शिक्षण म्हणजे मर्यादित विषयात तज्ज्ञ तयार करणे, असे एक नवे समीकरण बनत आहे. या मर्यादित विषयात गती असलेल्या लोकांच्या हाती आपले अमर्याद जीवन देऊन टाकणे म्हणजे एका आंधळ्याने दुसऱ्या आंधळ्याला वाट दाखविण्यासारखा प्रकार आहे!

मोठ्या पगाराची सुखासीन नोकरी मिळविणे, मोठ्या प्रतिष्ठेचे धनी होणे, आपल्या सत्तेचे, अधिकाराचे क्षेत्र वाढविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे का?

नाही, त्रिवार नाही.

प्रेम करू शकणारे, दुसऱ्यांना जाणणारे, माणुसकीची जाण असणारे, निर्भयता आणि लीनता यांनी अवतीभवतीच्या जगाकडे पाहणारे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे स्त्री-पुरुष निर्माण करणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट!

परंतु शहाण्या माणसांचा हा आक्रोश कोणाच्याच कर्णपटलावर आदळत नाही. (नच कश्चित शृणोति माम्) लोकांच्या कानावर हा आक्रोश गेला पाहिजे. आज ना उद्या तो जाईल, सत्कारणी लागेल, यात शंका नाही.

सध्या तरी आखून दिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे हाती आलेल्या विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम काळजीपूर्वक पुरा करून घेणे आणि त्याचबरोबर अभ्यासेतर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना भाग घेण्यास प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील नेतृत्व, सहकार्य आणि कला-गुणांना वाव देणे या मार्गाने शिक्षणाचे उद्दिष्ट आपल्या कुवती-प्रमाणे पार पाडणे हे आमचे कर्तव्य आहे, आणि ते चांगल्या प्रकारे आम्ही पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत.

## सत्रपद्धतीचा पुनर्विचार व्हावा!

तो प्रयत्न करीत असताना विद्यापीठाने स्वीकारलेल्या सत्रपद्धतीमुळे, परीक्षा, चाचण्या, पुनर्परीक्षा, पुनर्चाचण्या अशा चक्रात शिक्षणव्यवस्था सापडल्यासारखी झाली आहे आणि त्यामुळे मिळणाऱ्या यशाची धार बोथट बनली आहे. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुणांवरून त्यांच्या क्षमतेचा अंदाज बांधणे कठीण व्हावे, अशी अवस्था झाली आहे. शिक्षणाच्या यंत्रातून बाहेर पडणारा अशा प्रकारचा माल सर्व कसोट्यांतून उतरल्यामुळे अतिशय गुणवत्तेचा आणि अव्वल दर्जाचा आहे, अशी खात्री देणे आज कठीण होऊन बसले आहे. पुणे विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी भाषण करताना केंद्रिय मंत्री श्री. विठ्ठलराव गाडगीळ यांनी, विद्यापीठे आणि शिक्षणसंस्था हे प्रचंड कारखाने बनत आहेत आणि शिक्षणाचा कस कमी झाला आहे, या संबंधाने व्यक्तविलेली खंत अंतर्मुख करणारी आहे. शिवाजी विद्यापीठाने सत्रपद्धतीचा त्याग करण्याचा दृष्टीने पावले टाकावयास सुरुवात केली आहे. पुणे विद्यापीठाने या सत्रपद्धतीचे पुनर्मूल्यांकन करून समाजोपयोगी भूमिका घेण्यास कचरता कामा असे, असे आम्हास वाटते.

## साऱ्या आघाड्यांवर अग्रेसर

'मॉडर्न'च्या उभारणी दिवसापासूनच 'एक अव्वल दर्जाचे महाविद्यालय' अशी त्याची ख्याती असल्यामुळे परीक्षांचे निकाल आणि परीक्षेतर कार्यक्रमां-तील गतिमानता सदैव अग्रेसर राहिली आहे. यंदाच्या वर्षी 'मॉडर्न'च्या तीन विद्यार्थ्यांना 'शिवछत्रपती पुरस्कार' मिळाला. यांसारखे आणि यांपेक्षाही

महत्त्वाचे क्रीडाक्षेत्रातील अत्युच्च सन्मान मॉडर्नने वेळोवेळी मिळविली आहेत. राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांसाठी निवड आणि त्यामध्ये सर्वोच्च यशही आमच्या विद्यार्थ्यांनी सतत मिळविले आहे. अहवाल विभागांवरून क्रीडा, कला व इतर क्षेत्रांतील वाढत्या यशाचे चित्र लक्षात येण्यासारखे आहे.

या सर्व गुणी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.

## प्राध्यापकांचे सुयश

आमच्या महाविद्यालयातील डॉ. अशोक पाथरे ( अर्थशास्त्र ) आणि डॉ. हेमंत घाटे ( प्राणिशास्त्र ) यांना पुणे विद्यापीठाने, यंदा त्यांनी सादर केलेल्या प्रबंधांसाठी पीएच्. डी. पदवी दिली.

डॉ. पाथरे यांनी ' शेतीव्यवसायातील आर्थिक बचतीचा अभ्यास ' या विषयावर डॉ. मुतालिक-देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून प्रबंध सादर केला होता, तर डॉ. घाटे यांनी ' गोड्या पाण्यातील प्राणिजीवनावर औद्योगिक प्रदूषणाचे परिणाम ' या विषयावर डॉ. लीला मुल्हेरकर–गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून प्रबंध सादर केला होता. डॉ. घाटे यांना ' Hazards of environmental Pollution ' या विषयावर पीएच्. डी. पदव्युत्तर संशोधनासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

प्रा. यशवंत वाघमारे (वाणिज्य) चार्टर्ड अकाऊंटंटची अंतिम परीक्षा चांगल्या रीतीने उत्तीर्ण झाले.

प्रा. वाल्मीक अहिरराव आणि कु. नयना कारखानीस हे भूगोल विषयातील शिक्षक एम्. फिल्.ची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले.

डॉ. दत्तात्रय दिनकर पुंडे ( मराठी ) यांना ' वि. वा. शिरवाडकर : एक चिकित्सक अभ्यास ' हा प्रबंध १९८०–८१ सालातील मराठीतील सर्वोत्कृष्ट प्रबंध गणला जाऊन त्यांना ' डॉ. य. वि. परांजपे ' व ' डॉ. वि. रा. करंदीकर ' अशी पुणे विद्यापीठाची दोन पारितोषिके मिळाली.

प्रा. प्रमोद द. पारखी यांची महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातर्फे धुळे येथील ' महाराष्ट्र व्हेजिटेबल प्रॉडक्टस लि. ' या कंपनीवर संचालक म्हणून नियुक्ती झाली आणि ' मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज 'च्या कार्यकारी समितीवर त्यांना सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्यात आले.

डॉ. वि. भा. देशपांडे (मराठी) यांना अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे प्रा. वसंत कानेटकर पुरस्कृत 'वि. स. खांडेकर नाट्यसमीक्षा' पारितोषिक मिळाले.

सौ. निर्मला मोने (मराठी) यांची महाराष्ट्र राज्य पुरस्कृत ' दक्षता ' या नियतकालिकावर व पाठ्यपुस्तकनिर्मिती मंडळावर सल्लागार म्हणून नियुक्ती झाली.

प्रा. प. स. चिरपुटकर ( संख्याशास्त्र ), प्रा. सीताराम रायकर ( इंग्रजी ), प्रा. म. आ. कुलकर्णी (इतिहास) आणि डॉ. अ. के. पांडे (वनस्पतिशास्त्र) यांची प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सदस्यपदी नियुक्ती झाली आहे.

या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

## दुःखद निधन

महाविद्यालयामध्ये गेली नऊ वर्षे रखवालदार म्हणून काम करीत असलेले बी. ए. गवळी यांचे रविवार दि. २७ मार्च १९८३ रोजी आकस्मिक दुःखद निधन झाले. महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उभ्या केलेल्या निधीतून त्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याची योजना कार्यान्वित होत आहे.

## नवीन नेमणुका

यंदाच्या वर्षी खालील नवीन नेमणुका करण्यात आल्या. त्यांचे स्वागत.

| | |
|---|---|
| श्रीमती लता बडे | अर्धवेळ व्याख्यात्या |
| | (मर्कन्टाईल व इंडस्ट्रीयल लॉ) |
| श्री. थॉमस इप्पन | व्याख्यात्या (संख्याशास्त्र) |
| सौ. संजीवनी रहाणे | व्याख्यात्या (कॉमर्स) |
| सौ. एम्. डी. जोशी | अर्धवेळ व्याख्यात्या (अर्थशास्त्र) |
| सौ. पी. एस. पिंगळे | व्याख्यात्या (गणित) |
| श्री. एस. के. उजळंबकर | व्याख्यात्या (केमिस्ट्री) |
| श्रीमती एल. आर. व्हीगस | अर्धवेळ व्याख्यात्या (भूगोल) |
| सौ. व्ही. ए. जोशी | अर्धवेळ व्याख्यात्या (फिजिक्स) |
| | (कनिष्ठ महाविद्यालय) |
| श्रीमती एल. बी. खतीब | अर्धवेळ व्याख्यात्या |
| | केमिस्ट्री (कनिष्ठ महाविद्यालय) |
| श्री. ए. ए. पेडगावकर | व्याख्याता गणित (कनिष्ठ महाविद्यालय) |
| श्री. व्ही. एम. रजपूत | व्याख्यात, कॉमर्स (कनिष्ठ महाविद्यालय) |
| श्री. एस. एस. आठवले | कनिष्ठ लिपिक |
| श्री. एस. एन. इनामदार | कनिष्ठ लिपिक |
| श्री. आर. पी. काळे | कनिष्ठ लिपिक |

### बी. एड्. परीक्षा उत्तीर्ण

कनिष्ठ महाविद्यालयातील खालील शिक्षक 'शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा' उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचे अभिनंदन.

| | |
|---|---|
| सौ. ज्योत्स्ना गोडबोले | (व्याख्यात्या, वनस्पतिशास्त्र) |
| सौ. रेखा आगाशे | ( ,, वाणिज्य) |
| सौ. सुमीता सेन | ( ,, मानसशास्त्र) |

### शुभेच्छा

महाविद्यालयातील खालील प्राध्यापक / सेवक अन्यत्र संधी मिळाल्याने वा अन्य कारणाने सेवामुक्त झाले आहेत. त्यांना त्यांच्या क्षेत्रात सुयश लाभो ही शुभेच्छा.

प्रा. प्रकाश मूळबागल (व्याख्याता गणित)

प्रा. पी. नारायण (अर्धवेळ व्याख्याता, मर्कटाईल अँड इंडस्ट्रीयल लॉ)


एस्. डी. वेळापुरे ( ,, ,, फिजिक्स, कनिष्ठ महाविद्यालय)

### ऋणनिर्देश

या अंकाच्या उभारणीच्या आणि निर्मितीच्या कामी प्राध्यापक, व्यवस्थापन-वर्ग आणि इतर अनेकांचे महत्त्वाचे साहाय्य झाले आहे. मुद्रकांनी आस्थेने व वेळेवर चांगल्या प्रकारे काम पुरे केले आहे. या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

**भीमराव कुलकर्णी**
संपादक

# अश्विन पुंडलीक आंतरमहाविद्यालयीन काव्यलेखनस्पर्धा



कै. अश्विन विद्याधर पुंडलीक

सुप्रसिद्ध मराठी कथालेखक डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा मुलगा कै. अश्विन पुंडलीक हा मॉडर्न महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात १९७६–७८ त शिकत होता. उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत ( १२ वीच्या परीक्षेत ) शे. ९२ टक्के गुण मिळवून तो उत्तीर्ण झाला होता. महाविद्यालयात असताना तो महाविद्यालयाच्या खो–खो संघाचा कप्तान होता. साहित्यात—विशेषतः कवितेत रमण्याची कै. अश्विनची प्रवृत्ती होती. गिर्यारोहण हाही अश्विनचा एक छंद होता. दि. ८ मार्च १९८० रोजी सिंहगडचा एक अवघड कडा चढून जाण्याच्या प्रयत्नात त्याचे दुर्दैवी अपघाती निधन झाले.

कै. अश्विनची कविताविषयक अभिरुची लक्षात घेऊन त्याच्या स्मरणार्थ त्याचे काका श्री. प्रभाकर पुंडलीक यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडे काही निधी सुपूर्त करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता काव्यलेखन-स्पर्धा आयोजित करण्याची विनंती केली. त्यानुसार १९८२–८३ या शैक्षणिक वर्षापासून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयातर्फे "अश्विन पुंडलीक आंतरमहाविद्यालयीन काव्यलेखनस्पर्धा" आयोजित करण्यात येत आहे.

१९८२–८३ या वर्षीच्या "अश्विन पुंडलीक आंतरमहाविद्यालयीन काव्यलेखनस्पर्धे"त नाशिक येथील एन्. बी. ठाकूर विधी महाविद्यालयातील श्री. नंदकिशोर शुक्ल यांच्या "मातीची कविता" या कवितेस सर्वोत्कृष्ट कवितेचे पारितोषिक देण्यात आलेले आहे.

## मातीची कविता

मातीत जन्म झाला, मातीत वाढलो मी
येईल त्या क्षणाला मातीच चारली मी
लावोत भस्म कोणी, अन् गंध चंदनाचे
माझ्या उभ्या कपाळी मातीच लावली मी
बांधो कुणी हवेल्या आकाश छेदणाऱ्या
माझा मला निवारा मातीत बांधला मी
लखलाभ हो तुम्हाला ही उब मंचकाची
रात्रीस पाठ माझी मातीत टेकली मी
मातीत जन्म झाला, मातीत वाढलो मी
येईल त्या क्षणाला मातीच चारली मी

—नंदकिशोर शुक्ल

# रक्तदान

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे, पुणे येथे दिनांक १८-९-१९८२ रोजी रोटरॅक्ट क्लब, पश्चिम विभाग पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान केलेल्या विद्यार्थ्यांची यादी :—

कु. वाकडे पद्मजा बी.
फुले पी. पी.
गांधी मनोज आर.
पाटील व्ही. पी.
चौधरी के. पी.
कु. देशपांडे चित्रा
,, ढवळे ज्योत्स्ना एस.
,, ओक शुभांगी एस.
सोनावणे ए. एम्.
महाडिक व्ही. एम्.
बोरावके जे. बी.
नेलेकर डी. आर.
कु. शिरोळे संगीता एस.
,, पानसरे एस. टी.
कुलकर्णी एम्. जी.
शिंदे एस. के.
कु. कशाळकर सुजाता व्ही.
,, दंडवते ए. डी.
गात एफ. पी.
डोमले बी. एम्.
कु. ठाकुरदेसाई अंजली
,, चौधरी आर. ए.
पिसाळ आर. सी.
कु. परांजपे वंदना एम्.
धोपेश्वरकर रेवती
धारणे व्ही. जी.
कु. बी. मीनाक्षी
चौधरी रवींद्र एच.
चव्हाण के. पी.
पतंगे सी. एन्.
काळभोर के. एन्.
कु. वोन्हाडे शकुंतला बी.
केळकर डी. एम्.
कांबळे व्ही. एस.
जैन एस. पी.
बडवे आर. ए.
कु. ठाकुरदेसाई वसुधा व्ही.
देशमुख उदय पी.

कु. गोवंडे वैजयंती व्ही.
भिष्णूरकर पी. डी.
शिंदे डी. एस.
बालसुब्रह्मण्यम् व्यंकटरमण
लाळे आर. के.
कुलकर्णी पी. डी.
लाळे आर. व्ही.
मेहता व्ही. आर.
कोंडे ए. जे.
तलाठी आर. जी.
ठाकूर व्ही. डब्ल्यू.
शिर्के एस. व्ही.
नानगरे पी. एम्.
कु. सातपुते रोहिणी
,, बोधे संगीता
कोल्हे ए. एस.
शेटे एस. बी.
गोगावले एस. बी.
किराड एस. एम्.
परुळेकर पी. पी.
कदम आर. के.
चौधरी पी. एस.
रणपिसे एस. व्ही.
तांबे एस. के.
कु. नागरेचा कीर्ती
,, कुलकर्णी विभावरी व्ही.
चौधरी एम्. एम्.
तुपे जी. व्ही.
आडसूळ व्ही. जे.
कु. वेडेकर राजश्री
,, बेलसरे सुनंदा सी.
,, सरेकर वृंदा डी.
दाभाडे नीतीन डी.
जैन संजय
कु. गायकवाड शीला एस.
,, करमरकर चारुलता एम्.
आगरवाल ए. टी.
कु. रोठे निशा

शेंडे दत्ता एस.
कु. दिवेकर स्वाती
,, सावंत संगीता व्ही.
गोखले मृदुला पी.
पद्मनाभी सी. के.
कु. माने सुनीता के.
,, शालीग्राम शर्मिला
वेदमणी एस. एम्.
मिसे एस. डी.
देशपांडे एन्. एच.
लवंडे वाय. बी.
शाह एस. एस.
शिंदे आर. एस.
कु. मिरजी सुलभा
,, पवार चंद्ररेखा
शेख सलीम एच.
बहिरट व्ही. के.
शितोळे एच. आर.
भिडे व्ही. सी.
पवार एम्. बी.
कु. कुलकर्णी सुषमा
,, जैन आनंदकुमार बी.
जैन एस. पी.
कु. जोगळेकर वंदना
,, जोशी किशोर एस.
देशपांडे एस. आर.
कु. प्रभुणे उषा ए.
निफाडकर अमोल पी.
बाळ यशोधन डी.
चिंचवडकर एस. एच.
धुमाळ डी. जी.
कु. अचुते मंजीरी एस.
रेळेकर प्रशांत
गवळी व्ही. डी.
कु. पाटील सीमा जे.
शाह सी. बी.
झेंडे ए. व्ही.
कु. भोपळे जयश्री टी.

# शिवछत्रपति–पुरस्कार विजेते



१. कु. मिथिला जबडे, २. कु. वसुश्रा तुमपल्लीवार, ३. श्री. अतुल वाकणकर
यांचा ' शिवछत्रपति पुरस्कारा 'बद्दल श्री. सुनील तांबे यांच्या हस्ते सत्कार

## ❋ क्रीडा नैपुण्य ❋



कु. सुजाता गांधी



कु. अलका दीक्षित



कु. योगिनी सरोदे

(पुणे विद्यापीठ हॉलीबॉल संघात निवड)



कु. रश्मी छत्रे
राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती



कु. भारती दाबके
खो खो : राष्ट्रीय खेळा



विवेक असनीकर
पुणे विद्यापीठ
खोखो सुवर्णपदक



शैलेश जोशी
अ. भा. ज्यूडो स्पर्धा
रौप्यपदक



राहूल जाधव
कुस्ती : आंतर महाविद्यालयीन
स्पर्धा रौप्यपदक




संजय दोरगे
राष्ट्रीय व्हॉलीबॉल
क्रीडापट्टू





कु. मांजरा नातू
खोखो : राष्ट्रीय खेळाडू


## ❋ क्रीडामंडळ व कलामंडळ प्रतिनिधी ❋



कु. सुषमा थिटे ( I.C.S.R. )
हँडबॉल : राष्ट्रीय खेळाडू



रवींद्र पिसाळ ( I.C.S.R. )
आंतरविद्यापीठ बॉल बॅडमिंटन


मुकुंद महाजन
विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी



यशोधन बाळ
मैदानीस्पर्धा व जलतरंग



राजेंद्र बडवे
व्हॉलीबॉल


राजू अगरवाल
ग्रंथालय



बाळू वाळुंज
मायनर गेम्स


शिरीष काथवटे
कुस्ती


मिलिंद पोटे
बास्केट बॉल


एम. जी. इनामदार
इंडियन गेम्स



हेमंत भट
फूटबॉल


सीताराम शिंदे
हॉकी


अजय वेदपाठक
नियतकालिक



विनायक रेणके
मायनर गेम्स


सुहास साठ्ये
कलामंडळ


बिपीन पाटोळे
मॉम


## आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल उपविजेता संघ

### ( वरिष्ठ महाविद्यालय )




बसलेले [ डावीकडून ] : १ ) श्री. पिसाळ [ कर्णधार ], २ ) प्रा. लागू , ३ ) डॉ. पाथरे, ४ ) प्रा. मुथा, ५ ) श्री. जाधव
उभे [ डावीकडून ] : सर्वश्री १ ) गोगावले, २ ) शिंगाडे, ३ ) भोसले, ४ ) रेणके, ५ ) लाटे.

## राष्ट्रीय सेवा योजना



बसलेले : १ ) प्रा. गोहेल, २ ) प्रा. दीक्षित, ३ ) उपप्राचार्य रायकर, ४ ) प्रा. वाणी [ कार्यक्रमाधिकारी ] ५ ) डॉ. पांडे
मागे [ उभे ] : १ ) कु. दुधाळे, २ ) श्री. मि. य. मनोहर, ३ ) श्री. वि. श्री. शिर्के, ४ ) कु. ढमढेरे

# क्रीडा–संघटना



वसलेले [ डावीकडून ] : १ ) कु. थिटे, ( I.C.S.R. ), २ ) प्रा. छाब्रा, ३ ) प्रा. सौ. नवाथे, ४ ) प्रा. लागू , ५ ) प्रा. मुथा,
६ ) उपप्राचार्य प्रा. चिरपुटकर, ७ ) उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ८ ) प्राचार्य गंभीर, ९ ) उपप्राचार्य प्रा. रायकर,
१० ) कार्याध्यक्ष डॉ. पाथरे, ११ ) प्रा. लाळे, १२ ) प्रा. बनसुडे, १३ ) श्री. शेरीकर, १४ ) पिसाळ ( I.C.S.R. )

उभे [ डावीकडून ] पहिली रांग : सर्वश्री १ ) बाळ, २ ) राठी, ३ ) रेळेकर, ४ ) रेणके, ५ ) वाळुंज, ६ ) काथवटे, ७ ) इनामदार, ८ ) शिंदे,
९ ) पिसाळ, १० ) गांधी, ११ ) चौधरी, १२ ) भोसले, १३ ) भट.

मागील रांग : सर्वश्री १ ) जाधव, २ ) पारा, ३ ) पवार, ४ ) नरवडे, ५ ) गुट्टे [ सेवक ]

**पुणे जिल्हा बास्केट बॉल आंतरशालेय उपविजेते**



बसलेले :

सर्वश्री १ ) गुंडकल, २ ) छाब्रा,
३ ) प्रा. बनसुडे, ४ ) शेरीकर

उभे :

सर्वश्री १ ) सावंत, २ ) दळवी
३ ) भट ४ ) सावर्डेकर



**राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू**

बसलेले : १ ) कु. भात्रे, २ ) श्री. छाब्रा,
३ ) प्रा. बनसुडे, ४ ) श्री. शेरीकर
५ ) कु. पाटील.

मागे उभे : सर्वश्री १ ) सावर्डेकर,
२ ) दळवी, ३ ) कदम
४ ) दोरगे, ५ ) भट

**पुणे जिल्हा व्हॉलीबॉल आंतरशालेय विजेता संघ :**



बसलेले :

सर्वश्री १ ) कदम, २ ) व्ही. के. छाब्रा,
३ ) प्रा. बनसोडे, ४ ) शेरीकर
५ ) दोरगे

उभे :

सर्वश्री १) श्री. कदम (शिपाई), २) भोरडे,
३) काडीलकर, ४) डांगे, ५) डांगे,
६ ) श्री. पवार [ शिपाई ]

# कलामंडळ



बसलेले : १ ) श्री. आर. व्ही. कुलकर्णी, २ ) सौ. लीना पाटणकर, ३ ) प्रा. गंधे,
[ डावीकडून ] ४ ) उपप्राचार्य प्रा. चिरपुटकर, ५ ) उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ६ ) प्राचार्य गंभीर,
७ ) उपप्राचार्य प्रा. रायकर, ८ ) श्री. मुकुंद महाजन, ९ ) प्रा. वि. भा. देशपांडे,
१०) प्रा. यशवंत सुमंत, ११ ) श्री. जे. पी. चिंचोरे
उभे : सर्वश्री १ ) आव्हाळे, २ ) शेख, ३ ) वेदपाठक, ४ ) जैन, ५ ) अगरवाल,
[ डावीकडून ] ६ ) पाटोळे, ७ ) देव, ८ ) दाढे, ९ ) साठे, १० ) भोसले.

## आंतरमहाविद्यालयीन १०० × ४ रिले विजेते
### वरिष्ठ महाविद्यालय ( मुली )



बसलेले : १ ) कु. थिटे ( I.C.S.R. ), २ ) कु. तुमपल्लीवार, ३ ) डॉ. पाथरे,
[ डावीकडून ] ४ ) प्रा. लागू , ५ ) बाळ, ६ ) पिसाळ ( I.C.S.R. ).
उभे [ डावीकडून ] : १ ) कु. जबडे, २ ) कु. अंबिके, ३ ) कु. गद्रे.

## संघनायक : शारीरिक शिक्षण विभाग ( वरिष्ठ आणि कनिष्ठ )



बसलेले :

सर्वश्री १. पिसाळ, २. प्रा. छाब्रा व्ही. के., ३. उपप्राचार्य प्रा. चिरपुटकर, ४. प्रा. लागू के. एस., ५. शेरीकर

उभे :

१. कु. चौधरी, २. कु. दुधाळे, ३. श्री. शेट्ये, ४. श्री. शिंदे, ५. श्री. देसाई, ६. श्री. कोल्हे, ७. श्री. नागरेचा, ८. कु. गंभीर, ९. कु. म्हसकर



वालचंद हिराचंद जन्मशताब्दी निबंधस्पर्धेत प्रथम पारितोषिक कु. सविता सबनीस, तृ. व. साहित्य मुंबईचे शेरीफ गोदरेज यांच्या हस्ते सत्कार.


## छात्रसेना प्राविण्य




उल्हास आयमाने
प्रजासत्ताकदिनसंचलनसहभाग



एम्. एच्. शेख
बेस्ट कॅडेट




जे. एम्. भोसले




अनिल हजारे

आर्मी अटॅचमेंट कॅंप


## प्राध्यापकांचे अभिनंदन



डॉ. अशोक पाथरे
अर्थशास्त्रात डॉक्टरेट



प्रा. यशवंत वाघमारे
सी. ए. अंतिम परीक्षा उत्तीर्ण



डॉ. हेमंत घाटे
प्राणिशास्त्रात डॉक्टरेट

## विशेष नैपुण्य



सौ. माधवी गंधे
T. Y. B. A. सर्वप्रथम



अविनाश बेल्हे
T. Y. B. Sc. सर्वप्रथम



मिलींद दाते
T. Y. B. Com. सर्वप्रथम




कु. विद्या गांधी
XII Com सर्वप्रथम



रणजित रासने
XII Sc. सर्वप्रथम



कु. सीमा पुंडले
विविध वक्तृत्व स्पर्धांत
पारितोषिके



विवेक दाढे
रोटरी क्लब : ' मि. पूना युनिव्हर्सिटी '
विजेतेपद



चद्रशेखर ढबू
T. Y. B. Com.
संख्याशास्त्रात विद्यापीठात
प्रथम व पारितोषिक

# शास्त्रसंग्राम

अनिल गोरे, तृतीय वर्ष–शास्त्र

भारतीय गुप्तहेर खात्याचा अग्रणी हेर श्रीनिवास, खात्याच्या प्रमुख कचेरीत पोचला. त्याने आणलेल्या बातमीने भारताच्या संरक्षण क्षेत्रामध्ये एकच हलकल्लोळ उडाला. हेरखात्याच्या प्रमुखांनी ती बातमी संरक्षण-मंत्र्यांना कळविली. थोड्याच वेळात संरक्षणमंत्रालय अधिकाऱ्यांनी गजबजून गेले. निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता होती. अर्ध्या तासात पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली संरक्षणमंत्री, संबंधित अधिकारी व तज्ज्ञ यांची बैठक भरली.

ती बातमीच तशी भयानक होती. दि. २१-११-१९९६ रोजी पहाटे ३ वाजता काश्मीरमधील कारगिल भागात न्यूट्रॉन बॉंबचा स्फोट करण्याचे पाकिस्तानने निश्चित केले होते. या स्फोटामुळे कारगिलपासून ३५ ते ४० मैल अंतरावरील सर्व सजीव मृत होणार होते. अत्यंत वेगाने प्रवास करणारे न्यूट्रॉन सजीवातील लाल पेशींचा नाश करणार होते. तसेच १०० मैलांच्या परिसरात किरणोत्सर्गी धूळ पसरणे व अपंगत्व येणे अशा प्रकारचे परिणाम होणार होते. किरणोत्सर्गी धुळीमुळे टी. बी., कॅन्सर असे रोग कालांतराने होणे शक्य होते.

या स्फोटामुळे होणारी जीवितहानी शक्यतो कमी करण्याची उपाययोजना वरील बैठकीत करण्यात आली. कारगिल व आसपासच्या प्रदेशातील सैन्य व नागरिकांना पर्वतांमधील खोल गुहांमध्ये हलविण्यास सुरुवात झाली. ज्या मोक्याच्या जागांवरील शिपायांना जागेवरून हलणे शक्य नव्हते, त्यांना वेगवान न्यूट्रॉन शोषून घेणाऱ्या कॅडमियमचे थर असलेले व जड पाणी भरलेले द्रिस्तर पोशाख देण्यात आले. या कामासाठी २००० हेलिकॉप्टर्सचा वापर करण्यात आला. पहाटे २ वाजून ५० मिनिटांनी एक परकीय विमान भारतीय हद्दीत शिरल्याची नोंद झाली. हेलिकॉप्टर्सचे काम अजून पूर्ण झालेले नव्हते. नाइलाजाने सर्व हेलिकॉप्टर्स परत बोलाविण्यात आली. आत आलेल्या परकीय विमानाच्या वैमानिकाने कोणत्याही प्रकारचे संदेश दिले अथवा घेतले नाहीत, तेव्हा त्यावर विमानवेधी तोफांनी हल्ला करण्यात आला. थोड्याच वेळात ते पेटले. पेटलेल्या अवस्थेतच ते वेगाने कारगिलनजिक कोसळले. विमान कोसळल्यानंतर १.१६ ते ३.३५ सेकंदापर्यंत भारतातील अनेक प्रमुख प्रयोगशाळांमध्ये न्यूट्रॉन कणांच्या अस्तित्वाची नोंद झाली. सारा देश ही घटना घडतानाच गाढ झोपेत होता.

तातडीने सर्व न्यूट्रॉन प्रतिबंधक साधनांनी सज्ज असलेली ३००० सैनिकांची तुकडी कारगिलला पाठविण्यात आली. या तुकडीने पाठविलेल्या संदेशावरून दिल्ली केंद्रावरून सकाळी सहा वाजता पाकिस्तानने भारतात न्यूट्रॉन बॉंब टाकून अडीच लाख लोक ठार मारल्याची बातमी देण्यात आली. याबरोबरच सुमारे चार लाख प्राणी व हजारो चौरस मैलांतील वनस्पती नष्ट झाल्या होत्या. अपंगत्वाबद्दलची माहिती गोळा करणे सुरू होते. तसेच या तुकडीने विमान पाकिस्तानी असल्याचे कळवले.

सकाळी ७ वाजता भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने काढलेल्या पत्रकात पाकिस्तानच्या या भेकड व अमानुष कृत्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या पत्रकात पुढे जगातील सर्व राष्ट्रांनी पाकिस्तानवर बहिष्कार घालावा

असे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला प्रतिसाद देऊन जगातील सर्व राष्ट्रांनी पाकिस्तानशी संबंध तोडल्याचा निर्णय भारताला कळविला. पाकिस्तानशी केलेले सर्व पुरवठाविषयक, सहकार्याचे व मैत्रीचे करार अनेक राष्ट्रांनी एकतर्फी रद्द केले. संयुक्त राष्ट्रसंघाने पाकिस्तानचे सदस्यत्व रद्द केले.

याउलट पाकिस्तानी उद्दाम लष्कर प्रशासक जनरल बरबाद यांनी हा स्फोट म्हणजे केवळ नमुना असून असे अनेक स्फोट घडवून प्रत्येक भारतीय नष्ट करण्याची घोषणा केली.

याच दिवशी दुपारी भरलेल्या संरक्षण अधिकारी, तज्ज्ञ व इतर शास्त्रज्ञांच्या बैठकीत संपूर्ण पाकिस्तान बेचिराख करण्याची कल्पना जवळजवळ सर्वांनी उचलून धरली. परंतु या सूडभावनेला तीव्र विरोध केला तो नोबेल पारितोषिक विजेते डॉ. शांतीस्वरूप समतानी यांनी. त्यांनी एक योजना मांडली व या योजनेमुळे निःशस्त्र विजय मिळण्याची खात्री पटवून दिली.

डॉ. समतानी यांना भूल देण्याचे नवीन तंत्र विकसित केल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळाले होते. डॉ. समतानींनी संकर पद्धतीने एका विशिष्ट जंतूची निर्मिती केली होती. हे जंतू श्वासाबरोबर शरीरात जाऊन रक्तात मिसळतात. मेंदूच्या पेशींचे कार्य काही काळ थांबवतात. हा काळ शरीरात शिरलेल्या जंतूंच्या संख्येनुसार असतो. शून्य अंश सें. तपमानात या जंतूची संख्या कायम राहते. जसजसे तपमान वाढेल तशी या जंतूंची संख्या वाढते. ३० अंश सें. तपमानाला तर एका जंतूपासून कोट्यवधी जंतू निर्माण होतात. या जंतूना उष्णता व प्रकाश हे अन्न म्हणून उपयोगी पडतात. पेशींचे कार्य थांबविताना हे जंतू नष्ट होतात.

डॉ. समतानींच्या योजनेला प्रारंभ झाला. त्यांनी शोधलेल्या जंतूची अगणित प्रमाणात सतत १० तास वाढ करण्यात आली. हे जंतू निरनिराळ्या १२००० पत्र्यांच्या पेट्यांमध्ये भरून पेट्या हवाबंद करण्यात आल्या. सर्व पेटया शून्य अंश तपमान असलेल्या वाहनांमधून निरनिराळ्या १२ विमानांमध्ये प्रत्येकी १००० याप्रमाणे चढवण्यात आल्या. बॉंब ठेवण्याच्या जागी अत्यंत कमी तपमान राहील अशी तात्पुरती व्यवस्था करून या पेट्या तिथे ठेवण्यात आल्या. हा बारा विमानांचा ताफा पाकिस्तानकडे निघाला. पाकिस्तानी विमानवेधी तोफांना चुकवत या विमानांनी पाकिस्तानची महत्त्वाची लष्करी ठाणी, अणुकेंद्रे, प्रशासकीय इमारती व संपूर्ण इस्लामाबाद या ठिकाणी पेट्यांची वृष्टी केली. प्रत्येक पेटी खाली पडताना हवेच्या घर्षणाने तापत होती व जमिनीवर आदळून फुटत होती. यानंतर दोन तासांनी एक कमांडोंची तुकडी पाहणीसाठी पाठवण्यात आली. त्यांना या जंतूंपासून अपाय होऊ नये यासाठी प्रतिबंधक लस टोचण्यात आली होती. थोड्याच वेळात त्यांनी जंतूंनी आपले काम चोख बजावल्याचे कळविले. त्यांनी लाहोर विमान तळाचा ताबा घेतला. पाठोपाठ काही तासांतच भारतीय सैन्याने संपूर्ण पाकिस्तानचा ताबा घेतला.

पाकिस्तानी लष्कर-प्रमुखांच्या कार्यालयात जंतूंची वृष्टी केलेल्या वेळी मंत्रिमंडळाची बैठक भरली होती. त्या कार्यालयातील ते सर्व अमानुष मंत्रीही जंतूंच्या हल्ल्याने बेशुद्ध पडले होते. तेथे पोचलेल्या भारतीय तुकडीने सर्व मंत्र्यांना ताब्यात घेतले. जनरल बरबादसमोर भारताचा मोठा नकाशा व प्रमुख शहरांची यादी पडली होती. नकाशात अनेक शहरांवर लाल खुणा केल्या होत्या. ते पाहून सर्वांना त्याचा अर्थ लक्षात आला. संताप अनावर होऊन एका जवानाने हातातील स्टेनगनने बरबादला बरबाद केले. ही एक हत्या सोडल्यास भारताला अहिंसक विजय मिळाला होता. ही वेळ दि. २३–११–१९९६ च्या पहाटे ३ वाजताची होती. पाकिस्तानचा आसुरी, अघोरी आनंद ४८ तासही टिकला नव्हता.

सकाळी सात वाजता भारततर्फे विजयाचे व पाकिस्तानवर ताबा घेतल्याचे वृत्त जाहीर करण्यात आले. पाकिस्तानकडील सर्व अण्वस्त्रांचा शोध घेऊन ती नष्ट केल्यावर ताबा सोडण्याचीही घोषणा करण्यात आली. साऱ्या जगाने भारतावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

तीन दिवसांनंतर डॉ. समतानी यांचा नव्या दिल्लीत भव्य सत्कार आयोजित करण्यात आला. याप्रसंगी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे नेते हजर होते. सत्काराची नियोजित वेळ टळून ६ तास झाले तरीही डॉ. समतानींचा पत्ता नव्हता.

डॉक्टर कोठे होते?

डॉक्टर आपल्या दिल्लीजवळील खेडयातल्या प्रयोगशाळेत होते. पाक लष्करी प्रशासकांची मनोवृत्ती पालटण्यासाठी काय करता येईल याचा विचार ते करत होते.

◇

# विवेकानन्द केन्द्र – एक यज्ञ

संग्राहक :
कु. अनिता कुलकर्णी, तृतीय वर्ष–शास्त्र ( गणित )

कन्याकुमारी—समोर उसळणारा हिन्दी महासागर, मागे सस्यश्यामल भारतवर्ष आणि त्याच्या अगदी शेवटच्या खडकावर पद्मासनात ध्यानमग्न झालेला तरुण संन्यासी. समोरच्या महासागरापेक्षा मनातील विचारसागर जोरजोरात उफाळत होता.

तो योगी म्हणजे स्वामी रामकृष्णांचा लाडका शिष्य, भारतमातेचा महान सुपुत्र स्वामी विवेकानन्द होत. हाच तो योगी ज्याने आपल्या विद्वत्तेने जगाला दिपवले, आपल्या प्रेमाने मानवजातीला आपलेसे केले. पण तो इथे बसून काय करीत होता? तो करत होता चिंतन, आपल्या असंख्य देशबांधवांचे, आपल्या भारतभूमीचे.

तीन दिवस व तीन रात्रींच्या चिंतनातून साक्षात्कार झाला. अखेर मातृभूमीच्या कल्याणाचा मार्ग सापडला. " गतानुगतिक आणि स्वार्थान्ध होऊन भोगविलासाच्या मागे लागणार नाहीत असे निःस्वार्थ व समर्पणास तयार असणारे सहस्रावधि स्त्री-पुरुष घडवायचे, की जे नरनारायणांच्या सेवेत धन्यता समजतील. अशाच लोकांकडून शेवटी युगप्रवर्तनाचे कार्य होऊ शकेल. " त्याप्रमाणे स्वामीजींनी आयुष्यभर प्रयत्न केले.

जिथे स्वामीजींना हा दिव्य साक्षात्कार झाला, तिथे एक भव्य दिव्य स्मारक उभे राहिले—' विवेकानंद शिला स्मारक '. दगडामातीचे हे स्मारक आज भारताचे एक भूषण ठरले आहे.

पण त्यामागे जी एक संघटना आहे, ती भारताचे आशास्थान बनली आहे. याच ' विवेकानन्द केन्द्रा 'ने भारतीयांच्या मनात आपुलकीचे व प्रेमाचे स्थान मिळवले आहे. पण असे प्रेम काही फुकाफुकी मिळत नसते, त्यामागे असतात परिश्रम आणि जिद्द.

१९७२ सालापासून विवेकानन्द केन्द्र कार्यरत झाले आहे. स्वामीजींचे आदर्श जितेजागते करण्यासाठी ' घडा आणि घडवा ' हा स्वामीजींचा संदेश डोळ्यासमोर ठेवून केन्द्र काम करीत आहे आणि ' मानवसेवा हीच ईश्वर-सेवा ' हे लोकांच्या मनात बिंबवण्याचा प्रयत्न करीत आहे.

स्वामीजींच्या अपेक्षेनुसार निःस्वार्थ स्त्रीपुरुषांचा संच निर्माण करण्याचा कार्यक्रम केन्द्राने हाती घेतला आहे. किमान पदवीधर व कौटुंबिक जबाबदाऱ्या नसणारे अविवाहित अशी तरुण मुले व मुली निवडली जातात. त्यांना प्रशिक्षण दिले जाते. असे ' जीवनव्रती ' देशाच्या कानाकोपऱ्यातून सामाजिक, आध्यात्मिक उन्नतीच्या कामासाठी पाठवले जातात. साडेतीन वर्षांचा हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर ज्या कार्यकर्त्यांची विवाहबद्ध होण्याची इच्छा असेल त्यांना गृहस्थाश्रम स्वीकारण्याची मोकळीक आहे. त्यांच्या साध्या व संतुष्ट जीवननिर्वाहाची जबाबदारी केन्द्र स्वीकारते. केवळ त्यांना सर्व शक्तिनिशी संपूर्ण वेळ सेवाकार्य करता यावे म्हणून. तसेच ज्यांची इच्छा असेल ते आजन्म केन्द्राचे कार्यकर्ते म्हणून राहू शकतात.

असे जीवनव्रती मुंबई, पुणे, दिल्ली अशा शहरी भागात तर आहेतच पण अरुणाचल प्रदेश, नागालँड, अंदमान, काश्मीर खोरे अशा दुर्लक्षित भागातही काम करताहेत.

निसर्गाच्या रांगड्या प्रेमामुळे वर्षानुवर्षे या भागात शहरी संस्कृतीचे वारे खेळले नव्हते. अरुणाचलसारखे प्रदेश, धो धो पाऊस, भीषण थंडी, कधीही पूर येणाऱ्या नद्या अशांसारख्या अनेक कारणांमुळे एकाकी पडले होते. क्वचित त्यांना सापत्न भावाने वागवले गेले. तेथील आदिवासी व आपले नागरी जीवन यांच्यात एक प्रकारची दरी पडत गेली. अशा प्रदेशात केन्द्राचे जीवनव्रती

निसर्गाचे रांगडे प्रेम झेलीत तिथल्या आदिवासींना माणूस बनवण्याचा प्रयत्न होता.

नैसर्गिक अडचणी तर अफाट होत्याच; पण इतरही अनेक अडचणी होत्या. मुख्य अडचण तेथील लोकांचा विश्वास संपादन करताना होणार होती. कारण आदिवासींच्यासुद्धा अनेक जाती–जमाती, प्रत्येक जाती–जमातीची भाषा, रीतिरिवाज भिन्न, त्यातसुद्धा जाती–जातीमध्ये वैमनस्य. जातीबाहेरचा माणूस ठार करणे हा एकच रिवाज सगळ्या जाती पाळत. साथीला गरिबी, अज्ञान, निरक्षरता, रोगराई इ. होतेच.

या सगळ्यांवर मात करण्यासाठी सुरुवातीला ' श्रमदान शिबिरे ' आयोजित केली गेली, स्थानिक विद्यार्थ्यांच्या ( जे अगदीच हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते. ) मदतीने शाळा, विहिरी, रस्ते बांधले गेले. रोगचिकित्सा शिबिरे भरवून औषधोपचार केले गेले. प्रौढ साक्षरता वर्ग घेतले गेले. त्यामुळे कार्यकर्त्यांबद्दल जनसामान्यांना आदर व प्रेम वाटू लागले.

" Each Soul Is Potentially Divine. "

हे स्वामीजींचे सूत्र धरून पुढे निवासी-शाळेची कल्पना रुजली. चारित्र्यनिर्माणातून राष्ट्रोत्थान होऊ शकेल या विश्वासाने उत्कृष्ट नागरिकनिर्मितीसाठी या शाळा सुरू केल्या गेल्या. पाच वर्षांपुढची छोटी मुले या शाळांतून शिक्षण घेऊ लागली.

आईवडिलांपासून दूर आलेली ही छोटी छोटी मुले, त्यांना निसर्गनियम शिकण्यापासून सुरुवात. या शाळांमधून दिल्लीच्या ' राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषदे 'चा अभ्यासक्रम शिकवला जातो. त्याबरोबरच माणूस घडवणारे शिक्षण दिले जाते. सकाळ–संध्याकाळ वेदमंत्र, गीताध्याय, भजने होतात. शारीरिक शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमावर भर दिला जातो. निसर्गसान्निध्यात, गुरुकुलात शिक्षण घेणारे हे विद्यार्थी मनाने निकोप व विचाराने प्रगल्भ होत आहेत. अरुणाचल प्रदेशाबरोबरच आसाम, अंदमान, नागालँड, मणिपूर, मेघालय येथेही या शाळा नावारूपास आल्या आहेत.

शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी केन्द्रातर्फे दरवर्षी काश्मिर व कन्याकुमारी येथे योगशिक्षा शिबिरे भरवली जातात. सर्व भारतातून येणाऱ्या या शिबिरार्थींना महान वैदिक परंपरेची ओळख करून दिली जाते. तसेच आध्यात्मिक उन्नती घडवणाऱ्या योगिक जीवनपद्धतीचा परिचय करवला जातो.

' आजाऱ्यांना मदत करा ' या उपक्रमात योगथेरेपीचा वापर करून आजच्या आधुनिक व मानसिक रोगांवर उपचार केला जातो. अशा शिबिरांतून उपचार करून घेणाऱ्या दमा, मधुमेह, हृदयविकार यांनी पीडित रुग्णांना लक्षणीय सुधारणा जाणवते.

केन्द्राच्या निरनिराळ्या शाखांमधून बालसंस्कार वर्ग, योग वर्ग, अभ्यास मंडळ इत्यादि चालवले जातात. विवेकानंद जयन्ति (१२ जाने.), विश्वबंधुत्वदिन, ज्या दिवशी स्वामीजींनी शिकागो सर्वधर्मपरिषदेतून जगाला विश्वबंधुत्वाचा संदेश दिला, ( ११ सप्टें. ) तो शुभदिन इ. साजरे केले जातात. त्या निमित्ताने लोकांना एकत्र करून त्यांच्या आत्मिक विकासास हातभार लावणे हाच त्यामागचा हेतू असतो.

विवेकानन्दांच्या आदर्शाला सुसंगत असे विचार केन्द्रातर्फे प्रकाशित होणाऱ्या पत्रिकांमधून प्रकट होतात. मद्रास प्रकाशन विभागातर्फे ' युवाभारती, ' ' विवेकानन्द पत्रिका, ' ' ब्रम्हवादिन, ' ' विवेकानन्द केन्द्र समाचार ' इ. प्रकाशित होतात. तर ' केन्द्र भारती ' दिल्ली केन्द्रातर्फे प्रकाशित होते. शहर भागातील शाखांमधून औषधे, पुस्तके अशा स्वरूपाची मदत गोळा केली जाते व कन्याकुमारीकडे पाठविली जाते. सध्या केन्द्राने ' कन्याकुमारी ' जिल्हा दत्तक घेऊन त्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न चालू केले आहेत.

अशा प्रकारे एक आगळे सेतुबंधनाचे काम चालू आहे. असा सेतू जो आदिवासी गिरीजन व नागरी रहिवासी यांच्यातली सांस्कृतिक, शैक्षणिक दरी कमी करू शकेल. या कामात आपल्यालाही हातभार लावायचा आहे, मग ती मदत खारीएवढी का असेना.

तुम्ही देशाच्या कुठल्याही भागात काम करण्यास तयार असाल तर केन्द्र तुमचे स्वागतच करेल; पण तुम्ही प्रापंचिक पाश सोडू शकत नसाल तर केन्द्राला तुम्ही आर्थिक मदत करू शकता. दरवर्षी फक्त १२ रु. भरून तुम्ही केन्द्राचे आश्रयदाते होऊ शकता. १५० रु. किंवा त्याहून अधिक एकीकृत दान म्हणून देऊ शकता. त्यावरील फक्त व्याज, वीस वर्षे वापरले जाईल. २० वर्षांनंतर मूळ रकमेचाही विनियोग केन्द्राच्या कार्यासाठी केला जाईल.

विवेकानन्द केन्द्र एक संघटना नसून एक यज्ञ आहे. असा यज्ञ, ज्यात आहुती पडली तरी आपल्याला धन्य वाटावे. कारण केन्द्राचे ध्येय आहे—

Man Making And Nation Building. आणि त्यामागची स्फूर्ति आहे स्वामी विवेकानंदांची.

# अशी ही .... 'लेडीज रूम

*
*

**कु. वंदना देशपांडे,** बी. ए.-भाग २

" अय्या, साडी पॉलीस्टरची का ग ? "

" डिझाईन फारच डेलिकेट आहे हं ! " ( एक नाजूक रिमार्क )

" म्हणून काय झालं ? खरं तर हा पक्ष सोडून तरी यांना काही मिळणार आहे का ? " ( यांचा राजकीय चिकित्सेतला प्रामाणिकपणाचा सल्ला. )

" रवी शास्त्री ना, एकवरच आऊट झाला. शीऽऽ काढूनच टाकला पाहिजे. " ( बिचाऱ्याचं दैव बलवत्तरच ! या सिलेक्शन कमिटीवर नाहीत. )

" अग, आम्ही त्या ... सरांची अश्शी उडवली, अगदी ग्रेटच " ( मोठं भूषण ! )

" ए तुला कळलं कागं, कोणाला सांगू नकोस, पण तो ... तो ग — C R त्याने अस्सा पॉश टॉन्ट मारला... (कानात कुजबूज, खसखस—हास्याची छोटीशी लकेर. )

" त्या परवाच्या पिक्चरमध्ये अस्सा नाचला आहे अमिताभ ! " ( जणू हिचाच हिरो ! )

— अशी ही विविधरंगी—विविधढंगी चर्चा रंगलेली ! सात आठ जणी बडबडताहेत. इतरांपैकी कोणाचेही लक्ष नाही. एखादी फुटक्याच का होईना आरशापुढे मुरडते आहे. एक दोघी नोटीस वाचून त्यावर उगाचच अनावश्यक चर्चा करताहेत. अशाच वातावरणात एखादी डोळ्यापुढे पुस्तक धरून स्कॉलरतेचा आव आणतेय ( पण मनात ... चे चिंतन. )

आणि माझ्यासारखी रिकामटेकडी, सर्वांच्या निरर्थक गप्पांवर रिमार्कस मारतेय. ते सुद्धा स्वतःचा ग्रुप नसल्याने मनातल्या मनातच.

हे अवर्णनीय दृश्य कशाचे आहे ? हे समजले असेलच ! कोणत्याही गावी कोणत्याही कॉलेजमध्ये जा. अशीच स्थिती दिसून येईल, तेथील लेडिजरूमची ! भाजी मंडई किंवा स्टेशनचा दुसरा भाग. अर्थातच महिला मंडळापेक्षा भिन्न हं ! दरवाढीच्या गप्पापासूनही वेगळा. कारण एज्यूकेटेड पोरी ना ! ( आणि त्याही एज्युकेटेड सोसायटीतल्या )

" लेडीजरूम " हा प्रकार, कोणी व का ठेवला असावा, हा प्रश्न मला नेहमीच हा सर्व देखावा पाहिला की पडतो. कारण मुली स्वभावतः नम्र व विनयशील आहेत, असा जो गैरसमज (!) आहे ना, त्यानुसार मुली उगाच अवांतर भटकत नाहीत यासाठी त्यांच्या सोयीसाठी ही लेडीजरूम असावी, असा आपला माझा एक तर्क होता. पण पंचवीस टक्के मुलीच लेडीजरूममधे असतात. तसेच कोल्ह्यापासून लाजत-मुरडत आपल्यासारख्याच वासरात लपण्यासाठी लेडिजरूमसारख्या गुहेचा उपयोग करायचा. त्याचप्रमाणे 'वासरात लंगडी गाय शहाणी' या उक्तीप्रमाणेच आपल्यासारखे रंग – रूप – हुषारी ( अर्थात बिनडोकपणा ) कोणालाच मिळाला नाही, हे अगदी त्रिकालाबाधित सत्य मानून भाव मारायचा.

मला तर या लेडीजरूममधल्या मुलीपेक्षा शेजारीच असणाऱ्या प्राध्यापकांची अगदी कीव करावी ती वाटते.

" हमखास डोके दुखण्यावर उपाय. महागाईच्या काळात स्टंट पिक्चरला जाऊन डोके दुखवण्यापेक्षा फुकटात डोके दुखवून घ्यायचे असेल तर जरूर सहकुटुंब – सहपरिवार आयुष्यात एकदा तरी जरूर भेट द्या—अर्थात

लेडीजरूम!" "प्रमुख वितरक – कोणत्याही गावी, कोणत्याही कॉलेजची लेडीजरूम" अजून कोणत्याही आकाशवाणी केंद्रावर, दूरदर्शनवर जाहिरात झाली नसली तरी लवकरच ती प्रसिद्धीच्या झोतात येईल.

आणि यामुळे लेडिजरूमचा नक्की उपयोग काय ? अभ्यासासाठी म्हणावा तर तिथे बसून अभ्यास करून पास झाले — असे सांगणारी अजून तरी मला कोणी भेटलेली नाही व भेटेल याची काडीमात्र शक्यताही नाही.

ऑफ लेक्चरला किंवा एखाद्या तरी कंटाळवाण्या लेक्चरला वेळ काढण्यासाठी लेडीजरूमपेक्षाही सरस 'पुष्पराज' आहे; नाही तर 'एल्. एम्.'—हं गैरसमज नको ललित महालला 'एल्. एम्.' असं नाजूक आवाजात म्हणायचं असतं. अगदीच सर्व लेक्चरस अटेंड केली तरी पाय मोकळे करण्यासाठी कॉलेजच्या आसपासच 'वेळ' घालवण्यासारखी बरीच साधने आहेत.

मग लेडीजरूम कशासाठी ? खूप विचार केल्यावर लक्षात येते, लेडीजरूम कशासाठी तर सकाळी कॉलेजला येताना अतिशय कष्टाने जमवून आणलेला जामानिमा बिघडला तर नाही ना ? हे केवळ तेथे असणाऱ्या आरशात पाहण्यासाठी. (कारण परत जाताना पोर्चमध्ये फार गर्दी असते ना ? आणि त्यातूनही सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या उंच – स्मार्ट मुलावर नकळत जीव जडलेला असतो!)

आणि या सर्वात महत्त्वाच्या कारणासाठी लेडीजरूमची आवश्यकता असेल ना, तर मग लेडीजरूम-कम-ब्युटी पार्लर करावं त्याचं ! फार तर या ब्युटी पार्लरचा खर्च भरून काढण्यासाठी कॉलेजमध्ये मुलीने अॅडमिशन घेतली की प्रवेश-फी बरोबर सौंदर्यप्रसाधन फीही घ्यावी. (आणि आर्टस कॉलेजमध्ये सौंदर्य साधना म्हणजे एक कलाच नाही का झाली ? शिवाय पुढेमागे कलेच्या जोरावर कोणी नाट्य-चित्र क्षेत्रात प्रवेश केला तरी उपयुक्तच.) आणि जर का तोटा व्हायला लागला तर — कारण तोटा होण्याची शक्यता दाटच. कारण सौंदर्यसाधनांचा अतिरेकी वापर — परत वर्गणी गोळा करायची ठरविली ना, तर कोणत्याही प्रकारची तक्रार न करता सर्वजणी. मनापासून मदत करतील.

या ब्युटी पार्लरवरून एक मजा आठवली. एकदा एका कॉलेजमध्ये जनरल मिटींगमधे लेडीजरूममधे एखादा पावडरचा डबा, मॅचिंगच्या दृष्टीने रंगीबेरंगी टिकल्यांची पाकिटे, कंगवे असे मर्यादित साहित्य ठेवावे, अशी योजना मांडली गेली. परंतु त्याची जबाबदारी घेण्यास मात्र कोणत्याही देखण्या—हुषार मुली तयार होईनात. आणि नंतर रोज दोन-तीन पावडरचे डबे, असंख्य टिकल्यांची पाकिटे आपल्या कॉलेजला परवडत नाही म्हटल्यावर तो प्रकल्प बारगळला. एरवी मुलीकडे असणाऱ्या एवढ्या मोठ्या पर्समधे असते काय ? तर ८० टक्के मुलींच्या पर्समधे मेकअपचे सर्व साहित्य असतेच पण परीक्षेचा फॉर्म घेण्यासाठी मात्र त्या एवढ्या मोठ्या पर्समधे वीस पैसे काही मिळत नाहीत.

मग काय ? 'हा लेडीजरूम प्रबंध' वाचून आश्चर्य वाटले ना ? आणि त्यातूनच जाणारी — कदाचित काही वेळा त्याचे अनुकरण स्वतःच करणारी, एक मुलगीच, चक्क हे सगळ इतक्या स्पष्टपणे लिहिते ! अहो, कोणाला सांगू नका, आपल्या गोटातल्या, अतिशय महत्त्वाच्या गुप्त बातम्या बाहेर सांगणारा एखादा प्रवक्ता असावाच लागतो.

...तर अशी ही 'लेडीज रूम' आणि तो बहुरंगी न – खरा ! अजूनही वाटतंय ? एकदा तरी अवश्य भेट द्यावी — डोकेदुखीसाठी हो, पण या सर्वांवरून दोष द्यायचाच असेल तर लेडीजरूमला द्या.

Hate the Ladies-room, not the Ladies.

♡

---

## हवाके महल

महल – ऊँचे ऊँचे हवाके महल,
कितने ही बार बने,
कितने ही बार टूटे,
फिरभी, महल – ऊँचे ऊँचे हवाके महल,
बनाते ही गये ...
महल – ऊँचे ऊँचे हवाके महल !

**महेश भोजवाणी**
१२ वी–वाणिज्य

---

# जैविक नियंत्रण

आनंद पाध्ये, तृतीय वर्ष-शास्त्र ( प्राणिशास्त्र )

भारतासारख्या शेतीप्रधान देशात शेती-उत्पादने वाढवण्याचे प्रयत्न होणे हे साहजिकच आहे, आणि ते आवश्यकही आहे. शेती उत्पादनाच्या वाढीत बरेच अडथळे आहेत. यामध्ये उत्पादकांची अशिक्षितता, खते व रसायने यांचा चुकीचा उपयोग, त्रासदायक प्राण्यांचा उपद्रव इ. गोष्टींचा समावेश होतो.

त्रासदायक प्राण्यांचा उपद्रव वाचविण्यासाठी बऱ्याच वेळा रसायनांचा उपयोग केला जातो. ही रसायने बहुतांशी विषारी असतात. म्हणजेच ही रसायने या त्रासदायक प्राण्यांबरोबरच इतर प्राण्यांना, खुद्द माणसाला-सुद्धा धोकादायक ठरतात. योग्य काळजी न घेतल्यास त्यापासून अपाय होतो, प्रसंगी प्राणही गमवावे लागतात. उदा. द्राक्षासारख्या फळांवर कीड पडू नये म्हणून फवारणी करतात. अशी औषधे फवारलेली द्राक्षे अथवा फळे जर व्यवस्थित न धुता खाल्ली तर अपाय होण्याचा संभव असतो.

काही कीटक फुलांच्या परस्पर पराग-स्पर्शासाठी ( Cross-Polination ) आवश्यक असतात. उदा. मधमाश्या, फुलपाखरे इ. पण रसायनांच्या उपयोगामुळे असे उपयोगी कीटक अथवा प्राणीही, आपण ज्याला मारू इच्छितो, त्या प्राण्याबरोबर मरण्याची शक्यता असते, आणि यामुळेच रासायनिक नियंत्रण हे जास्त धोकादायक ठरते.

या सगळ्यांवर कळस म्हणजे रासायनिक नियंत्रण ( Chemical control ) हे अत्यंत खर्चिक व महागडे आहे. महाग रसायने, यांची फवारणी करण्यासाठी लागणारे साहित्य यामुळे ही पद्धत सामान्य शेतकऱ्याला परवडत नाही. तसेच हवामान व पिकांची विविधता आणि सलग शेतीचा अभाव यामुळे शासकीय पातळीवर विमानातून फवारणी करणे हेही न परवडणारे ठरते, आणि परिणामी उत्पादन घटते.

शिवाय या रसायनांच्या वापरामुळे तयार शेती उत्पादने-सुद्धा काळजीपूर्वक स्वच्छ करूनच वापरावी लागतात. अन्यथा रसायनांच्या अवशेषात्मक परिणामांमुळे ( Residual effects ) विषार होण्याची शक्यता असते. उदा. D. D. T. तसेच B. H. C. या पावडरी अथवा औषधे ही आपल्या नित्य परिचयाची आहेत. परंतू या औषधांचे परिणाम फवारणीनंतर महिनाभर टिकून राहातात. त्यामुळे या काळात गुरे फवारलेल्या भागात चरत नाहीत ना हे पाहणे अत्यंत आवश्यक ठरते. तसेच या काळात जर तयार शेतमाल वापरायचा असेल तर तो काळजीपूर्वक स्वच्छ धुवूनच घ्यावा लागतो. अन्यथा विषार होणे अटळ असते.

या सर्व पार्श्वभूमीवर जैविक नियंत्रण ( Biological control ) ही उपद्रवी प्राण्यांच्या नियंत्रणाची एक अतिशय सोपी व सोयीस्कर अशी पद्धत आहे. या पद्धतीत निसर्गतःच अस्तित्वात असणाऱ्या अन्न साखळ्यांचा ( Food chiains ) अथवा परजीवी प्राण्यांचा ( Parasitic-animals ) उपयोग करून घेतला जातो.

जैविक नियंत्रणाची थोडक्यात व्याख्या अशी करता येईल —

नैसर्गिक शत्रूंचा वापर करून उपद्रवी प्राण्यांचे प्रभावी नियंत्रण करणाऱ्या पद्धतीला जैविक नियंत्रण असे म्हणतात. या पद्धतीत उपद्रवी प्राण्यांच्या नैसर्गिक शत्रूंना त्यांच्या वाढीसाठी उत्तेजन देण्यात येते व परिणामी उपद्रवी प्राण्यांची संख्या आपोआपच कमी होते.

या पद्धतीत नैसर्गिक शत्रूंचा वापर खालील प्रकारांमध्ये केला जाऊ शकतो.

१ ) भक्षक आणि परजीवी कीटक ( Predacious & Parasitic Insects )

२ ) भक्षक पृष्ठवंशीय प्राणी ( Predatory vertebrates )

३ ) परजीवी नेमॅटोडस् ( Nematode Parasites )

४ ) Protozoan diseases.

५ ) परजीवी बुरश्या ( Parasitic fungi )

६ ) जीवाणू ( Bacterial diseases ) आणि

७ ) विषाणू ( Viral diseases )

उदा. उंदीर हा प्राणी किती उपद्रवी आहे हे कुणालाच सांगायला नको. या उंदराला विष घालून मारण्यापेक्षा त्याच्या शत्रूकडून मारणे अधिक फायदेशीर व सोयीस्कर नाही का ? अलिकडची "धामण वाचवा" मोहीम ही याच उद्देशासाठी आहे. धामण हा साप बिनविषारी तर आहेच पण त्याचबरोबर तो उंदराचा कट्टर शत्रू आहे. त्याचे भक्ष्य उंदीर आहे. बहुतेक सर्वच साप उंदीर खातात. त्यामुळेच शेतातले साप विनाकारण न मारणे हे शेतकऱ्याला श्रेयस्करच ठरते.

कोकण भागात तसेच जास्त पावसाच्या अथवा पाणथळ भागात बेडूक हा असाच एक उपयुक्त ठरणारा प्राणी आहे. बेडूक – छोटे मोठे किडे, नाकतोडे, निरनिराळ्या रोगांचे कीटक यावरच आपली उपजीविका करतो. हे कीटक भातशेतीला अत्यंत घातक असतात. ऑस्ट्रेलियासारख्या काही प्रगत भागांमध्ये तर शेतकऱ्यांना बेडूक वाटतात. आपल्या देशात बेडूक मारून मोठ्या प्रमाणावर निर्यात केले जातात. परंतु शेतीच्या दृष्टीने हे अत्यंत चुकीचे आहे. याचा अर्थ असा नव्हे की ही निर्यात पूर्णपणे बंद करावी, परंतू या निर्यातीला मर्यादा घालणे मात्र आवश्यक आहे.

याचप्रमाणे मैना, सुतार, जंगली कावळा, बगळा, कोतवाल इ. पक्षी हे सुद्धा कीटक-भक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. एवढेच नव्हे तर हे पक्षी उपद्रवी कीटकांच्या नियंत्रणाला महत्त्वाचा हातभार लावतात.

तसेच रोडेलिया कार्डिनॉलिस ( **Rodelia cardinalis** ) हा भक्षक कीटक लिंबूवर्गीय वनस्पतीवरील cottony cushion scale ( **Icerya purchasi** ) या रोगाचे नियंत्रण करतो, तर **Trichogramma minutum** हा एक अत्यंत लहान, अंड्यामध्ये जगणारा परजीवी कीटक उसावरील खोडकीड तसेच बटाट्यावरील पोटॅटो ट्यूबर मॉथ ( Potato tuber moth ) या रोगांचे नियंत्रण करतो.

आतापर्यंत आपण फक्त शेतीला उपद्रवी प्राण्यांचे जैविक नियंत्रण पाहिले परंतू ही पद्धत उपद्रवी वनस्पतींचे तसेच अन्य उपद्रवी प्राण्यांचे नियंत्रण करण्यासाठी सुद्धा वापरली जाते.

गाम्बूशिया ( **Gombusia** ) मासे डासांच्या आळ्या खाऊन जगतात आणि त्याचमुळे डासांच्या नियंत्रणासाठी त्यांचा उपयोग होतो.

तसेच फड्यानिवडुंग ( opuntia ) या उपद्रवी वनस्पतीचे नियंत्रण **Cactoblastis cactorum** किंवा **Dactylopius tomentocus**. या किटकांद्वारे केले जाते.

जैविक नियंत्रण पद्धतीचे फायदे म्हणजे नियंत्रणासाठी वापरण्यात येणारी साधने ( इथें प्राणी ) जवळ जवळ निरुपद्रवी किंवा निर्धोक असतात, यामुळे विषार होणे अथवा अन्य प्राण्यांना अपाय होणे टळते. रासायनिक नियंत्रणात रसायनांचे वातावरणात पृथक्करण होऊन उद्भवणाऱ्या प्रदूषणाचा धोकाही या पद्धतीत संभवत नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नैसर्गिक समतोल ( Natural balance ) बिघडण्याची शक्यता जी रासायनिक नियंत्रण पद्धतीत मोठ्या प्रमाणावर असते ती जैविक नियंत्रण पद्धत अजिबात नसते.

जैविक नियंत्रण पद्धत ही सामान्य शेतकऱ्याला परवडणारी व चटकन समजून आचरणात आणण्याजोगी आहे. ही पद्धत जराशी संथ आणि प्रदीर्घ अशी प्रक्रिया आहे, परंतु या प्रक्रीयेमुळे होणारे परिणाम हे अधिक काळ टिकणारे असतात.

वरील सर्व गोष्टी लक्षात घेता जैविक नियंत्रण हे शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि आपल्यासारख्या गरीब शेतीप्रधान देशात, की जिथे शेतकरी अशिक्षित आहेत, जैविक नियंत्रण अत्यावश्यक आहे.

♠

# कळसूबाई ते हरिश्चंद्रगड

**विनायक रेणके, अविनाश त्रिंबके**
तृतीय वर्ष–वाणिज्य

पुण्यासारख्या ऐतिहासिक शहरात आपण राहातो. आजूबाजूचे डोंगर, किल्ले आणि सह्याद्रीतील दऱ्याखोऱ्यांतील प्रदेश आपल्याला नेहमीच आकर्षित करतो. सह्याद्रीच्या डोंगर-रांगांमध्ये मुक्तपणे हिंडावं, निळ्या उघड्या आकाशाखाली राहावं आणि निसर्गसौंदर्य नवलून न्याहाळावं, त्याचा आनंद लुटावा, सभोवतालच्या प्रदेशाची, रानावनात रहाणाऱ्यांची माहिती घ्यावी; शहरापासून अशा दूर जंगलात, रानात, एका वेगळ्या विश्वामध्ये स्वतःला हरवून घ्यायला कोणाला आवडणार नाही ?

या वर्षी विद्यापीठाने आपल्या महाविद्यालयाकडे दिलेल्या नेतृत्वामुळे महाविद्यालयाच्या पदभ्रमण-मंडळाचा उत्साह आणखीनच वाढला. उपप्राचार्य श्री. रायकरांच्या नेतृत्वाखाली कळसूबाई ते हरिश्चंद्रगड येथे पदभ्रमणाचा कार्यक्रम ठरला. त्यानुसार आपल्या व इतर दोन महाविद्यालयाच्या बेचाळीस विद्यार्थी-विद्यार्थिनी ठरल्याप्रमाणे २७ डिसेंबर रोजी दुपारी ३–१० वाजता निघणाऱ्या डेक्कन एक्सप्रेसने दादर व तेथूनच रात्री १०–३० च्या अमृतसर एक्सप्रेसने रात्री दोन वाजता इगतपुरी स्टेशनवर उतरलो. इथूनच कळसूबाईच्या पायथ्याच्या बारी या गावी जायचं होतं. पहाटे ६ वाजताची बस होती. त्यामुळे स्टेशनवरच कुडकुडत उरलेली रात्र काढली. पहाटे चहा पिऊन आम्ही बसने ' बारी ' या गावात पोहोचलो.

सूर्यदेवाने एव्हाना डोकं वर काढलं होतं. झाडांवर पाखरांची किलबिल, हलकीशी झुळूक देऊन वाहणारा वारा, डोंगरावरून वाहत येणाऱ्या झऱ्याचा गोड आवाज, असे ते सकाळचे रम्य, प्रसन्न वातावरण मनाला मोहून टाकत होतं. सह्याद्रीतील सर्वात उंच ( ५४०० फूट ) असणाऱ्या कळसूबाईचा तो पायथ्याचा भाग. पायथ्यापासून वाहणारा झरा जणू कळसूबाईचे चरण धुऊन टाकत होता. झऱ्यापाशी थोडा वेळ थांबून आम्ही कळसूबाईचे शिखर चढायला सुरुवात केली. ५०|६० अंशातली उभी चढण असलेली वाट आम्ही संथपणे चढत होतो. त्या थंड हवेतही अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. पायथ्यापासून शिखर साधारण २॥ ते ३ हजार फूट उंच असावं, वाटेमधल्या उभ्या खडकांवर आता लोखंडी शिड्या लावल्या असल्यामुळे चढण विशेष अवघड वाटत नव्हती. दीड तासाने आम्ही माथ्यावरच्या विहिरीजवळ पोहोचलो. पाठीवरच्या रूकसॅक तिथेच ठेवून आम्ही वरती बालेकिल्ल्यासारख्या असलेल्या शिखरावर गेलो. सभोवतालचं निसर्गसौंदर्य पाहून आम्ही भारावूनच गेलो. पश्चिमोत्तर दिशेला सख्ख्या भावांसारखे दिसणारे कुलंग आणि अलंग आपल्या मजबुतीची साक्ष देत होते. त्याच्या पूर्वेला नवरा–नवरी या नावाची दोन उंच टोके आकाशात उंचावलेली दिसत होती. कळसूबाईच्या दक्षिणेला खाली अथांग पसरलेला भंडारदरा धरणाचा जलाशय, त्याच्या मागे त्याची राखण करत असलेला रतनगड आणि दूरवर दक्षिणेला डोकावणाऱ्या हरिश्चंद्रगडाचं दर्शन होत होतं. आजूबाजूची शिखरेदेखील लक्ष वेधून घेत होतीच. सह्याद्रीतल्या या अतिउंच शिखरावर आम्ही उभे होतो याचा आम्हाला अतिशय आनंद होत

होता. शिखरावरचं कळसूबाई देवीचं देऊळ आहे. हे मंदिर तर खूपच लहान व बंदिस्त आहे. एका छोट्याशा दारातून वाकून आत जावं लागतं. मधे एक मोठी शिळा आहे, तीच ही देवी कळसूबाई. आजूबाजूच्या गावांची ही गावदेवी आहे तर आदिवासी देवांची कुलदेवी. आम्ही तिथे होतो तेव्हा १०।१५ आदिवासी लोक देवीला कौल लावत होते. पीक-पाणी, मुलंबाळं, वगैरे गोष्टींसाठी देवीचा आशीर्वाद किंवा संमती घेणं हा यामागचा उद्देश असतो. ५।६ वेळा तरी त्यांनी देवीला कौल लावला पण त्याचं नेमकं काय झालं हे आम्हाला समजलं नाही. सूर्य आता माथ्यावर आला होता. आम्ही परत विहिरीपाशी आलो. खाऊन झाल्यानंतर विश्रांती घेण्यासाठी एका झाडाच्या छायेत पसरलो. थोडा वेळ डुलकी घेतली पण नंतर ४ वाजताच थंडगार-बोचरं वारं सुरू झालं आणि आमचे हात-पाय अगदी गारठून गेले. दुपारी ४ वाजताच एवढी थंडी आणि वारं; तर मग रात्री कसं होईल या विचाराने उठलो. जंगलातला बराच लाकूडफाटा गोळा केला आणि चहा पिऊन आम्ही सूर्यास्त बघायला वर पुन्हा मंदिरापाशी आलो. पिवळ्याधमक उन्हातले ते सौंदर्य बराच वेळ न्याहाळून सूर्य अस्ताला गेल्यावर आम्ही पुन्हा कुडकुडत विहिरीपाशी आलो. खाली आल्यावर आम्ही शेकोटी पेटवून त्याभोवती शेकत बसलो. बराच वेळ गाणी म्हणत बसल्यावर आता डोळे मिटायला लागले होते. पण शेकोटीपासून थोडं जरी लांब गेलं तरी खूपच थंडी वाजायची, तरीदेखील तशा थंडीत आम्ही झोपलो. पहाटे उठून चहा करून आम्ही पुढच्या मार्गाला लागलो. कळसूबाईच्या थेट दक्षिणेला उतरणार होतो पण आमची वाट उभ्या असलेल्या कड्यांनी अडवली. वाट शोधत आम्ही पूर्वेकडे आलो. खाली बारीच्या खिंडीतून पुढे भंडारदरा धरणाकडे जायची वाट होती. बारीच्या खिंडीच्या जंगलातून वाट काढत खिंडीत यायला आम्हाला दुपार झाली. खिंड उतरून आम्ही दक्षिणेला ' पांजरं ' गावात उतरलो; पण तिथे न थांबता आम्ही पुढे जलाशयापाशी पोचलो. त्या स्वच्छ, अथांग पसरलेल्या पाण्यात पोहण्याचा मोह आम्हाला आवरता आला नाही. पोहून झाल्यावर धरणाच्या काठाकाठाने चालू लागलो. सूर्य मावळतीला आला होता. अंधार पडत असताना आम्ही ' मुरशेत ' या गावी पोचलो. आमच्यातले काही जण मागे राहिले होते; पण ते ' पांजर ' गावातच मुक्काम करणार असल्याचा निरोप मिळाला. त्यामुळे आम्ही निश्चिंत झालो.

' मुरशेत ' गावात झालेल्या प्रेमळ स्वागतामुळे आम्ही आश्चर्यचकित झालो. गावकऱ्यांमध्ये आमच्या-बद्दल असणारं कुतूहल आणि आपलेपण त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होतं. त्यांच्यापैकी एका गावकऱ्याने स्वतःहून आमच्याकडून तांदूळ, बटाटे वगैरे घेऊन खिचडी आणि रस्सा करून दिला. त्याच्याच अंगणामध्ये चांदणीभोजन केल्यावर तिथेच चंद्रप्रकाशात आम्ही पथारी पसरली पण दुसऱ्या एका गावकऱ्याने आम्हाला थंडी-वाऱ्याचा त्रास होईल म्हणून आपणहून आपल्या ओसरीत आमची झोपायची सोय केली. त्यांच्या या स्वागताने आणि आपलेपणाने आम्ही भारावूनच गेलो होतो. दोन दिवसांनंतर मिळणाऱ्या झोपेत आम्ही कधी बुडून गेलो ते समजलंच नाही.

पहाटे जाग आली ती घरातून येणाऱ्या जात्याच्या घरघरीने. आत मावशीबाई जात्यावर ज्वारी दळत होत्या व मधून मधून ओवी म्हणत होत्या. चहा पिऊन आम्ही सगळ्या गावकऱ्यांचा प्रेमळ निरोप घेऊन जलाशयाच्या काठावर येऊन बसलो होतो. आकाश आपलं रूप त्या अथांग जलाशयात न्याहाळत होतं. समोर पैलतीरावर गर्द हिरव्या झाडीच्या जंगलांतून रतनगड आमची वाटच पाहात होता. नावेतून पलीकडे जायचं होतं. रतनगडावर पोचायला आम्ही अगदी अधीर झालो होतो. नावेतून पलीकडे पोचल्यावर जंगलातून वाट काढत आम्ही रतनगडच्या पायथ्याला असलेल्या गावात पोचलो आणि तिथले ' अमृतेश्वर मंदिर ' बघून तिथेच आमचे पाय खिळले. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातले इतके अप्रतिम देऊळ पाहून आम्ही खरोखरच आश्चर्यचकित झालो. मंदिराच्या बाह्यदर्शनानेच आम्हाला भुरळ पाडली. आम्ही देऊळ आत जाऊन पाहिलं. खरोखरच या दऱ्याखोऱ्यांतलं ते एक अनमोल रत्नच आहे. देवळाच्या बाह्य भागावर दगडांमध्ये कोरीव काम केले आहे. देवांच्या आणि देवींच्या सुंदर मूर्ती इथे बघायला मिळतात. अमृतेश्वर अर्थातच शिवलिंग आहे. देवळाला दोन दरवाजे आहेत. मागच्या बाजूच्या दरवाजाने आत गेलं की एक मोठा दगडी मांडव आहे. आतल्या भिंतीवर व मधल्या खांबां-वरदेखील अप्रतिम नक्षीकाम व वेगवेगळ्या देवतांच्या मूर्ती शिल्पित केल्या आहेत. हे मंदिर १२।१३ व्या शतकातलं असावं. ' मेरू पर्वताची रवी करून शेषनागाच्या

दोरीने क्षीरसागर घुसळून देव-दानवांनी जी १४ रत्नं काढली, त्यातलं हे एक रत्न म्हणून हे गाव रत्नवाडी ( रतनवाडी ) व गड रत्नगड ( रतनगड ) अशी श्रद्धा आहे. ते सर्वांगसुंदर शिल्प बघून आम्ही रतनगडावर निघालो.

दुपार झाली होती. दाट जंगलातली वाट आणि त्यातल्या फसव्या वाटांना चकवत उभी चढण सावकाश चढत रतनगडाच्या दरवाज्यापाशी आलो. गडात शिरायला झरोक्यासारखा दरवाजा आहे. तो ज्या प्रकारच्या कड्यात खोदलेला आहे, त्याला चिमनी (chimney) म्हणतात. त्यातून चढण्याचा सुखद-भीतीदायक अनुभव प्रत्यक्षच घेतला पाहिजे. वरती गडावर पाण्याच्या खूप टाक्या आहेत व तेवढ्याच मोठ्या गुहादेखील आहेत. अशाच एका गुहेत रत्नदेवीची मूर्ती आहे. तिथूनच प्रवरा नदीचा उगम आहे. गडाच्या माथ्यावरून अलंग-कुलंग, मदनगड, कळसूबाई, घनचक्कर, भंडारदरा धरण यांचे विराट दर्शन घडले. थोड्या वेळाने आम्ही गड उतरलो. गडाभोवती दाट जंगल असल्यामुळे आणि बऱ्याच फसव्या वाटा असल्यामुळे चिमणी दरवाज्यापाशी भेटलेल्या गुराख्याला ' कुमशेत ' गावाची वाट विचारली आणि आम्ही आमची वाट धरली. मागे राहिलेली मंडळी आणि आम्ही यांच्यात आता खूप अंतर पडलं होतं. हळूहळू मार्ग आक्रमित आम्ही एका ठिकाणी थबकलो; कारण समोर डाव्या बाजूला एक व उजव्या बाजूला एक अशा दोन वाटा जात होत्या. कुमशेत नक्की कुठे हे ठाऊक नव्हतं. कोणाला विचारावं तर संध्याकाळचे गुराखी-देखील परतले होते. जोरात ओरडून साद घातली पण दरीतून फक्त प्रतिध्वनीच ऐकू आला. जंगलात राहाण्याची सोय नव्हती. डावीकडची वाट जरा मोठी दिसली म्हणून त्या वाटेने पुढे निघालो; कारण अंधार पडायच्या आत जंगलातून बाहेर पडून एखाद्या वस्तीपाशी पोचणे आवश्यक होतं. अंधार होत होता. आम्ही एका गावात येऊन पोचलो तेव्हा आम्हाला दूरवर जंगलातून कोल्हेकुई स्पष्ट ऐकू येत होती. त्या गावचं नाव ' कोळतांबा ' होतं म्हणजे आम्ही पूर्णपणे वाट चुकलो होतो. कुमशेतऐवजी कोळतांब्याला येऊन पोचलो होतो. इथेही आम्हाला गावकऱ्यांच्या सहकार्याचा पुन्हा एकदा अनुभव आला. गावाच्या कडेला असलेल्या शाळेत आम्हाला त्यांनी राहायला जागा दिली. आम्ही तिथे थोडा वेळ विसावलो. अंधार गडद होता. थोड्याच वेळात पूर्वेकडून पौर्णिमेचा चंद्र केशरी शाल पांघरून आकाशपटलावर अवतरला. त्या कडाक्याच्या थंडीत परत एकदा चांदणीभोजन केल्यावर शेकोटीभोवती गाणी म्हणत गप्पागोष्टी केल्यावर जमिनीवर अंग टाकलं आणि निद्राधीन झालो.

३१ डिसेंबरला सकाळी उठून आम्ही गावकऱ्यांना हरिश्चंद्रगडाची वाट विचारून घेतली. पूर्वेकडचा एक डोंगर ओलांडून आम्ही ' बावडी '. गावात आलो व तिथून ' शिरपुंजा ' मग तिथून दक्षिणेला एका टेकडीला वळसा घालून आम्ही दरीत असलेल्या ' अंबीत ' गावात उतरलो. एव्हाना दुपार झाली होती. आणि आमचं सकाळपासून ३० कि. मी. चालणं झालं होतं. अतिशय भूक लागली होती. आंबीत गावातली पोरंटोरं आम्हाला बघायला जमली होती. गावातली पुरुषमंडळी दुष्काळी कामावर गेली होती. तिथे नुस्तंच पाणी पिऊन दरीत उतरलो. दरीतून पश्चिमोत्तर वाहात जाणाऱ्या मुळा नदीपाशी येऊन थांबलो. खांद्यावरचं ओझं बाजूला ठेवून जरा वेळ गार पाण्यात पाय सोडून बसलो. झाडांची दाट सावली आणि नदीचं वहाणारं पाणी यामुळे अगदी प्रसन्न वाटत होतं. तिथं शिरा करून खाल्ल्यावर जरा तरतरी आली. थोडा वेळ विश्रांती घेऊन पुन्हा पुढची वाट धरली. अजून हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याचं गाव ८ कि. मी. दूर होतं. नवीन वर्षाचं स्वागत आम्हाला हरिश्चंद्रगडावर करायचं होतं, म्हणून दरीतून पायवाटेने पायथ्याशी असलेल्या ' पाचनई ' गावाकडे चालू लागलो. ५॥ वाजता आम्ही ' पाचनई ' गावात पोचलो. आतापर्यंत सकाळपासून ४० कि. मी. अंतर चाललो होतो. पण रात्रीच्या आत गडावर पोहोचण्याची तीव्र इच्छा होती. उसनं अवसान आणून आम्ही गड चढायला सुरुवात केली. हरिश्चंद्रगडाच्या उत्तरेला असलेल्या या पाचनई गावातून गडावर जाणारी ही सर्वात कमी चढाची वाट असली तरी तो गड चढताना हृदयाचे ठोके मात्र स्पष्ट-पणे ऐकू येतात. गर्द जंगलातल्या पायवाटेने आम्ही माथ्यावर चाललो होतो. अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. पण उत्साहात आम्ही वरती कसे पोहोचलो हे समजलेच नाही. पण गडावर पोहोचल्यावर जो एक आनंद असतो, तो सर्व शीण नाहीसा करतो एवढं मात्र खरं.

वरती पोहोचलो तेव्हा अंधाराचंच साम्राज्य पसरलं होतं. टॉर्चच्या प्रकाशात जे दिसत होतं तेवढंच. नव्या वर्षाचं स्वागत करायला आमच्या अगोदर आमच्यासारखेच गिरीप्रेमी आलेले होते. चंद्र उगवल्यावर त्या चंद्र-प्रकाशात मंदिराची वास्तू स्पष्ट दिसत होती. आम्ही थांबलो होतो ते हरिश्चंद्रेश्वरांचं देऊळ गडाच्या शिखराच्या उत्तरेला एका ओहोळात होतं. प्रवेशद्वाराच्या अलिकडे एक मोठं तळं आहे. त्याच्या उजवीकडे मंदिराचे प्रवेश-द्वार झाडीत लपल्यामुळे नीट समजू शकत नाही. चांदण्यात त्या काळ्याभोर दगडाची वास्तू काही न्यारीच होती. रात्री १२ वाजता नवीन वर्षाच्या शुभेच्छा एकमेकांना देऊन आम्ही आणि इतर गिरीप्रेमींनी मंदिराबाहेर एक मोठी शेकोटी पेटवली आणि सगळ्यांनी मिळून गाणी म्हटली, गप्पागोष्टी झाल्या, नवीन मुला-मुलींच्या ओळखी झाल्या. त्या रात्री नवीन वर्षाचं असं वेगळं स्वागत करून आम्ही रात्री २ वाजता झोपलो. दिवसभराच्या रपेटीचं आता काहीच वाटत नव्हतं. १ जानेवारीला वर्षाच्या पहिल्याच दिवशी खूपच उशिरा उठलो. थोड्या वेळाने हरिश्चंद्रेश्वराची आरती केली आणि गड बघायला निघालो.

हरिश्चंद्रेश्वराचं मंदिर जिथे उभं आहे त्या ओहोळाला मंगळगंगा असे म्हणतात. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरच १५ फूट × १८ फुटाची देवळाची वास्तू आहे. भोवताली तटबंदी आहे आणि मंदिराच्याभोवती चौफेर ८।१० फुटांचं पटांगण आहे. मंदिराच्या मागच्या बाजूला समोरच एक मोठा नंदी आहे आणि त्याच्या मागच्या बाजूच्या डोंगरात ५।६ गुहा आहेत. आणि गुहांच्याच बाजूला पाण्याची ३।४ पाण्याची कुंडं आहेत. प्रवेश-द्वारापाशी असलेला शिलालेख तिथे महान योगी चांगदेवाचं अस्तित्व सिद्ध करतो. ज्ञानेश्वरांच्या समाधी-नंतर योगी चांगदेव मोठ्या विमनस्क अवस्थेत या मंदिरात येऊन तपश्चर्या करत होते. हेच ते इतिहासप्रसिद्ध मंदिर. ओहोळाच्या प्रवाहाबरोबर खाली ५० फूट गेल्यावर डाव्या बाजूला एक प्रचंड मोठी गुहा आहे. गुहेमध्ये पुरुषभर खोल पाणी आहे आणि बरोबर मध्यभागी एका चौथऱ्यावर एक प्रचंड शिवलिंग आहे. तोच हा केदारेश्वर. त्याच्यासमोर नतमस्तक होऊन आम्ही पुन्हा मंदिराच्या बाजूने वरच्या बाजूला दीडशे पावलं चालल्या-वर अशाच लहानमोठ्या गुहा दिसल्या, त्यांपैकी एका मोठ्या गुहेत एक मोठा गणपती कोरला होता. ते पाहून झाल्यावर त्याच्या पश्चिमेस सुमारे अर्धा तास चालल्यावर एका दिव्य आणि भव्य अशा कोकण कड्यापाशी येऊन पोचलो. सुमारे एक कि. मी. लांबीचा अर्धवर्तुळाकार हा कडा वाकून बघताच येत नाही. तळ बघायचा झाल्यास झोपूनच दरीत डोकवायचं. म्हणजे एखाद्या मुंगीने दूधभट्टीतल्या भल्यामोठ्या कढईच्या काठावरून डोकावल्यावर कसे दिसेल तसाच हा निसर्गाचा आविष्कार. आम्ही एक भलामोठा दगड त्या कड्यावरून खाली टाकला. तो सरळ हवेतून खाली पडायला १० सेकंद लागले. गुरुत्वाकर्षणाच्या सूत्रात हा वेळ घातला तेव्हा त्या कड्याची उंची १५०० फूट भरली. हा अती दिव्य कडा बघून आम्ही वर बालेकिल्ल्यावर आलो. तिथूनच पूर्वेला तारामती आणि रोहिदास ही शिखरे दिसली. गडाचा विस्तार तसा फारच मोठा आहे. तिथून पुन्हा मंदिरात आलो आणि ' जय हरिश्चंद्रेश्वर ' अशी घोषणा करून परतीच्या वाटेला लागलो. तारामती आणि रोहिदासच्या डाव्या अंगाने वळसा घालून पूर्वेच्या टोलार खिंडीत उतरलो. खिंडीत दोन रस्ते फुटतात. एक उत्तरेला कोथळे गावाकडे आणि दुसरा दक्षिणेला खिरेश्वर गावाकडे. आम्ही ' खिरेश्वर ' गावात उतरलो आणि लगेचच बैलगाडीच्या रस्त्याने संध्याकाळपर्यंत ' खुबी फाट्यावर ' येऊन पोचलो. पुण्याची जुन्नरमार्गे जाणारी शेवटची बस समोरूनच भरून गेल्यामुळे दुसऱ्या एका बसने ' ओतूर ' गावात आलो. तिथूनही पुण्याची बस नसल्याने गावातल्या मारुतीच्या देवळात मुक्काम केला. रात्री देवळातल्या भजनात आम्हीदेखील टाळ घेऊन सामील झालो. प्रवचन ऐकलं. आमच्यासारख्याच महाविद्यालयात शिकणाऱ्या एका मुलाने ( गावातल्या ) प्रवचन केलं. नंतर देवळातच झोपलो आणि पहाटे उठून पुण्याच्या बसने परतीच्या वाटेला लागलो.

गिरीशिखरांच्या सान्निध्यातले हे पाच-सहा दिवस. ते अमृतेश्वराचं मंदिर, ते घनदाट जंगल, हरिश्चंद्रगडावरचा तो कोकण कडा. खरोखरच अजून हे डोळ्यासमोर दिसलं की पुन्हा हे सर्व पाहाण्याचं भाग्य कधी लाभेल यासाठी मन आतुर झालेलं असतं.

# उद्योगविरहित उद्योगपती



**रवींद्र एकनाथ कोठावदे,** एम्. कॉम्., पार्ट – २

व्यक्ती इहलोकीची यात्रा संपवून जाते खरी. परंतु काही व्यक्ती अशा असतात की त्यांचे विस्मरण होणे शक्यच नसते. कारण अनेक संस्थांच्या आणि त्यांनी केलेल्या कार्याच्या रूपाने ते आपल्यांतच असतात. अशा व्यक्ती स्वतःसाठी जगत नाहीत. मरावे कसे हे कोणी सांगू शकत नाही. कारण मरण केव्हा, कसे येईल हे सांगता येत नाही. पण जगावे कसे हे मात्र ह्या व्यक्ती स्वतःच्या जगण्याने दाखवून देतात. आणि म्हणूनच त्यांच्या मरणानेसुद्धा त्या व्यक्ती अमर होतात. अशांपैकीच एक कै. अप्पासाहेब भट !

मराठा चेंबरचे संस्थापक–कार्यवाह. भारतातील लघु-उद्योगांचे प्रणेते व नामवंत अर्थतज्ज्ञ श्रीयुत आत्माराम रावजी भट यांना मंगळवार दि. १८ जानेवारी १९८३ देवाज्ञा झाली.

मराठा चेंबरला भटसाहेबांनी जन्म दिला. स्वतःच्या अपत्याप्रमाणे चेंबरचे पालनपोषण केले, वाढविले. महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झाला, त्यामध्ये भट-साहेबांचाच हात होता. राजकारणामुळे कोयना वीज-प्रकल्प मागे रेंगाळला होता. महाराष्ट्रातून कोयना वीज वजा केल्यावर कोणते विदारक दृष्य डोळ्यासमोर येईल याची कल्पनासुद्धा करवत नाही. अप्पासाहेबांनी या वीज-प्रकल्पाचा पाठपुरावा केला आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले.

अप्पासाहेबांच्या हाताला यश होतेच. त्यांनी स्थापलेल्या संस्थांना लोकमान्यता, राजमान्यता लाभली. त्यांच्या हाताला लाभलेले यशाचे वरदान त्यांच्या नियोजनातून, चिंतनातून आणि त्यांच्या अविश्रांत श्रमातून साकारलेले होते. चेंबरची स्थापना तर त्यांनी केलीच; परंतु चेंबरतर्फे अनेक उपक्रम सुरू केले. इतकेच नव्हे तर, इंडियन लँग्वेजेस न्यूजपेपर्स असोसिएशन ( 'इलना' – भाषिक वृत्तपत्र संघटना ), फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज ऑफ इंडिया ( 'फ्रासी' – लघुउद्योग महासंघ ), आणि अलिकडेच कौन्सिल ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज ऑफ इंडिया या संघटनांची स्थापना त्यांनी केली. बँक ऑफ महाराष्ट्रच्या स्थापनेत अप्पासाहेब भट आणि मराठा चेंबरचा पुढाकार होता. ह्या बँकेच्या मूळ प्रवर्तकांपैकी ते एक. परंतु स्वतः कधीही संचालक मंडळावर नव्हते. एखादी उत्तम कल्पना घ्यायची, तिचा पाठपुरावा करायचा आणि पुढे ती लायक हातांमध्ये सोपवून दुसऱ्या विधायक कार्याकडे वळायचे—ही अप्पा-साहेबांची धाटणी होती. मराठा चेंबरच्या प्रयत्नांनीच केवळ पुण्यात शेअर बाजाराची ( स्टॉक एक्स्चेंज ) स्थापना होऊ शकली.

मराठी माणसांनी उद्योगात पडावे, व्यापार–उद्योगात रस घ्यावा, महाराष्ट्राची औद्योगिक भरभराट व्हावी म्हणून त्यांनी सदैव चिंता वाहिली. याबद्दल लेख लिहून, चर्चा घडवून आणून ते थांबले नाहीत; तर असे कार्य करणाऱ्या संस्थाच त्यांनी उभ्या केल्या, जोपासल्या, वाढविल्या नि त्यांच्याकडून शाश्वत स्वरूपाचे काम करून घेतले.

भारताची औद्योगिक प्रगती विकेंद्रित लघुउद्योगांच्या प्रगतीत सामावली आहे असा विश्वास बाळगून हातमाग, यंत्रमाग, छपाईचा व्यवसाय, छोटी व भाषिक वृत्तपत्रे, लहान व्यापारी व कारखानदारी क्षेत्र यांचे जाळे

उभारण्याच्या कार्यात अप्पासाहेबांनी अहर्निश व अविश्रांत परिश्रम घेतले. त्यांच्या या क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल भारत सरकारने १९७१ मध्ये 'पद्मश्री' किताब देऊन त्यांचा सार्थ गौरव केला. तसेच १९७२ मध्ये 'लघु-उद्योग रत्न' पदवीने त्यांच्या कार्याचा उचित गौरव केला.

आपली बुद्धिमत्ता, चिकाटी, पद्धतशीर आणि शिस्तीने काम करायची सवय, माणसे जोडायची हातोटी आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे फारच थोड्यांच्या ठिकाणी आढळणारी दूरदृष्टी यांच्या जोरावर हा मराठी माणूस किती वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवून गेला ते पाहिले की मन चकित होते.

भटसाहेबांच्या निधनाने देश उद्योगक्षेत्रातील एका प्रामाणिक, कर्तृत्ववान व कुशल अशा नेतृत्वास मुकला आहे आणि महाराष्ट्रातील लघुउद्योगांचे अपरिमित नुकसान झाले. लघुउद्योगाच्या विकासासाठी महाराष्ट्रात व देशात त्यांनी जे अविरत श्रम घेतले ते जनतेच्या चिरकाल स्मरणात राहतील यात शंका नाही. खरोखरच, भटसाहेबांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाच्या विविध दालनांमध्ये गेली पन्नास वर्षे अत्यंत तळमळीने आणि सेवाभावाने काम करणारी एक शक्तीच नाहीशी झाली आहे. एक मूर्तिमंत कर्तबगारीच संपुष्टात आली आहे.

अप्पासाहेबांच्या निधनाने आपण भारतीय लघुउद्योगांच्या प्रणेत्याला मुकलो आहोत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजचे संस्थापक शिल्पकार आणि प्रमुख आधारस्तंभ आणि या सर्वाहूनही एक अत्यंत प्रामाणिक, निरलस आणि भारतीय संस्कृतीतील जे जे मंगल आहे त्याचे खरेखुरे प्रतीक असे विलोभनीय व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र आदरांजली !

♣

---

## लपंडाव

अमावस्येच्या भयानक रात्री,
काळोख्या अंधारात
चंद्र कोठे नाहीसा होतो ?
पौर्णिमेच्या स्वच्छंद रात्री
स्वच्छ प्रकाशामध्ये,
अमावस्येची भयानक रात
हृदयाला घालते धाक
पौर्णिमेची स्वच्छ रात
आनंद पसरवते सर्वत्रात
अमावस्येच्या घनदाट राती
अंधःकार पसरतो चहुकडे
पौर्णिमेच्या चांदण्या राती
प्रकाश दिसतो सगळीकडे
पाठशिवणीचा लपंडाव सुरू
असतोच तो कायम
मात्र प्रत्येक राती
दिसतात त्या फक्त चांदण्या

**श्रीनिवास देशमुख,** तृ. वर्ष–वाणिज्य

## प्रीत अशी सजली

नयनी उमलल्या स्वप्नकळ्या
रात अशी रंगली
पहाटवाऱ्यात सुरीली
प्रीत अशी सजली . . .
सुगंधीत मनांची
गंधीत वचने झाली
भावफुलांची शिंपली
मोती कशी सांडली . . .
अबोल पापण्यांची
विसावली थरथर गाली
स्पर्श होता तुझा
खळी त्यात दडली . . .
ओठीचे लाजले स्मित
दर्वांत प्रीत न्हाली
पहाटवाऱ्यात सुरीली
प्रीत अशी सजली . . .
प्रीत अशी सजली !

**नीता गोगटे,** द्वितीय वर्ष – वाणिज्य

# तेवढं सांगा ना !

मराठीला चांगले दिवस येतील
" नोकरीसाठी " मात्र इंग्रजी लागते
याचा मेळ कसा बसवायचा ?
तेवढं सांगा ना " कुलकर्णी सर "

इंग्लिशशिवाय पर्याय नाही
मात्र ग्रामरमध्ये उडते दांडी
परकीय भाषेला जवळ करायचे नाही
असा टाहो फोडला जातो, काय करायचे
तेवढं सांगा ना " रायकर सर "

अमर्याद साध्य नि पर्यायी उपयोगाची साधने
यांचा मेळ घातला पाहिजे
बचतीचं प्रमाण वाढवून,
मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक केली पाहिजे
परंतु जिथं अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजाही
भागवता येणं शक्य नाही
तिथं या अर्थशास्त्राचा मेळ कसा घालायचा ?
तेवढं सांगा ना " महाजन सर "

मन की वर्तन
क्षेत्रउपपत्ती की परमानुवाद
नि फ्रॉइडच " मनोविश्लेषण " अभ्यासताना
प्रत्येकालाच " मिथ्या समर्थन " का करावं लागतं ?
तेवढं सांगा ना सेन मॅडम

गल्लीपासून दिल्लीपर्यंत
सगळीकडे राजकारणी लोकांनी
घातलाय " अपूर्व " गोंधळ
नवसमाज निर्मितीसाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे
आजचा तरुण उद्याचा नागरीक
अशा घोषणा करणं हेही राजकारणच
तेव्हा याचा मेळ कसा घालायचा ?
तेवढं सांगा ना सुमंत सर

१८५७ बंड की स्वातंत्र्ययुद्ध
याचं मूल्यमापन अभ्यासताना
१९४७ च्या स्वातंत्र्याच्या प्रेरणा घेतल्या म्हणतात.
स्वातंत्र्यासाठी अनेकांनी सर्वस्वाचा होम केला म्हणतात
तर मग ...
आज सर्वांपुढे अनेक आव्हाने असूनही
कोणी नवा इतिहास निर्माण करायला
पुढे का येत नाही तेवढं सांगा ना M. A. कुलकर्णी सर

तळागाळातल्या समाजापर्यंत जावून
पोहोचले पाहिजे
विकासाची गंगा गरीबांच्या झोपडी
पर्यंत गेली पाहिजे.
गांधीवादी समाजवादाची सृष्टी पांघरली जाते
प्रत्यक्षात मात्र
प्रस्थापित समाजवादाविषयीचीच त्यांना
" दलाली " करायची असते.
याचा मेळ कसा बसावायचा ?
तेवढे सांगा ना नवलगुंदकर सर

हे अथपासूनचे इथपर्यंत.
रामायण ऐकताना ( वाचताना )
शब्दांच्या पलीकडचे समजून घेणार का ?
तेवढं सांगा ना गंभीर सर !

**यशवंत कदम**
द्वि. वर्ष – साहित्य

## आशा

सुखाच्याच आशेवर
माणूस जीवन जगतो
पण सुखंच जेव्हा देतात धोका
तेव्हा मात्र निराश होते
निराशेत अर्थ खरा
म्हणूनच आशावादी सांगतात
" कशाचीही आशा धरा "

**श्रीनिवास देशमुख**
तृ. वर्ष–वाणिज्य

## सोचो तो कभी

सोचो तो कभी,
अगर जिंदगी में,
हम तुम न होते, तो,
मिलते-बिछडते क्यों ?
अगर जिंदगी में इश्क न होता
तो
अश्क बहते क्यों ?

**श्रीनिवास देशमुख**
तृ. वर्ष–वाणिज्य

## ऋतू

ऋतू आला हा नवा
नवी बहार आली जीवनात,
चैतन्याच्या चांदण्यात !
न्हाऊन निघताना
आठवतात जुन्या आठवणी
वाऱ्याची एक झुळूक
हळूच स्पर्शून जाते मनाला
आणि नव्या ऋतूची होते
नवी पहाट !

**विक्रांत कांबळे**
१२ वी–वाणिज्य

## वाट

ही वाट फार मोठी आहे.
अनोळखी, अपरिचित वळणे भीती दाखवितात
समजत नाही कधी संपणार हा प्रवास
कधी कधी वाटतं सगळं संपून जावं
आणि मागे उरावी एक सुंदर निशाणी
की जी कुणालाच समजू नये
कुणालाच कळू नये.

**विक्रांत कांबळे**
१२ वी–वाणिज्य

## शब्द

शब्द असे असतात
कधी दगडासारखे कणखर बोचणारे,
तर कधी हळूच मनावर फुंकर घालणारे !
कधी वाटतात उफाळणाऱ्या ज्वालेसम,
तर कधी भासतात चंचल हरिणीप्रमाणे !
कधी येतात कडाडत विजेसारखे,
तर कधी करतात पाण्याचा शीतल शिडकावा !
ते कधी जीव घेतात
तर कधी जीवही देतात !
मला न कळती भाषा अजुनही ह्या शब्दांची,
मज कुणी सांगेल का ?
शब्द कसे असतात शब्द कसे असतात.

**विक्रांत कांबळे**
१२ वी – वाणिज्य

## दुरावा

नसशील तू माझी कधीही
पण तरीही मी तुझाच आहे,
शून्यच जरी तव प्रीत तुझ्यावीण
त्या शून्यातच माझे विश्व आहे.
आपल्याच पायात अडखळून पडावं
तसं मी तुझ्या प्रेमात पडतच राहिलो,
जन्मखुणा घालवायचा प्रयत्न करावा तसं
तू मात्र चुकूनही कुठे पडली नाहीस !

**अरविंद गायकवाड**
तृ. वर्ष–वाणिज्य

# PUNE STOCK EXCHANGE

Neena Kulkarni
S. Y. B. Com.

During the last few years, Pune has emerged as one of the new industrial cities of our country. As a result of a large number of reputed public companies having their registered offices and factories in Pune, the number of investors has increased to a large extent. Therefore the class of investors and the industrialists felt the need for establishment of a stock exchange at Pune. The Maratha Chamber of Commerce and Industries took a lead and persuaded the government of India to accord sanction to the stock exchange at Pune. For this purpose a sub-committee was constituted by the Chamber under the chairmanship of Dr. M. V. Patwandhan to undertake the follow up of the subject. Government gave the permission to establish the stock exchange at Pune. It is incorporated under the Indian Companies Act 1956, as a Limited Company.

At present there are ten stock exchanges in India. viz Bombay, Delhi, Ahmedabad, Madras, Calcutta, Banglore, Indore, Hydrabad, Cochin and Pune.

The main objects of Pune-Stock Exchange are :

( 1 ) To facilitate the transactions of business in stocks, shares and like securities on the stock exchange and to establish and provide for and manage clearing-house for the transactions of the members.

(2) To support and protect the character of brokers, dealers and jobbers in stocks, shares and securities. It further protects the interest of both brokers and public dealings in Pune and else where in Maharashtra. It promotes honourable practice to discourage and to suppress malpractices and also helps to settle the dispute amongst brokers dealers and jobbers.

Membership : Only individuals, can become the members of the Stock Exchange A corporate body or a firm cannot become a member. The number of members is limited to one hundred only. There are certain conditions on membership. Some of the important conditions are :

( 1 ) He should be at least 21 years of age.

( 2 ) He should posses minimum educational qualification.

( 3 ) He should be a citizen of India.

( 4 ) He should not be an inslovent.

**Managememt :**

The overall management of the affairs of the exchange is in the hands of the council of management. At present there are ten members, one public representative, and one chairman in the council of management. The council of management elects the officebearers from themselves. The office bearers are—

The President, the Vice President, the Treasurer and the Secretary.

**Listing of the Securities :**

The Stock Exchange provides a specific form to the Companies if they want to list their shares on stock exchange. It is not compulsory that every public limited company must get its securities listed on the stock exchange. Listing is a special privilege granted to a company by the stock exchange authorities to protect the interests of both issuing company and the investing public. Listing means the admission of the securities of a company to trading privileges on a stock exchange. There are certain advantages of listing such as liquidity, ready marketability, negotiability, price continuance etc. There is a certain procedure which a company has to follow while listing its securities on stock exchange. At present on Pune Stock Exchange, forty companies have listed their shares. some of them : are Vulcan Laval Limited, Kirloskar Oil Engins Ltd, Kirloskar Pneumatic Limited, Western India Erectors Ltd., Mahindra & Mahindra, Poona Industrial Hotel Ltd. etc.

**Method of Trading :**

Only ready dilivery contracts are allowed on Pune Stock Exchange. Forward dilivery contracts are allowed only on Bombay Stock Exchange. If the investor has some shares which are listed on stock exchange, it is very easy to sell those shares. But the investor himself can't transact the business, on the stock exchange. He has to approch a member of the stock exchange. who will sell the securities on his behalf. Pune Stock Exchange has given a badge to its member and also to his assistants which is to be shown at the entrance of the ring.

The investor approches the member and negotiates with him and thereafter a formal contract is entered into. Then the member meets the dealer and asks him to 'make a price' without disclosing whether he is to buy or sell. The dealer shouts the two prices, the lower one for buying and higher one for selling. The broker too quotes his price. If they agree then they note down the particulars of the deal on 'Sauda Book' which is provided by the stock exchange. The prices at which business is transacted are displayed on the Board at the stock exchange and also provided to the press.

Last step is settlement of transaction. In Pune Stock Exchange transactions are setted on every Friday. If there is only one transaction then the required amount is paid on received against the exchange of the securities. If the transactions are numerous all of them are taken together and only the net difference is adjusted through Clearing House.

In this way the Stock Exchange serves the people. People should not think that it is a place for gambling. They should change their habits of saving and they should invest the money in securities. The Government of India is also helping the investors by giving the additional tax concessions. They have given the benefit in wealth tax, gift tax and income tax.

If the people change their habits of saving and invest their money in securities then there is a great future for Pune Stock Exchange.

♠

---

## दंवभरल्या ओलेत्या पहाटे

दंवभरल्या ओलेत्या पहाटे
क्षितिजरेषेच्या कडेने
पारिजाताच्या मंद सुगंधात
मी तुला आठवते. अन्,
सनईच्या धुंद सुरांत
मिटलेल्या कळ्यांच्या
उमलणाऱ्या पाकळ्यांतून
प्रितीच्या मधुर झंकारात
तुझी हाक ऐकू येते.
जागेपणी रंगवलेल्या
स्वप्नमालेवर हसण्यात
तळपती दुपार सरून जाते.
अन् संध्येच्या स्वागतार्थ
सांजवातीच्या प्रसन्नतेत
मी तुझी वाट पहाते.
केव्हातरी मग अंधारून
संध्येची चांदणी रात्र होते
अन् चांदण्यांनी चंद्र शोधावा
तशी मी तुला शोधत रहाते.
रातराणीच्या सुगंधात
तुझी आठवण हळूच येते,
अन् हृदयाच्या मलमली कप्प्यांत
सुखद रोमांच उठवून जाते.
कधी तरी मग जाग येते,
अन् माझी मी मलाच हसते
सगळेच एक स्वप्न असते
वास्तवात मी एकटीच असते.

**स्मिता पंडित**, द्वितीय वर्ष–वाणिज्य

## चुकामूक

लाटांसम मी हिंदोळे खाताना
किनारा कधी तू बनली नाहीस
किनाऱ्याला लागलो जेव्हा
वाचवण्यास मात्र तू सरसावलीस

पण डहाळी होऊन मी येताना
कळी होऊन तू उमलली नाहीस
रूप डहाळीचं मी बनलल्यावर
कळी होण्यास मात्र तू धडपडलीस

जीवनाची वाटचाल मी करताना
ध्येय माझं तू बनली नाहीस
मार्ग माझा मी बदलल्यावर
आतुर होऊन तू शोधू लागलीस

दृष्टीत तुझ्या मी सृष्टी पाहताना
नजरेस नजर तू मिळवली नाहीस
पडझड जेव्हा होऊन गेली
हिरवेपणा तू शोधत बसलीस

आधार होऊन मी येताना
लता बनून तू लपेटली नाहीस
आधार दुसऱ्याला मी देताना
तू मात्र निराधार होऊन बसलीस

हृदयाचा ठेवा मी तुला देताना
धडकन त्याची तू बनली नाहीस
सुखसागर माझ्या हाती येताना
अर्थहीन अश्रू मात्र तू ढाळत बसलीस

**हेमंत झेंडे**, तृ. वर्ष–वाणिज्य

# Ideal Education : My Dream

**Rashmi Chhatre**
T. Y. B. Sc.

Whenever one says the word 'ideal education' I get a little surprised and start thinking 'Is really the education in practice ideal ? Is it job oriented ?' There are thousands of graduates who are unemployed and are wandering in search of a job and losing their energy, temper and also look very disappointed. They start thinking, 'What have we gained by being graduates ? What is the use of the degree we have achieved ?' On the other hand a well-trained worker even if he is not educated can get enough money required for his needs if he is sincere enough in doing his work properly.

I think that the education will be ideal only when it will make the student an efficient all-rounder. The education should be goal-oriented. At present what we do is when we pass our 10th std. examination we start thinking about the subject to be chosen, and after 12th std. we start thinking about our principal subject at F. Y. or S. Y. level and thus we get very little practical knowledge which will help us in doing some creative work.

I think that according to the aptitude of a student for a subject the education should be given from 8th or 9th std. or even before that. This will give the student a farely good knowledge about the subject in early age and there will be no difficulty in choosing the subject at 12th std. or so.

Previously i. e. when the 'Gurukul' system was in practice, the education was given at an early age. The students coming from all strata of the society, were always ready to do any type of work. The main Guru used to judge the aptitude of each student and used to give him or her the education of one's aptitude. In 'Gurukul' system 'faith' was the main criterion and all students use to keep faith in their Guru for all times.

Now-a-days there are aptitude tests and psychological tests which are taken by reputed institutes which I think work as 'Guru'. These tests are of paramount importance, but the main difficulty is of parents. So first parents are to be oriented and convinced about the importance of these tests for their children, which help

parents in understanding the bent of the child for a perticular type of education.

The most common statement made by the parents is " At our times there was nothing of this type of tests and even then we are settled in the life with a job or in a business. " To this the answer is " The time has changed and those who are settled in the life, how many of them are in the fields of their aptitude ? If, impartially, all parents are to answer this question, I am sure at the end all parents would agree to opt for aptitude tests and psychological tests.

After getting reports, from the institutes of their children ( at the age of 10-12 years ) parents can understand the aptitude and then can provide suitable courses for children.

Unfortunately, parents decide about the courses to be offered by their children. Actually parents and the concerned children should visit guidence bureau and get the tips from the authorities.

I imagine all students, from the age group 10-12 years old, have to give their aptitude tests and psychological tests and after that consult with guidance bureau and accordingly doing their education in the fields suitable to them. The interest of the students will reach the peak and these conditions will improve the quality of students which will help the nation in long run.

Another thing which is important and should be considered seriously is 'discipline in education.' Practice of discipline will help every student in his everyday life. He can do every work perfectly. But unfortunately discipline in students is decreasing.

One of the ways is to behave in an indisciplined manner, which is practiced oftenl now-a-days, is to go on strike. This is becoming a favourite job of the students. There is no special reason why students go on strike. They boycott examinations if they are held early or late or if the papers are difficult, Another reason why indiscipline in students is, I think, the increasing number of students in the class. Because of large number of students professors are not able to pay attention towards each one of them and thus indiscipline increases.

Some of the students are interested in politics but I think they should not take actual part in politics till they do not complete their education. Part in politics may lead to indiscipline in some way or the other.

For proper discipline some kind of military education should be introduced in schools and colleges. Regimentation to the students is essential at an early age and to this parents of all levels should back and not to ask for any excuse for their children. Regimentation should be strictly used for inculcating the sense of health, cleanliness, spirit of sharing, spirit of helping and mastering any game of one's choice. Regimentation should bring out healthy youth with essential manners and etiquettes with appropriate spirit of brotherhood and nationality.

Co-curricular activities are a kind of study which must be included in regular course of education. There passing the examinations with good marks is not enough for a good carere. Students should take part in debates and learn that art, they should also take part in drama, annual functions etc. These things will help a lot in making a good career.

Education without any interest in sports can not be said as ideal coaching for a particular game, of course in which the student is interested, should be given from an early age, so that students can learn more techniques and as they grow they can add new techniques in their game and can secure good positions in national as well as international tournaments. For this, students should take part in various competitions.

But while doing the co-curricular activities students should not lose their concentration on studies. Both the things are equally important and this I think, can be called as ideal education.

Could this dream come true ?

---

# पराभूत

होती फुलली बहार जेव्हा दुर्लक्षिले मी माझ्या मना
गर्वाच्या धुंदीत विसरून गेलो मी माझ्याच भावना
शोधित हिंडलो दिशा धुक्यातील सोडून प्रकाशाची साथ
असता समोर अथांग सागर रस वाळवंटातील मृगजळात
घालविला सर्व काळ जे होते न हरवले गवसण्यात
दिसत असता लाखो सुमने रमलो नाही वास्तवात
व्यर्थ हेवा धरला मनी आकाशातील तारे हुडकण्याचा
हाती काही न येता होरपळलो अपयशाच्या वणव्यात
कळले जेव्हा हा अर्थशून्य यत्न हा अनर्थातून अर्थ शोधण्याचा
तडफडलो पुन्हा शोधण्या किनारा हरवलेल्या विजयाचा
न गवसले तेव्हा तो प्रत्यय मज येता पराजयाचा
असं का व्हावं ? अर्थ न उमजे मज माझ्याच प्रश्नाचा
फिरलो वणवण शोधित, माहीत असता सर्वच आभासी
पराभूत मी जीवनी या हरवल्या वाटेवरील प्रवासी.

**विजया काकडे**
तृ. व.– शास्त्र

# वैधव्य

आयुष्याचं जाळं विणता विणता
मध्यान्ह झालाय
ज्यानं कपाळावर सूर्य नोंदविला होता
त्यानंच हे कपाळ
पूसून टाकलंय कायमचं —
तिथे सूर्य कधीच दिसणार नव्हता
पहिल्यासारखा
कोंदटलेल्या डोहात जाणवणारा दाह
एवढेच ठेवून गेला तो—
माझंही आयुष्य मी मोजीत होतो
वळवाच्या पावसासारखं —
त्यात कधी ' मृगजळ '
डोळे धावायचे हरणासारखे पाठमोरे पहात
तो सूर्य आज तापला होता – संपला होता
मलाही माझे जाळं
विणता विणताच
संपवायचे होते – संपवायचे होते !

**रवींद्र पिसाळ**
तृ. व.–वाणिज्य

# Hazards of antibiotics

**Kavita Deshmukh**
T. Y. B. Sc. ( Zoolagy )

You visit a doctor someday with sour throat and slight fever and ask doctor to give some powerful drug. you are not ready to waste your time in suffering from illness and want immediate cure. In such situations doctor prescribes some higher antibiotic. Sometimes even patients themselves ask doctor to give antibiotics which are commonly used. Even common man knows today the names of antibiotics like septran, erythromycin, tetracycline, ampicillin, penicillin, streptomycin etc; he also knows their common uses. Or rather use of antibiotics is becoming a fashion amongst doctors and patients. Many therapeutically effective antibiotics are availble today in market and more are being added to this list. These antibiotics are substances produced by micro-organisms having the capacity of inhibiting the growth of or destroying other micro-organisms. Up to the 20th century man was completely away from this antibiotic field.

The short history of antibiotics is like this—Paul Ehrlich, an organic chemist demonstrated the efficacy of methylene blue in the treatment of malaria. ( 1891 ). Ehrlich introduced arsphenamine, the first effective chemotherapeutic agent and is called aptly as 'the father of modern chemotherapy.' For this he was awarded Nobel Prize in 1909. The idea of using one micro-organism to cure the infection caused by another was first suggested by Pasteur and Ioubret. In 1928, Sir Alexander Flemming, while studying staphylococcal variants, found one of his culture plates contaminated by a fungus ( later identified as **Penicillium** ) which prevented the growth of bacterial colonies. He cultivated the fungus in a broth and showed that the filtrate, which he named 'Penicillin', inhibited the growth of a number of Gram positive organisms. This compound was nontoxic to animals and was used in 1941, during the 2nd World War as a potent anti-infective agent. Penicillin saved life of thousands of people. Since then various antibiotics were discovered, made man possible for curing fatal diseases like tuberculosis, diphtheria etc. This discovery of man is a great life saving weapon.

It is a basic thing that when micro-organisms invade our body, our defense system ( immune system ) is stimulated against them. The system produces antibodies which fight against the invaded organisms and kill them. All this process requires some time, which sometimes is fatal for the patient. By administration of antibiotics we produce artificial disturbances in vital processes of micro-organisms which ultimately destroy them. In such a way we provide readymade weapons to the patients body. In severe infections thus antibiotics are very useful and save the life. But when infections are small, i. e. they are within the capacity of patients immune system, administration of antibiotics leaves no work for immune system. In this way our immune system may become lazy as readymade wea ons are there in the body. Due to this there is every possibility of decrease in capacity of producing antibodies by defense system. In such a way our resistance against diseases decreases.

During last few years detail study of antibiotics, their use and side effects was done by various scientists. And all of them came to the same conclusions that frequent use of antibiotics is hazardous to our health. Due to this in Russia the use of antibiotics is completly banned, except in special cases it is allowed. Instead the doctors use another therapies like vitamin therapy, mild drug therapy etc. We may think that this is a funny thing but they are one step ahead of us because they are saving people from hazards of antibiotics which may be more serious than disease itself. By treating with other therapies they first improve the patients health and then allow patient's body itself to fight against the disease. In other advanced countries like U. S. A and Japan doctors generally avoid antibiotics when other pathways of cure are available.

Few, very commonly observed hazards of antibiotics are as follows :

**( i ) Allergic and anaphylactic reactions :**

Allergy to penicillin is very common. Some persons even die due to violent anaphylaltic reaction after administration of a single dose. Therefore patients are first tested for the sensitivity.

**( ii ) Development of super-infections :**

Antibiotics destroy only susceptible organisms in the body leaving the resistant strains to multiply. Organisms like yeasts, Staphylococci which are resistant to common antibiotics develop very fast to produce super-infections which are very difficult to treat. These super-infections are sometimes fatal and occur more when large doses of two broad spectrum antibiotics are given simultaneously.

**( iii ) Development of super-infections :**

Some organisms in intestinal tract are harmless and are known to synthesize some vitamins of B complex series like folic acid and also vitamin K. Antibiotics destroy this bacterial flora and may cause deficiency of there vitamins.

**( iv ) Hazards during pregnancy :**

Certain antibiotics when taken during the pregnancy produce disorders in foetus. Antibiotics like Septran and Bactrim produce variety of congenital disorders.

Gentamycin, Neomycin and Streptomycin have been associated with kidney damage and hearing defects in the foetus. Therefore during pregnancy antibiotics are generally not prescribed.

**( v ) Development of resistant strains :**

Due to often use of antibiotics, and their wrong doses, resistant strains of bactaria are developed. Resistance to antibiotics results in mutations in the DNA which is genetic material. It is possible however, for fragments of DNA carrying genetic information, which may include antibiotic resistance, to be transferred from one bacterial cell to another to develop a complete resistant strain. The commonly observed examples of bacterial resistance are—Chloramphenicol ( Streptomycin ) resistant strains of typhoid bacteria **Salmonella typhi,** penicillin resistant staphylococci etc. The problem of bacterial resistance in hospitalized patients is very great. This can be reduced by using antibiotics when necessary.

**( vi ) False security :**

When there is no correct diagnosis, physicians fool by giving higher antibiotics. The use of antibiotics give false security so both the patients and the physicians. The patient wastes his money in buying costly drugs though they are not within his financial conditions. These antibiotics are otherwise useless. While due to delay in correct diagnosis patient suffers more.

**( vii ) Toxic effects :**

Toxic effects may range from minor symptoms like drowsiness to potential fatal damage to the liver, kidneys, brain, bone marrow ete. Some toxic effects are more serious than the diseases under treatment. Antibiotics like sulphonamides are known to produce thromboiytopenic purpura, perheps following a single dose. Some are known to produce aplastic anaemia, kidney damage, drug jaundice etc. Some are even known to be teratogenic ( Cancer inducing ). Some may cause heart failure due to thrombo-embolism. In uraemic patients administration of antibiotics like tetralyclines are the cause of increase in blood urea because such drugs increase protein catabolism. Such patients cannot excrete large quantities of protein metabolites. Thus before using any antibiotic history of patient is very important.

The present total consumption of antibiotics in relation to the known incidence of infections is very much in excess, indicating that antibiotics are many times misused. This obviously would creat many problems as discussed above. Therefore antibiotics should be used with caution. A gun should not be used when a rifle would be better. An exact diagnosis permits the use of aspecific agent which is possible with various Laboratory tests, instead of a 'wide spectrum' antibiotic which the physician hopes will bring down the target that he cannot see. The risks involved in the use of an antibiotic should be weighed against the seriousness of the disease to be treated and the possibility of treating the condition with another drug should be considered. We must at all times be alert to the possible occurrence of an adverse reaction. If any adverse effect is observed the drug should be withdrawn immediately and another drug should be chosen. Lastly, it is very dangerous to use antibiotics now and then with the hope of giving quick benefits of chemotherapy to patients because they demand for it.

# Break Away Moon

**Avinash Sudhakar Foujdar**
T. Y. B. Sc. ( Physics )

Could the moon have split off from earth's mantle 4.5 billion years ago when the planet was still semi molten ? This old theory has been revived by new evidence.

German astrochemist Heinrich Wauke has recently shown that the moon shares certain properties with the earth's mantle such as tungsten deficiency. When the planet was semi molten, theorists suggest, tung sten ( under high pressure ) combined chemically with the heavy element iron and sank towards the earth's core, causing the planet to rotate so fast that a day may have lasted only two and a half hours. A large bulge then formed in the mantle and eventually tore away. This new mass, like the earths crust and mantle, would be low in tungsten. Further a deficiency in tungsten could not have developed independently on the moon because the pressures within it are not high enough.

Previously, this breakaway theory was condemned because of dynamical difficulties. If tne moon ( about 1% earth's mass ) broke off, its angular momentum would have been so great that it would have flown away. ( The angular momentum of an orbiting object is the product of its mass, speed and distance from the centre of rotation. ) NASA geophysicist John O' Keefe has shown that more of the earth's mass-perhaps 10%-may have split off. The bulk of this mass did escape into space. Only the moon remains.

Another criticism deals with the moon's orbit throughout its past. Since scientists know the moon's current orbit and the rate at which the orbit is slowing down and increasing in diameter, they can trace the evolution of its orbit backward in time. By this method, it was once calculated that the moon's initial orbit could not have been in the equatorial plane of the of the earth. But a chunk of the earth could have broken off only from the equator. Yet recently along with Robert Haringfor at the U. S. Naval Observatory, T. V. F. traced the moon's orbit backward and discovered an instability point. Before that time, the orbit could have been either in or out of the equatorial plane. They then traced the orbit forward, assuming the moon broke off from the equator, and they arrived at the moon's current orbit.

# पुणे–महाड–महाबळेश्वर सायकल-भ्रमण

**अरविंद वि. गायकवाड,** तृतीय वर्ष-वाणिज्य

सायकलचा प्रवास म्हटला की अनेकजण घाबरत असतात. कारण त्यांना सायकल–प्रवासाचा असा काही जास्त अनुभव नसतोच, फक्त शहरात वेडीवाकडी सायकल चालवणे एवढेच त्यांना माहीत असते. परंतु सर्वजण वरील प्रकारचे असतात असेदेखील नाही. तर काही व्यक्तींना सायकल–भ्रमणाची फार आवड असते. परंतु आपण ज्या ठिकाणी जाणार आहोत त्या ठिकाणापर्यंत पोहचू शकू का? असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहतो. तर काही जणांच्या बाबतीत घरातील व्यक्ती, मुलांच्या अंगी असलेल्या धाडसी गुणांना वाव देत नाहीत. आजच्या परिस्थितीचा जर विचार केला तर सायकलचा प्रवास हा सुखकरच म्हटला पाहिजे. लोक एस. टी.ने जातात; परंतु झालेली भाववाढ ही त्यांना भेडसावतच असते. प्रत्यक्षात त्यांना निसर्गाचा खराखुरा आनंद मुळी घेताच येत नाही.

थोडासा पुढील विचार केला तर सायकल–प्रवासासाठी जास्त काही साहित्यदेखील लागत नाही. १ हॅवर सॅक, चप्पल अगर बूट, ग्रुपमध्ये वॉटर बॅग, चाकू, कातरी, कोयता, दोरी इ. असले म्हणजे झाले. तसेच झोपण्यासाठी सतरंजी, चादर, ब्लॅन्केट, प्रथमोपचार साहित्य इ. असले म्हणजे झाले. तसेच पंक्चरचे सायकलीसाठी असलेले साहित्य व खाण्यासाठी शेंगदाणे, गूळ, चिक्की, कांदे इ. असले म्हणजे झाले. आता हे झाले प्रवासाचे साहित्य. आता जो प्रवास केला त्याबद्दल थोडीशी माहिती तुम्हाला देतो. साहजिकच या प्रवासवर्णनाद्वारे तुम्हालाही सायकल-भ्रमणाची आवड निर्माण होईल. तसे पाहिले तर या प्रवासात ४–५ व्यक्ती असल्या म्हणजे प्रवास अतिशय सुखकर होतो.

डिसेंबर महिन्याच्या अगोदरपासून आम्ही याबाबत विचार करीत होतो. उन्मेष, संजय आणि मी. आम्ही तिघांनी मनाचा निश्चय करून १ डिसेंबरला निघण्याचा निश्चय केला. १ डिसेंबरला घरातील लोकांचा निरोप घेऊन निघालो. आम्हा तिघांच्या चेहेऱ्यावर आनंद दिसत होता. हॅवर सॅक सायकलमागे लावल्या होत्या. अशा रीतीने आम्ही बरोबर संध्याकाळी भोर येथे ७ वाजता पोहचलो. भोरला जाताना ‘भाटघर’ धरणाचा देखावा खूपच सुंदर दिसत होता. नुकताच सूर्य मावळतीला चालला होता. आणि जणू काही पाण्यावर कोणी तरी आमच्या स्वागतासाठी गुलाल पसरला आहे असे वाटत होते. पश्चिमेकडे ‘राजगड’ दिसत होता. थोड्याच वेळात आम्ही भोर एस. टी. स्थानकावर आलो. भोरमध्ये संजयच्या आत्याच्या घरी मुक्काम केला. तेथे रात्री भुईमुगाच्या शेंगांमध्ये झोपण्याचा आनंद लुटला. सकाळी लवकर ५ वाजता उठलो. कालचा थकवा सगळा नाहिसा झाला होता. सकाळी संजयच्या आत्याने आम्हाला भुईमुगाच्या शेंगा उकडून वाटेत खाण्यास दिल्या. सकाळी आंघोळ न करता वरंधा घाटाच्या दिशेने पलायन केले. थोड्याच वेळात चक्र फटफटले. पूर्वेच्या दिशेने सूर्य परत गुलाल उधळीत आमच्या स्वागतासाठी वर येऊ लागला. नंतर थोडयाच वेळात ‘हिरडोशी’ या गावी थोडा वेळ थांबलो. हळूहळू दुपार झाली. उन्हाचे चटके जाणवू लागले व आम्ही बरोबर एक वाजता संपूर्ण घाट चढून वर माथ्यावर आलो. खूपच दमल्यासारखे वाटत होते. परंतु प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर आनंदाचे हास्य होते. तेथे थोडा वेळ विश्रांती घेतली,

ब्रेक तपासले व घाट उतरण्यास सुरुवात केली. थोडयाच वेळात 'वाघजई' मंदिराजवळ येऊन थांबलो. तसेच शिवथर घळईचे लांबूनच दर्शन घेतले व पुढे घाट उतरण्यास सुरुवात केली. थोडयाच वेळात 'रायगड जिल्ह्याचे' खरे रमणीय दृश्य दिसले. समोर रायगड, राजगड, तोरणा या किल्ल्यांचे दर्शन झाले. सह्याद्रीच्या खऱ्या कणखर अशा दगडांच्या रांगांचे दर्शन घेऊन आम्ही महाडच्या दिशेने जाण्यास सुरुवात केली. थोडयाच वेळात 'माझेरी' गाव लागले. माझेरीनंतर बिरवाडी जवळ असलेल्या भावे नदीत आम्ही आंघोळी केल्या. कपडे धुतले व पुढे निघालो. थोडयाच वेळात 'महाड' हे गाव आले. लहानसे गाव असल्याने त्या दिवशी रात्री बाजार-पेठेतून फिरून आल्यानंतर तिथेच मुक्काम केला.

आमच्या प्रवासाचा तिसरा दिवस. ३ डिसेंबर. घरच्यांची ओढ जाणवू लागली. सकाळी ६ वाजता महाड सोडले व मुंबई–गोवा या महामार्गाने पोलादपूर या गावी ७ वाजता आलो व तेथूनच महाबळेश्वरच्या 'आंबेनळी' या घाटाने जाण्यास सुरुवात केली. दुपारी प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेला 'वाडा' या गावी पोहचलो. तेथून पुढेदेखील संपूर्ण घाटच होता. प्रतापगडचे दर्शन घेऊन आम्ही महाबळेश्वरात रात्री ८ वाजता पोहचलो. हवेत गारवा जाणवू लागला. रात्रीच्या बोचणाऱ्या अशा थंडीत 'डिस्को' संगीताचे आवाज, हॉटेलांची शांत अशी रंगीबेरंगी लाईट. तसेच रस्त्यावर फिरायला निघालेली जोडपी. काहीसे आनंददायी अशा प्रकारचे दृश्य वाटत होते. नंतर एस्.टी. स्थानकावर आलो. त्या दिवशी लॉज-मध्येच मुक्काम केला.

४ डिसेंबर. सकाळी लवकर उठून ऑर्थरसेट, पंचगंगा मंदिर, विल्सन, बॉम्बे पॉइंट, सायकलवरून जाऊन पाहिले व सकाळी ११ वाजता महाबळेश्वर एस्.टी. स्टँडवर नास्ता करून पांचगणीच्या दिशेने निघालो. 'पांचगणीला' थोडीशी विश्रांती घेऊन 'वसरणी' घाटाने 'वाई' येथे आलो. तेथे असलेल्या प्रसिद्ध गणपतीचे दर्शन घेतले व वाईमध्ये असलेल्या ओळखीच्या ठिकाणी गेलो. दुपार झाली होती. पुढचा मुक्काम 'शिरवळ' येथे करण्याचे ठरविले. दुपारी वाईमध्ये जेवण करून पुढील प्रवासास जाण्यास निघालो. घाटापर्यंत रात्र झाली. रात्रीच खंबाटकी घाट चढून शिरवळ येथे १० वाजता आलो. शिरवळला रात्रीचे जेवण केले व तेथेच मुक्काम केला.

५ डिसेंबर. सकाळी लवकर उठून पाहातो तर माझ्या गाडीची हवा गेली होती. पंक्चरचे साहित्याने पंक्चर काढली व पुण्याच्या दिशेने येण्यास सुरुवात केली. दुपारी १२ वाजता 'नसरापूर' येथे आलो. जाता जाता 'बनेश्वर' या मंदिराचे दर्शन केले व कात्रज घाट चढून बोगद्यापर्यंत आलो. पुण्यनगरीचे दर्शन आम्हाला झाले. आपण काही-तरी करून दाखवले याचा अभिमान प्रत्येकाला वाटत होता. नंतर थोड्याच वेळात आम्ही घाट उतरून पुण्य-नगरीमध्ये येऊन दाखल झालो. तर ही आमची छोटीशी ट्रीप, परंतु धाडशी अशा प्रकारची. हा माझा लेख वाचून आपल्या मनातदेखील विचार आला असेल— कोठेतरी सायकलवर प्रवासास निघावे. आता आमचा पुढचा प्रवास म्हणजे पुणे–गोवा. तर मग आपण येता ना आमच्या बरोबर !

♠

---

# मुसाफिर

बिछुडकर तुम से हम
चल दिये हम
आँसुओं से भीगा दामन
कल जो साथ थे
आज उसीका है गम।

**उदय दिण्डोरकर, तृ. वर्ष–साहित्य**

# कारट्याळी

घनश्याम कारट्या उठी रे गजर हा आठाचा झाला
उठी लवकरी कारट्या दारी बेकरीवाला आला
हाती पेपर घेऊनिया नवरे ढिम्म बसूनी राहती
त्याच पेपरासाठी आया मुलांना खोळंबुनि ठेविती
उठी झडकरी कारट्या लवकरी चहाबटर भक्षी
पोरी निघाल्या आजूबाजूच्या नीघ तूही ठेवूनी 'बिंदू' ला साक्षी.

**दीपक मेणकुदळे, ११ वी–शास्त्र**

# रक्तदान म्हणजेच जीवनदान

**संजय सु. प्रधान**, द्वि. वर्ष—वाणिज्य

जग शास्त्रज्ञामुळे जवळ येते त्यापेक्षाही प्रेमाने आणि स्नेहाने जास्त लवकर जवळ येते. आणि हे स्नेहाचे संबंध जास्त दृढ होतात ते रक्ताच्या नात्याने. रक्ताच्या नात्याने अवघ्या जगामध्ये विश्वबंधूतेची कल्पना साकार होते. ते आजच्या युगातील पुण्यकर्म—म्हणजेच रक्तदान होय. माणसाला जीवनामध्ये आसक्ती आणि प्रेम, तो जसा मोठा होतो तशी वाढत जाते. या जगामध्ये सुखाने राहण्याची पराकाष्ठा करूनही काही वेळा बाधा येते ती एखाद्या दुर्घटनेने, जर्जर रोगाने. त्यावेळेस रक्तदानाचे महत्त्व पटते. जीवनाच्या या भ्रमंतीमध्ये माणसाला एकच गोष्ट करण्यासारखी आहे. ती म्हणजे दुसऱ्या माणसाशी जडलेले नाते न विसरणे. ही संधी आपल्याला रक्तदानामुळे मिळते.

'रक्तदान म्हणजे जीवनदान' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एखाद्याची आपण अन्न-वस्त्राची गरज सहज भागवू शकतो. परंतु एखाद्यास जिवंत राहाण्यासाठी रक्ताची अवश्यकता असते. ती आपण सहजासहजी भागवू शकत नाही. कारण रक्त हे कृत्रिम रितीने तयार करू शकत नाही किंवा प्राण्यांकडून घेऊ शकत नाही. माणूस माणसालाच रक्त देऊ शकतो.

या आधुनिक काळात जीवन फार धोक्याचे झाले आहे. वाहतुकीची किंवा कारखान्यातील यंत्राची साधने माणसाला जशी तारक त्याप्रमाणे मारकही होतात. यातून दररोज हजारो अपघात होतात. अशा वेळी एखाद्या अपघाती माणसाला रक्ताची आवश्यकता असते. परंतु कित्येकदा त्यांना रक्ताअभावी जीवनास मुकावे लागते. विशेषतः युद्धाच्या प्रसंगी रक्ताची जरुरी फार मोठ्या प्रमाणावर असते, युद्धात जखमी झालेल्या जवानांना रक्त देऊन त्यांना देशाच्या रक्षणासाठी तत्परतेने पूर्ववत करणे अत्यंत आवश्यक असते. परंतु काही वेळा ते शक्य होत नाही. आपण विचार केला तर आपल्या देशाची इतकी प्रचंड लोकसंख्या असताना जवानांना किंवा अपघाती व्यक्तींना रक्ताअभावी प्राणाला मुकावे लागते. याचे कारण प्रत्येक नागरिकाने अंतःर्मुख होऊन शोधून काढले पाहिजे.

आपण जरा अंतःर्मुख झालो तर असल्या समस्यांवर आपण मात करू शकतो व त्या कोणत्या आहेत याचा आपणास बोध होईल. रक्तदानाबद्दल जे गैरसमज आहेत, त्याला अगदी सुशिक्षित लोकसुद्धा अपवाद नाहीत. म्हणून रक्तदानासंबंधी समाजामध्ये कोणत्या गैरसमजुती आहेत व त्या कशा दूर कराव्यात, त्यासाठी कोणत्या मार्गाचा, पद्धतीचा अवलंब केला पाहिजे ही चर्चा इथे करणे उद्‌बोधक ठरेल.

समाजामध्ये रक्तदानाविषयी महत्त्व पटवून द्यायचे म्हणजे नेमके काय करायचे ? असा प्रश्न लोक विचारतील. म्हणून आपण रक्तदानाविषयी किंवा रक्तदानाच्या कार्यक्रमाचे महत्त्व काय या संबंधात विचार करू.

आपण कॉलेज-विद्यार्थी असल्याने प्रामुख्याने या क्षेत्रासंबंधी विचार करू व त्याची अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येकजण पुढाकार घेऊ. प्रत्येक कॉलेजमध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त 'समाज सेवा' संघटना असतात. त्यांच्या अनेक प्रकारच्या सामाजिक सेवेच्या योजना असतात. त्याप्रमाणे रक्तदानाच्या कार्यक्रमाची योजनासुद्धा असते. परंतु रक्तदानाच्या कार्यक्रमास म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही; कारण कार्यक्रमासंबंधीची योजना आयत्या वेळी किंवा चुकीच्या पद्धतीने केलेली

असते. खालील पद्धतींचा अवलंब केल्यास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळेल. कॉलेजमधील समाजसेवी संघटनेने कार्यक्रमाच्या आधी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट करणारे व्याख्यान आयोजित करावे. त्या द्वारे विद्यार्थ्यांमधील रक्तदानासंबंधी असणारे गैरसमज दूर होतील. त्यातून विद्यार्थी स्फूर्ती घेऊ शकेल. व्याख्यान आयोजित केल्या-नंतर या कार्यकर्त्यांनी कॉलेजमधील वर्ग-नायकाशी संपर्क साधून किंवा त्यांची एकत्रित बैठक बोलावून, प्रत्येक विद्यार्थ्यास या कार्यक्रमाची माहिती पोहोचेल अशी योजना आखावी. कार्यक्रमासंबंधी पत्रके काढून ती प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था करावी. अशा प्रकारे कार्यक्रमाच्या योजनेचा सर्वत्र प्रचार झाल्यास खात्रीने यश मिळेल. दोन वर्षांपूर्वी ससून हॉस्पिटलने कोणत्या कॉलेजमध्ये जास्त रक्तदान होते अशी स्पर्धा आयोजित केली होती आणि या कार्यक्रमास भरघोस असा प्रतिसाद मिळाला होता. अशा प्रकारे कार्यकर्त्यांनी परस्पर कॉलेजमध्ये स्पर्धा आयोजित केल्या पाहिजेत.

वरीलप्रमाणेच समाजाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये रक्त-दानाविषयी विचार होणे आवश्यक आहे. समाजामध्ये रक्तदानाचा प्रचार होण्यासाठी किंवा लोकांना यासंबंधी त्यांचे कर्तव्य समजावण्यासाठी प्रामुख्याने शासन-यंत्रणेचा वापर होणे जरुरीचे आहे. आधुनिक काळात ग्रामीण किंवा शहरी नागरिकांवर दूरदर्शनचा खूप प्रभाव आहे. तर त्या द्वारे रक्तदानाचे महत्त्व समाजाला पटवून देणे सोपे होईल. विशेषतः ग्रामीण भागांमध्ये सिनेमा हे करमणुकीचे साधन खूप लोकप्रिय होऊ लागले आहे; तर अशा अशिक्षित समाजाला रक्तदानाविषयी महत्त्व पटवून देणाऱ्या फिल्म्स दाखविल्यास अनुकूल परिणाम दिसेल.

आपल्या देशामध्ये अनेक समाजसेवी संस्था, प्रतिष्ठाने, धार्मिक मंडळे आहेत, तर अशा संस्थांनी रक्तदाना-विषयी पुढाकार घेणे अत्यंत आवश्यक आहे.

आपणापैकी प्रत्येकजणाला मोठा देशभक्त, समाजसेवक होता आले नाही तरी आपले बहुमूल्य असे रक्ताचे दान देऊन आपल्या देशबांधवाला जीवनदान देऊ शकतो हे विसरता कामा नये. जीवनदानाप्रमाणेच रक्तदानाने अनेक सामाजिक बदल घडवून आणणे सोपे होईल. कारण रक्त देणारा किंवा घेणारा हा जातपात बघत नाही. तो त्याच्याकडे माणुसकीच्या दृष्टीने बघत असतो. त्यातूनच आपल्या भारताला लागलेल्या अस्पृश्यतेचा कलंक आपण रक्तदानाने पुसून टाकू. यातून बंधुभाव निर्माण होतो. प्रांताच्या सीमा येथेच पुसल्या जातात. अशा रक्त-दानाची तुलना दानशूर कर्णाशी केल्यास वावगे ठरणार नाही. म्हणूनच ' रक्तदान म्हणजेच जीवनदान ' होय, हे लक्षात येईल.

♣

---

## जमाना

दिन-रात खून-पसीना बहाया,
फिर कहीं एक वक्त की रोटी पाया,
कभी आजादी के गीत न गा पाया,
वोट पाने तक बहलाया, फिर भुलाया,
देखो, आया तो क्या जमाना आया !
पैसा पाया तो छल-छलावे से पाया,
बजेट पर सबको महँगाई में भुलाया,
टॅक्स आदि के लिए बहाना बनाया,
फिर भी पैसों के पर से उड न पाया,
देखो, आया तो क्या जमाना आया !

**सुशील पाण्डेय,** ग्यारहवीं–वाणिज्य

## आल्पेश पंड्या

कालपर्यंत जो हसत खेळत होता आमच्यामध्ये
आता पुन्हा कधी तो दिसणार नाही !
सुंदर हासरे रूप ज्याचे, लोभसवाणे, नक्षत्रासारखे
काळाआड झाले, चटका लावून गेले !
जणू सूर्य अस्तास गेल्यावर अंधाराने जग ग्रासून जावे
पुन्हा कधीही न मिटणारी अमावस्याच ही झाली एक !
परतणार नाही तो पुन्हा कधीही
दिसणार नाही त्याचे हसरे देखणे रूप
नियतीच्या कठोरपणाचा हा आघात
असा आमच्या स्नेह्यावरच का पडावा ?

**सुकेतु नागरेचा,** ११ वी शास्त्र

# दुसऱ्या पृथ्वीवर

गिरीश देसाई, प्रथम वर्ष-शास्त्र

राकेश शर्मा, रवि मल्होत्रा दोघे काही महिन्यांपूर्वी रशियाला अंतराळसफरीच्या प्रशिक्षणासाठी आले होते. या दोहोंपैकी पहिला एकजण भारताचा पहिला अंतराळवीर ठरणार होता; परंतु हे भाग्य अखेर भारतीय विमानदलातील स्क्वाड्रन लीडर राकेश शर्माच्या नशिबी आले. त्याची निवड झाल्यावर अनेकांनी त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. त्याचा सहकारी मल्होत्रा यानेही त्याचे अभिनंदन केले. 'जेव्हा एक जण जिंकतो, तेव्हा आपोआपच दुसरा हरतो' ह्या जगाच्या नियमाला मल्होत्रा तरी कसा अपवाद असणार?

मॉस्कोच्या त्या अतिभव्य स्पेस-सेंटरवरून दुसऱ्या अग्निबाणाचे उड्डाण होणार होते. अग्निबाणाच्या अगदी टोकावर सर्व सुखसोयींनी युक्त असलेले यान बसविले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी, राकेश शर्मा अंतराळवीराच्या पोषाखात मोठ्या दिमाखात, स्पेस-सेंटरच्या प्रांगणात आला. तुडुंब भरलेल्या गर्दीच्या शुभेच्छांचा स्वीकार करीत तो पुढे निघाला, छायाचित्रकारांच्या कॅमेऱ्यांचा नुसता किलकिलाट होत होता. अखेर १२० फूट उंचीच्या अग्निबाणावर बसविलेल्या यानात राकेश स्थानापन्न झाला व उड्डाणाची प्रतिक्षा करू लागला. काही वेळातच प्रचंड स्फोट व त्याचबरोबर प्रचंड आवाज करीत, आग ओकीत, तितक्याच प्रचंड वेगाने अंतराळाचा वेध घेत अग्निबाण झेपावले. यानातील सर्व यंत्रणा नीट काम करीत होती. खूप उंचीवर गेल्यावर राकेशला बरेच जड वाटू लागले. त्याच्यावर आता गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव पडू लागला होता. त्याला रक्त म्हणजे पारा व शरीर म्हणजे शिशाचा गोळा वाटू लागला. थोड्याच वेळात यान पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेर पडले व ठराविक उंचीवर येऊन पोहोचले. अग्निबाणाचे काम आता संपले होते व ते अपेक्षेप्रमाणे यानापासून विलग झाले व अंतराळात लोप पावले. राकेश आता वजनरहित अवस्थेत होता. त्याचा प्रवास आता खऱ्या अर्थाने सुरू झाला. बाहेर पृथ्वी चेंडूप्रमाणे गरगरीत व निळी शाल पांघरल्याप्रमाणे सुंदर दिसत होती. पृथ्वीभोवती आता पाऊण प्रदक्षिणा झाली. एवढ्यात चेंडूप्रमाणे भासणारी पृथ्वी लहान लहान भासू लागली. सर्व दर्शकांचे काटे हवे तसे फिरत होते. संदेशवहन बंद पडले. यानाला कोणीतरी एक विशिष्ट शक्ती खेचून घेत होती. राकेश आता पूर्णपणे हवालदील झाला.

इकडे पृथ्वीचे व यानाचे संबंध तुटले होते. यानाला जबरदस्त वेग प्राप्त झाला होता. शर्मा काहीही करू शकत नव्हता.

आता बराच वेळ झाला होता. एवढ्यात आळसावलेला राकेश एकदम भानावर आला. समोर एक निळ्या रंगाचा ग्रह दिसत होता. हा ग्रह पृथ्वीपेक्षा जरा मोठा परंतु रंगाने सारखाच होता. यान त्या ग्रहाच्या गुरुत्वाकर्षण कक्षेत सापडले व वेगाने खाली जाऊ लागले. तत्क्षणी राकेशने पुनः यानावर नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला व काय आश्चर्य! यान पूर्णपणे त्याच्या नियंत्रणाखाली आले. अखेरीस यान त्या ग्रहावर सुखरूप टेकले.

...जवळ जवळ पाच-सहा तासांनंतर जेव्हा शर्माने डोळे उघडले, तेव्हा त्याला क्षणभर, आपण पृथ्वीवर तर आलो नाहीत ना! असे वाटले. समोर दाट झाडी

होती व योगायोगाने 'यान' एका मोकळ्या मैदानात उतरले होते. शर्मा मग हळूच खाली उतरला व पुढे चालू लागला. सहज म्हणून त्याने चेहेऱ्यावरील 'मास्क' काढला व काय आश्चर्य! तेथील हवा (वायू) थेट पृथ्वीप्रमाणे होती. उलट ती किंचित उत्साहवर्धक व शुद्ध होती. बहुधा त्यात ओझोन ($O_3$)चे प्रमाण जादा असावे. तेथील तापमान पृथ्वीच्या तापमानाशी मिळतेजुळते होते. त्या ग्रहावरून तेथील तारा आपल्या सूर्याप्रमाणेच भासत होता. तो तसाच पुढे निघाला. तेथील झाडांची पाने, पृथ्वीवरील सायकस (Cycus) व नेच्याप्रमाणे होती. फरक एवढाच की ती आकाराने जरा मोठी होती. तो चालता चालता जंगलाच्या शेवटपर्यंत येऊन ठेपला. पुढे मैदान होते व मैदानात एक भीषण, अंगाचा थरकाप उडविणारे दृश्य घडत होते.

कांगारूप्रमाणे दिसणारे, मगरीप्रमाणे पाठ असलेले लांब व दणकट शेपूट असलेले व १०० ते १५० फूट उंच असलेले, दोन महाभयंकर प्राणी एकमेकावर तुटून पडत होते. जबरदस्त प्रहारांमुळे त्यांची कातडी सोलवटून निघाली होती. अखेर बऱ्याच वेळ चाललेल्या या लढाईनंतर दोघेही निपचित पडले.

राकेश हे सर्व एका झाडाआडून पाहत होता. तेवढ्यात त्याला काहीतरी आठवले, ते प्राणी अगदी जीवशास्त्राच्या पुस्तकातील डिनोसॉरप्रमाणे होते. मग राकेशच्या डोक्यातील विचारचक्र सुरू झाले. "या ग्रहावर सायकस-नेच्याप्रमाणे वनस्पती आहेत. डिनोसॉरप्रमाणे भीमकाय प्राणी आहेत, येथील हवामान सजीवसृष्टीस अनुकूल आहे. म्हणजे या ग्रहावर सजीव सृष्टीची नुकतीच कुठे सुरुवात झाली असावी. देवाची करणी अगाध आहे. मी अंतराळात भटकत होतो व नशिबाने मला या 'दुसऱ्या पृथ्वी'वर आणून ठेवले.

शर्माने मग काहीही विचार न करता पायपीट करण्यास सुरुवात केली. त्याला आता समजून चुकले होते की आपण पुनः पृथ्वीवर जाऊ शकत नाही. कारण या अब्जावधी ताऱ्यांच्या पसाऱ्यात आपण सूर्य कुठे शोधणार व पृथ्वीवर जाण्याची गोष्टच दूर राहिली. अशा रीतीने विषण्ण मनाने आपल्या मायभूमीपासून दूरवर राकेश शर्मा नामक एक युवक आपला, दुसऱ्या ग्रहावरील पहिला दिवस कंठीत होता.

रात्री राकेश पुन्हा आपल्या यानाकडे परतला व लगेचच झोपेच्या स्वाधीन झाला. तो कित्येक मैल दूर होता; परंतु त्याचे मन क्षणार्धात पृथ्वीवर येऊन पोचले. पृथ्वीवरील लोकांनी त्याची आशाच सोडून दिली होती.

दुसऱ्या दिवशी देखील राकेश असाच फिरला. त्याला नवनवीन छोटेखानी प्राणी दिसले. त्याने त्या दिवशी नवीन प्रदेश बघितला. मग तो लवकर परतला व जे काही कागद होते त्यावर त्याने काहीतरी लिहिण्यास प्रारंभ केला. ती रात्र त्याने जागून काढली व पृथ्वीपासूनचा आपला प्रवास ते आजचा दिवस इथपर्यंत सर्व काही लिहिले. तसेच त्या ग्रहाची माहितीदेखील त्याने लिहिली.

दुसऱ्या दिवशी, दिवसभर फिरून राकेशने तेथील झाडांच्या फांद्या, पाने, फुले, फळे, मेलेल्या प्राण्यांचे अवशेष गोळा केले. त्या ग्रहावरील दगड, मातीदेखील त्याने गोळा केली व ते सर्व त्याने यानात व्यवस्थित ठेवले. हे सर्व करताना तो तेथील फोटो घ्यावयाचे विसरला नाही. अशा रीतीने त्या ग्रहाची बहुतांशी माहिती राकेशने यानात भरली. आता वाटले की हे यान पुन्हा राकेशला घेऊन निघणार. परंतु राकेशने तसे केले नाही. त्याने यान सुरू केले व स्वतः खालीच राहिला. थोड्याच वेळात ते यान प्रचंड वेगाने त्याच्यापासून दूर निघून गेले.—थेट अंतराळात. सतत सातआठ दिवस साथ देणाऱ्या त्या निर्जीव मित्राचा राकेशने भावपूर्ण रीतीने अश्रू ढाळीत निरोप घेतला.

राकेशला वाटले की, हे यान फिरत फिरत कदाचित माझ्या पृथ्वीवर जाईल. तेथील शास्त्रज्ञ त्यातील वस्तूंचे निरीक्षण करतील व कदाचित मला पृथ्वीवर परत नेतील. समजा, मी जर यानाबरोबर गेलो असतो आणि काहीही न घडता ते नुसतेच फिरत राहिले असते तर माझा अंतःकाळ दूर नसता. त्यापेक्षा मी जर या ग्रहाला पृथ्वी मानून येथेच राहिलो तर काय बिघडले? शिवाय येथे मी निश्चितच माझे उरलेले जीवन एकांतात का होईना पण जगू शकेन. शिवाय 'पृथ्वीची सुरुवात'देखील मला माझ्या डोळ्याने पाहावयास मिळेल.

ते यान अशा रीतीने ताऱ्यांच्या पसाऱ्यात पृथ्वी सापडेल हा एकच आशेचा किरण घेऊन निघून गेले. तिकडे पृथ्वीवरील मानव शर्माला विसरले व इकडे एका अज्ञात ग्रहावर पृथ्वीची आठवण काढीत राकेश एकाकी जीवन जगतोय, एकच आशा उराशी बाळगून की कदाचित मी पृथ्वी पुनः बघेन... ♠

# परग्रहावर वस्ती

श्रीकांत ठकार, द्वि. वर्ष-शास्त्र

साधारणपणे २०१३ साली भारतासारख्या महान देशाला लोकसंख्येसारखा प्रश्न भेडसावत होता. नुकताच (२०१० साली) अमेरिकेने वल्कन (Vulcan) हा ग्रह शोधून, त्यावर वस्ती करता येईल असा दावा केला होता. त्यामुळे बऱ्याच देशांतील लोक वल्कन या ग्रहावर वस्ती करून राहू लागले होते. भारतालाही लोकसंख्येचा प्रश्न भेडसावतच होता. भारतीय लोकांना तेथील हवामान मानवेल का? यावर अभ्यास करण्याकरता पाच भारतीय लोकांची नियुक्ती करण्यात आली. शीतल–१ हे Space Shuttle, भारताने जपानशी सहकार्य करून खास माणसांची ने-आण करण्याकरता बनविले होते आणि नुकतेच परग्रह खात्याच्या मंत्र्यांनी शीतल–२ व ३ या Space Shuttle बाबत रशिया व अमेरिकेशी बोलणी सुरू केली.

१९८३ च्या शेवटी भारतीय लोकांनी लावलेल्या महत्त्वपूर्ण शोधामुळे, आज बरेचसे लोक अंटार्क्टिकावर राहात आहेत. आणि अजूनही काही लोक तेथे जात आहेत. याबाबत भारतीय परग्रह खात्याने उदार धोरण ठेवले. त्यामुळे लोकसंख्येचा प्रश्न एक-शतांश एवढ्या प्रमाणात सुटू शकला.

शीतल–१ हे Space Shuttle सुटल्यानंतर दोन दिवसांनी त्यांचे मुंबईवर भूस्थिर असलेल्या उपग्रहाद्वारे संदेश येऊ लागले.

प्लीप्...प्लीप्...प्लीप्...प्लीप् आम्ही संदेश कोड करून घेण्यास तयार झालो—'वल्कन या ग्रहावर उतरण्यास आम्हास बराच त्रास पडला. कारण त्यावेळेस येथे –१०°C एवढे तपमान होते. नंतर जवळजवळ ६–७ तासांनी येथील धुके विरळ झाले. मग आम्ही येथे खास बनवण्यात आलेल्या अंतराळ तळावर उतरलो. तेव्हा आमचे स्वागत करण्यास येथील प्रमुख Robot (यांत्रिक मानव), आणि १० माणसे उपस्थित होती. आम्ही स्वागत कक्षात गेल्यावर आम्हाला 'इस्को' संगीत ऐकावयास मिळाले. कंप्युटर (Computer)वर बनवण्यात आलेल्या फॉर्म्युल्यानुसार फम् हे रमसारखेच पेय देण्यात आले. त्यामुळे आमचा बराच थकवा दूर झाला. नंतर आम्हास येथील Robot-City (रोबो शहर) दाखविण्यात आले. नंतर आम्ही आता विश्रांतीकरता जात असून, पुन्हा उद्या तुमच्याशी संपर्क साधू.'

दुसऱ्या दिवशी पुन्हा संदेश कोड करून घेण्याकरिता आम्ही उत्सुकतेने जमा झालो.

ब्लीप्...ब्लीप्...ब्लीप्...'काल आम्ही सुमारे ३ तास विश्रांती घेतली आणि एक आंतरराष्ट्रीय बैठक बोलावली. त्यास अमेरिका, रशिया, जर्मन, जपान इ. राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत आम्ही येथील हवामानावर चर्चा केली. येथील हवामान सरासरी –२°C एवढे असते. साधारणपणे वर्षभर, २४ तास रात्रच असते. पण एप्रिल आणि मे महिन्यांत दिवसातून ४–५ तासच सूर्याचे दर्शन होते. येथे बऱ्याच वनस्पती असून, त्या निळ्या आणि लाल रंगाच्या आहेत. त्यापासून येथील लोकांनी अन्न बनविले आहे. फॅट–८९ हेही एक नवीन पेय तयार केले आहे. ते प्याल्याने माणूस जाड होतो आणि त्याच्या अंगात हवा शिरते व तो Space-Suit न घालता फिरू शकतो.

नंतर आम्ही ग्रह पाहण्याकरिता येथे बनवलेल्या खास हेलिकॉप्टरमधून रवाना झालो. हेलिकॉप्टरमध्ये शेकडो मिनी कंप्युटर्सचे ( Mini-Computer ) जाळे पसरलेले होते. आणि हेलिकॉप्टरला चालक नसून ते Remote-Control वरील होते. आमच्या प्रत्येकाच्या खुर्चीसमोर एक टेबल होते. त्यावर बरीच बटणे होती. आम्ही बटण दाबताच आम्हाला फम् हे पेय ग्लासमधून यांत्रिक हाताने आणून दिले.

आम्ही ते enjoy करत असतानाच पुढे बसलेला अमेरिकन माणूस ओरडला, " Look there, what is coming towards us ? I think it is an UFO ! " ( unidentified flying object) सगळेजण धावून गेले. आणि सगळ्यांचीच त्रेधातिरपीट उडाली. कारण UFO आमच्याच दिशेने वेगाने येत होता. आणि हेलिकॉप्टरचे नियंत्रणही आमच्या हातात नव्हते. कारण हेलिकॉप्टर Remote-control वर होते. पण तरीही आमच्यातील एकाने खाली Contorl शी Transmeter वरून संपर्क साधला. दुसऱ्याने Computer वरून येणाऱ्या माहितीनुसार UFO चा वेग मोजला आणि तो Control ला कळविला. UFO वेगाने आपल्याकडे येतच होता. Controlला ही माहिती कळताच, त्यांनी तेथील Close-circuit-T.V.वरून UFO आणि आमच्यातील अंतर काढले व त्यांच्या असे लक्षात आले की, आता एकाच मिनिटात UFO हेलिकॉप्टरवर जाऊन आदळणार. सर्व Stop watches चालू झाली आणि सेकंद मोजू लागली. 60, 59 आमचा वेग त्यांनी बराच कमी केला. त्यामुळे हेलिकॉप्टर एकदम बरेच खाली आले. पण त्याच प्रमाणात UFO ही खाली येऊ लागल्याचे आमच्या लक्षात आले. आम्ही तसे लगेच कंट्रोलला कळविताच आमचा वेग त्यांनी अजून कमी केला. त्यामुळे आम्ही जमिनीपासून जवळ जवळ १०८—१५० फुटांवरच होतो आणि एवढ्यात आमच्या डोक्यावरून UFO जोरात निघून गेला. तो ज्या वेळेस आमच्या डोक्यावर होता, त्यावेळेस आमची सर्व Computer System बंद पडली आणि आमचे हेलिकॉप्टर समोरील क्रीडांगणावर जाऊन थांबले. परंतु पुन्हा UFO उलटे येताना दिसले. तेव्हा आमच्यापैकी काही जणांकडे लेसर बंदुका ( Laser guns ) होत्या. त्यांनी त्याच्यावर लेसर किरण ( Laser beam ) सोडले. त्यामुळे ते पुन्हा निघून गेले. आणि आम्ही सध्या येथे Control room-मध्ये सर्वजण त्या भयानक नाट्याची चर्चा करीत बसलो आहोत.

आता येथे बाहेर –५°C एवढे तपमान असून आमच्या खोलीचे तपमान १०°C एवढे ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एकदम ऊबदार वाटते. आपल्यापैकी डॉमनिक हा चार डायमेन्शनमध्ये तयार केलेला Rubik's cube घेऊन सोडवत आहे.' आणि ' कर्र...र्र ...ऽ...र्र ब्लीप्...ब्लीप्'...असा आवाज येऊन आमचा वल्कन या ग्रहाशी संबंध सुटला. आम्ही पृथ्वीवरून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागलो Hallo, Hallo, who is speaking there,... anybody there ? पण आम्हाला हे ठाऊक नव्हते की त्यांच्यावर पुन्हा UFO ने हल्ला केला.

आम्ही सर्वजण गप्पा मारीत बसलो होतो. तोच कंट्रोलवरील माणूस Close Circuit-T.V. कडे पाहात ओरडला, " Look there, some UFO's are coming towards us. They are landing there." या वेळेपर्यंत आम्ही सर्वजण T. V. जवळ जमा झालो होतो. तरीही तो ओरडतच होता, " Look what is coming out!' आणि एक विचित्र आकाराचा गोळा बाहेर पडला. त्यानंतर असे भयावह ४–५ गोळे बाहेर पडले. त्या गोळ्यांनी ओबडधोबड प्रमाणात मानवी आकार धारण केला. पुन्हा Control वरील माणूस ओरडू लागला, " Look, what shape they have ! They are coming towards our building. Oh ! They have broken the link between earth & ourselves. They are disturbing all our computer systems. " त्यामुळे आमचाही T. V. बंद पडला. मग आम्ही सर्वजण लेसर बंदुका घेऊन गच्चीवर गेलो. सर्वांनी त्यांच्यावर लेसर किरण सोडले. परंतु ते लेसर किरणांना दाद न देता पुढेच येत होते. परंतु त्यांचा जोर फार काळ टिकला नाही. कारण आम्ही लेसर किरणांची तीव्रता वाढवली होती. शेवटी त्यांनी हार मानली आणि ते शरण आले.

नंतर आम्ही लेसर किरणांचा मारा थांबविला. त्यांच्यातील असाच एक गोळा पुढे आला आणि त्याच्या शरीरातून निळा, पिवळा, तांबडा असे लाईटस् लागले. आणि ट्रिंग, टॉंग, डिंग असा आवाज आला. परंतु,

आम्हास काहीच उमग होऊ शकला नाही. मग आमच्यापैकी काही जणांनी खाली जाऊन Translater Robot आणला. ( भाषांतर करणारा यांत्रिक मानव ) मग पुन्हा त्या गोळ्याने पूर्वीप्रमाणेच लाईटस लावून आवाज केला. मग Robot ने ते मानवी भाषेत भाषांतर करून त्याच्या छातीवर बसलेल्या T.V. सारख्या display वर दाखवले.

" हा ग्रह आमच्या सूर्यमालेत मोडत असून, तो आमच्या मालकीचा आहे. तुम्ही जर त्यावर हक्क गाजवू पाहत असाल, तर तो आम्ही उध्वस्त करून टाकू. म्हणून आम्ही सर्वांनी तुमचा नाश करण्यापूर्वीच तुम्ही हा ग्रह सोडून जा. आम्हाला तुमच्याबद्दल मैत्रीभावच आहे. परंतु आमच्या सूर्यमालेत ढवळाढवळ केलेली आम्हास चालणार नाही. "

नंतर आमच्यातील प्रमुखाने त्या गोळ्याला उद्देशून रोबोला सांगितले, " आम्ही हा ग्रह सोडून जाण्यास तयार आहोत. परंतु तुम्ही आमच्या काही अटी मान्य केल्या पाहिजेत. आमच्या सूर्यमालेतील, पृथ्वीवर अधूनमधून UFO येतात आणि त्याचा त्रास होतो. तो पूर्णतः बंद झाला पाहिजे. शिवाय आम्हाला येथील सर्व आवरण्यास दोन दिवस लागतील. तेवढी मुदत आम्हास द्यावी. आम्ही आमची येथील सर्व कंप्युटर सिस्टिम ( Computer System ) तुम्हास सप्रेम भेट म्हणून येथेच ठेवत आहोत. ती operate ( चालविण्याकरता ) करण्याकरिता तुमच्यापैकी दोघांना आम्ही आज शिकवू. "

रोबोने हे सर्व निरनिराळ्या रंगाचे लाईटस् लावून आणि डिंग, डांग...असे आवाज करून त्या चित्रविचित्र गोळ्यास कथन केले. त्या गोळ्याने पुन्हा उत्तर दिले. ते असे, ' ठीक आहे. आम्ही तुमच्या पृथ्वीवर पुन्हा UFO येणार नाही याची खबरदारी घेऊ आणि तुमची कंप्युटर सिस्टिम समजावून घेण्याकरता मी व माझा एक सहकारी थांबेल. ' मग इतर चित्रविचित्र गोळे पुन्हा UFO तून निघून गेले.

मग आमच्यापैकी काही जणांनी कंप्युटर सिस्टिम समजावून सांगितली. आणि बरोबर दोन दिवसांनी प्रत्येकजण आपापल्या Space shuttle मधून त्यांच्या देशी गेले. या वेळेस आम्हाला निरोप देण्याकरता बरेच UFO आले होते आणि त्यांनी आम्हास निरोप दिला.

इकडे, पृथ्वीवर आम्ही दोन दिवस बेचैनीत काढले. पुन्हा ब्लीप्...ब्लीप्...असा आवाज येऊन, T. V. वर शीतल–१ स्पेस शट्ल दिसू लागले. ते पृथ्वीच्याच दिशेने येत होते. शीतल–१ च्या चालकाने आमच्याशी संपर्क साधला आणि वरील सर्व कहाणी कथन केली. नंतर त्याने त्यांना त्रास न देण्यास सांगितले. कारण ते पाचही जण दमले होते. मग त्याने Space Shuttle, Auto pilot वर सोडले व आमच्याशी संबंध तोडला.

नंतर जवळ जवळ पाच आठवड्यांनंतर, शीतल–१ हे स्पेस शट्ल अरबी समुद्रात उतरले. पाचही जण मुंबईत आल्यावर त्यांनी एक पत्रकार-परिषद बोलावली. त्यात त्यांनी ' वल्कन या ग्रहावर मानवी वस्ती होऊ शकणार ' एवढेच फक्त जाहीर केले.

नंतर पुन्हा ते रशियाने शोध लावलेल्या ' कॉसमॉस ' या ग्रहावर जाण्याच्या तयारीला लागले.

[ टीप : हा निबंध दुसरी सूर्यग्रहमाला अस्तित्वात आहे असे गृहीत धरून लिहिण्यात आला आहे आणि वल्कन हा ग्रह दुसऱ्या सूर्यग्रहमालेतीलच आहे असा उल्लेखही केलेला आहे.
Space Shuttle : माणसांची अंतराळात ने-आण करण्याकरता वापरात येणारे यान. हे पुन्हा वापरता येते. ]

♡

# जीवन

कविता करावीशी वाटत होती
पण मनानेच समजूत घातली
तुझे जीवन हेच एक काव्य आहे
त्याला योग्य वळण लाव
यशाचा मार्ग सापडेल !
मला जगायचंय,
स्वार्थी, सत्तांध, कामांध
लोकांच्या समाजात
आकाशात उडणाऱ्या निर्भय पक्षाप्रमाणे.

**सुजाता थिटे,** द्वि. व. – साहित्य

# विज्ञान नवलकथा

कु. शुभदा जोशी, कु. अनिता कुलकर्णी, कु. अपर्णा कानविंदे, तृतीय वर्ष-शास्त्र

रोजच्या नीरस आयुष्यात मनुष्याला काहीतरी वेगळे, रोमांचकारी घडावेसे वाटते. प्रत्येक मनुष्याची आपल्या आयुष्याबद्दलची रम्य स्वप्ने असतात. फारच थोड्या जणांच्या वाटेला स्वप्नपूर्तीचे भाग्य येते. मग आपल्या तात्पुरत्या स्वप्नपूर्तीसाठी मनुष्य कधी पुस्तक वाचतो. चित्रपट बघतो. त्या नायकनायिकेच्या भूमिकेशी थोडा वेळ समरस होऊन रोमांचकारी जीवन जगतो. मनुष्याची ही भावनिक गरज ' विज्ञान नवलकथा ' या वाङ्मय-प्रकारामुळे भागविली जाते. इतकेच नव्हे तर त्याने बुद्धीला आव्हान दिले जाते.

माणसाला गूढतेचे आकर्षण फार पूर्वीपासून आहे. ३०० वर्षांपूर्वी घनदाट जंगलाबद्दल गूढ असायचे. आता ते आकाशगंगेबद्दल वाटते. आज सुरू असलेले वैज्ञानिक प्रयोग सामान्य माणसाच्या आकलनापलीकडचे आहेत. त्याला या सर्व प्रयोगांबद्दल अतिशय कुतूहल आणि बरीचशी भीती असते. ही भीती दूर करण्यासाठी आणि विज्ञान लोकाभिमुख करण्यासाठी ' विज्ञान नवलकथा ' उपयुक्त ठरतात.

आर्थर क्लार्क या प्रसिद्ध विज्ञान कथालेखकाच्या मतानुसार सामान्य माणसात विज्ञानाबद्दल जे गैरसमज पसरलेले आहेत ते दूर करून, विज्ञानाची गोडी वाढवण्याचे काम विज्ञानकथा करतात. ही गोडी आणि वैज्ञानिक माहिती जेवढी फैलावते तेवढा जनतेचा वैज्ञानिक प्रकल्पांना पाठिंबा वाढत जातो. " वैज्ञानिक प्रकल्पांमध्ये अफाट पैसा खर्च करण्यात फायदा काय ? " असे विचारणारे विरोधक बरेच आहेत. पण त्यांना हे माहिती नसते की ' सुधारणा ' आणि ' उपयुक्तता ' हे विज्ञानाचे दोन प्रमुख हेतू आहेत. अशा विरोधकांची संख्या कमी करण्यास विज्ञान नवलकथा मदत करते. किंबहुना कल्पनेवर आधारलेल्या विज्ञानकथांनी प्रत्यक्षात अनेक विज्ञान-प्रकल्पांची मांडणी करण्यास साहाय्य केलेले आहे. " विज्ञान नवलकथा वाचून शास्त्रज्ञ होण्याचे ठरवले " असे सांगणारे शास्त्रज्ञ बरेच आहेत. अर्थातच, विज्ञानकथामुळे विज्ञानाची गोडी वाढत असली तरी केवळ विज्ञान-कथा वाचून विज्ञान शिकता येईल असे मुळीच नाही. कारण विज्ञानकथा हा काही विज्ञानावरचा प्रमाणभूत लेख नव्हे. या कथांमध्ये शास्त्राच्या काही मूलभूत कल्पना वापरलेल्या असतात. आणि कधी त्या कथा रोचक बनवण्याकरता, शास्त्रातील नियम उल्लंघलेले आढळून येतात. त्यामुळे ढोबळ मानाने विज्ञानकथांचे दोन भाग पडू शकतील.

पहिल्या प्रकारामध्ये, एखादी वैज्ञानिक कल्पना विचारात घेऊन त्यावरून पुढे, कोणत्या प्रकारचे शोध लागण्याची शक्यता आहे याचा विचार केलेला असतो. आणि त्यातूनच कथा जन्म घेते किंबहुना गणितज्ञ John Taylor यांच्या मते विज्ञानकथा लिहिणे, ही विज्ञानातील ' जर ' हा शब्द, म्हणजेच भविष्यात ज्या गोष्टी घडण्याची शक्यता आहे, अशा गोष्टी, जास्तीत जास्त रोचक करण्याची एक कला आहे.

दुसरा प्रकार म्हणजे ' Fantasy ' या प्रकारात मोडणाऱ्या कथा. अशा कथांमध्ये शास्त्रीय कल्पनांवर आधारित भय-कथांचाही समावेश करता येईल. ह्या कथा जरी रोचक असल्या तरी त्यांना पूर्णतया विज्ञानकथा म्हणणे अयोग्य ठरेल. या कथांमध्ये शास्त्रीय नियम चांगलेच धाब्यावर बसवलेले आढळतात.

अनेक विज्ञानकथालेखकांच्या मते, भविष्याबद्दल आशावाद निर्माण करणारा 'विज्ञानकथा' हा एकमेव साहित्य-प्रकार आहे. भविष्यकालात मानवजात अधिक उत्क्रांत, अधिक प्रगत होणार आहे हे जसे विज्ञानकथा सांगते तसेच आपले भविष्य घडवणे आपल्याच हातात आहे याचीही जाणीव करून देते. अनेक वैज्ञानिक बाबी, ज्यांवरील संशोधन पूर्णावस्थेला पोहोचले नाहीत अशा बाबतीत काय घडण्याची शक्यता आहे हे सामान्यजनापर्यंत विज्ञानकथांद्वारे पोहोचू शकते.

उदा. गणकयंत्र: शास्त्रज्ञांनी मानवी मेंदूच्या कार्यपद्धतीच अभ्यास करून गणकयंत्राचा शोध लावला. गणकयंत्राची कार्यपद्धती मानवी मेंदूप्रमाणेच असते. फक्त फरक एवढाच की ते स्वतंत्ररित्या विचार करू शकत नाही. आज शास्त्र इतके प्रगत झाले आहे की पृथ्वीवरील गणकयंत्रे अवकाशातील कृत्रिम उपग्रहांचे नियंत्रण करू शकतात. अशाच वेगाने जर शास्त्राची प्रगती चालू राहिली तर येत्या दोन-तीन दशकांत गणकयंत्र ही आपल्या दैनंदिन जीवनातील एक अत्यावश्यक बाब होऊन बसेल. ह्या कल्पनेचा वापर काही विज्ञान-कथांतून केलेला आढळतो. त्याचप्रमाणे मानवी जीवन पूर्णपणे यांत्रिक बनवणेही योग्य नाही. काही विज्ञानकथांमधे ह्या विचारावर जोर दिलेला आढळतो.

वैज्ञानिक संशोधन आता पृथ्वीच्या कक्षा ओलांडून अवकाशातही पोहोचलेले आहे. पृथ्वीव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या ग्रहावर आपल्याचप्रमाणे जीवसृष्टी असण्याच्या शक्यतेवरही संशोधन चालू आहे आणि विश्वाच्या अफाट पसाऱ्यात अनेक आकाशगंगा असताना इतर काही ग्रहांवरही जीवसृष्टी असणे ही गोष्ट अशक्य निश्चितच नाही. त्याचबरोबर अवकाशात कृष्णविवरासारखे काही धोकेही आहेत हेही शास्त्रज्ञांना कळून चुकले आहे. कृष्णविवर म्हणजे अतिशय आकुंचन पावलेला ग्रह अथवा तारा. ह्याचे गुरुत्वाकर्षण इतके प्रचंड असते की त्यामुळे प्रकाशसुद्धा त्याच्याकडे खेचला जातो व प्रकाशाचे परावर्तनही होऊ शकत नाही. पृथ्वी आकुंचन पावत तिचा व्यास जर काही सेंमी एवढा कमी झाला तर तिचे कृष्ण-विवरात रूपांतर होईल. ही कल्पनाच किती भयप्रद आहे नाही? मग ह्या विषयावरही अनेक विज्ञानकथा न लिहिल्या गेल्या तरच नवल.

ह्या आणि अशा अनेक तत्त्वांवर आधारित विज्ञान-कथा लिहिल्या गेल्या आहेत. अंदाज, शक्यता वर्तवल्या गेल्या आहेत. ह्यांपैकी काही कथांमध्ये केलेले अंदाज खरे ठरल्याचीही उदाहरणे आहेत. इ. स. १९४५ मध्ये, आर्थर क्लार्क ह्यानी 'एक्स्ट्रॉटेरेस्ट्रियल रिलेज' हा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी संदेशवाहक उपग्रहांची साखळी पृथ्वीभोवती फिरत ठेवली तर रेडिओ आणि टि. व्ही. यांचे कार्यक्रम जगाच्या कानाकोपऱ्यात पोहो-चवता येतील ही कल्पना मांडली होती. त्याचप्रमाणे भूस्थिर उपग्रहांकडून कोणकोणत्या प्रकारची कामे करून घेता येतील ह्याचेही विस्तृत विवेचन केले होते. त्यामुळे आज आर्थर क्लार्क ह्यांना 'उपग्रही संदेशवहनाचे जनक' मानण्यात येते.

काही वेळा असेही घडले आहे की कथा आणि शोध ह्यांचा जन्म एकाच वेळी पण वेगवेगळया ठिकाणी झाला.

अमेरिका, रशिया, जपान ह्या देशांमध्ये वैज्ञानिक संशोधन पराकोटीला पोहोचलेले आहे. त्याचवेळेला भारत व काही आफ्रिकी देश की जे शेतीप्रधान आहेत अशा देशांत सुधारणा जास्त प्रमाणात रुजलेल्या नाहीत. ह्या देशांमधे अंधश्रद्धा, रूढीप्रियता ह्यांचा प्रभाव जनमानसा-वर अजूनही आढळतो. अर्थात अमेरिकेसारख्या अति-प्रगत देशांमध्येही अंधश्रद्धा अजूनही आढळून येतात. शेवटी शास्त्र कितीही पुढे गेले तरी मानवी मनाचे गूढ संपूर्णपणे उकलण्यात ते अपयशीच ठरले आहे. जोपर्यंत सामान्य माणूस शास्त्रीय दृष्टिकोण स्वीकारत नाही तोपर्यंत अंधश्रद्धा दूर होणार नाहीत आणि जोवर हे घडत नाही तोवर विज्ञान-कथांचा उद्देश पूर्णतया सफल झाला असे म्हणता येणार नाही.

♡

# ख्वाबों की दुनिया

**संजयकुमार मोरे,** प्रथम वर्ष–साहित्य

लोग हमेशा ख्वाब देखते रहते हैं। क्या ख्वाबों का जीवन से कोई सम्बन्ध होता है? सोचने पर पता चलता है कि गहरा सम्बन्ध है।

जीवन भी तो एक ख्वाब है। जीवन और ख्वाब दोनों पानी के बुलबुले हैं। क्षणैक। ख्वाब के सहारे ही मनुष्य जीवन में सुख की कल्पना करता है। ख्वाब जीवन जीने की आशा बँधाता है। उसी के सहारे जीते चले जाता है। अच्छे दो-चार दिन मनुष्य को घमण्ड में डुबो देते हैं। इन दिनों वह सोचता है कि मेरा यदि कोइ शत्रु हो तो वह मेरे पास आनेकी कोशीश न करें। इन्हीं दिनों घमण्ड में वह अपने आपको तकदीर का बादशहा समझता है। भाग्य-विधाता मानता है। यहाँ तक तो ठीक है क्यों कि ऐसा मानना भी एक ख्वाब है। किन्तु वह दूसरों से भी बताते फिरता है और अपना जीवनदर्शन दूसरों पर लादता चला जाता है। यह ठीक नहीं है।

इन्हीं दो-चार दिनों में वह और ख्वाब देखता है और अमीर बनने के। अमीर ही अमीर बने रहने का ख्वाब। किन्तु बने रहना न तो जीवन है और न तो ख्वाब। ख्वाब तो टूटने के लिए होते हैं। जीवन का तथ्य यही है कि फूल मुरझा जाने के लिए खिलते हैं। आदमी ख्वाब में डूबता है तैरता नहीं। दुनिया में जो भी कुछ है वह दो-चार दिनों के लिए ही है। दुनिया नित्य परिवर्तनशील है। ख्वाब भी परिवर्तन का ही दूसरा नाम है। यदि कोई परिवर्तन पसन्द नहीं करेगा तो ख्वाब देखेगाही क्यों? अस्थिरता ही परिवर्तन का दर्शन है।

जीवन शराब का गिलास है। पियो और जियो। मदिरा समाप्त की जीवन का नशा समाप्त। यह शराब है इसे कोई जवानी कहे या कोई सुख के दिन कहें। जो कोई चाहे सो कहता है। मैं तो इसे ख्वाब ही कहूँगा। यदि इस ख्वाब को असलियत में बदलना है, स्थिरता में स्थिर रखना है तो अमृत पीना पडेगा। अमृत, प्रेम का अमृत, सत्य का अमृत। प्रेम ही सत्य है। सत्य मानवता है। मानवता ही धर्म है। जब तक जीवन में यह नहीं है तब तक ख्वाब देखो। ख्वाब जीयो। ख्वाब खाओ। ख्वाब पीओ।

अज्ञेय हिन्दी के जानेमाने बुद्धिवादी निबंधकार हैं। उनकी दृष्टि में सपने देखना बुरा नहीं है। सपने देखना जीवन की राह देखना है। महत्वपूर्ण मुद्दा यह है कि सपनों को जीवन में साकार करो। जो साकार हो सके, कर सको वेही सपने देखो। फिर भी ख्वाबों को जीवन में उतारना भी ख्वाबों की दुनिया ही है।

♣

# स्त्री और स्त्री-शिक्षा

**कु. सविता सबनीस,** तृतीय वर्ष–साहित्य

अभी अभी कल परसो की ही घटना है। मैं जिस बस में से यात्रा कर रही थी, उसी बस में कंटक्टर महोदय एक बूढी को कोस रहा था कि वह बसस्थानक चले जाने के बाद् भी बैठी की बैठी रही। जहाँ उसे उतरना था वह स्थानक पीछे चले जाने की शायद उस बूढी को खबर ही नहीं थी। एक ओर तो मैं बूढी पर तरस खा रही थी तो दूसरी ओर मैं यह सोच रही थी कि यदि यह कोई बूढा होता तो कंडक्टर को कोसने से डटकर उत्तर देता।

एक साने परिवार पडासे में रहता है। फिलहाल उनके दूसरी पत्नी है। शायद तीसरी औरत से भी वह सम्बन्ध बनाये रखता हो। शराब के नशे में वह पत्नी को पीटता तो बडा लडका कभी कभी पिता पर हाथ उठाने में पीछे नहीं हटता। पिटाई होने पर भी वह लडके से पति को बचाने के लिए पडोसियों को मनाती रहती है।

इन से भी बहुत बुरे उदाहरण आपको मालुम होंगे। इन दिनों अखबारों में स्त्रियोंकी जान लेने तक घटनाओं से पृष्ठ के पृष्ठ रंगे होते हैं।

घरमें और घर के बाहर स्त्री केवल स्त्री रह गयी है। क्या उसे केवल स्त्री बने रहने के लिए मजबूर किया जा रहा है? यह मजबूरी प्राकृतिक है या स्थिति की या शिक्षा–संस्कार से उत्पन्न। यदि यह मजबूरी प्राकृतिक या स्थिति की नहीं है तो आये दिन स्त्री–मुक्ति का बोलबाला निरर्थक है। वह एक भुलावा है।

'शिक्षा–संस्कार और स्त्री' पर आये दिन परिसंवाद हो रहे हैं। नारे लगाये जा रहे हैं। ढिंढोरा पीटा जा रहा है। फिर भी उक्त दो और ऐसे कई उदाहरण तो यह सिद्ध करते हैं कि स्त्री-मुक्ति या स्त्री-शिक्षा यह एक भुलावा है।

प्रश्न यह है कि क्या स्त्री के लिए स्वतंत्र शिक्षा–संस्कार की आवश्यकता काल की आवश्यकता है? आज की शिक्षा स्त्री–शिक्षा की दृष्टि से निरुपयोगी है या उपयुक्त!

असल में प्रश्न शिक्षा–संस्कार की परिभाषा का है। स्वरूप का है। उद्देश्य का है। शायद् कभी कभी ऐसा लगता है कि भारतीय परम्परा से संस्कृत स्त्री पाश्चात्य में अपना भविष्य देखना चाहती है। दोनों परम्पराओं की अच्छाइयाँ अपनानेका स्त्री का प्रयत्न है। आज की शिक्षा क्या इस प्रकार का स्त्री–भविष्य निर्माण करने में समर्थ है? बहुत गहराई में जाकर उत्तर ढूँढना पडेगा।

जहाँ तक संस्कार की शिक्षा का प्रश्न है वहाँ तो स्त्रियाँ ही स्त्रियों को संस्कृत कराती हैं। पुरुष और स्त्री दोनों को स्त्री ही संस्कार देती है। फिर भी स्त्री-मुक्ति की समस्या बनी की बनी रही है। जहाँ तक शिक्षा का प्रश्न है वहाँ भारत में स्त्री उपयुक्त और पुरुष उपयुक्त शिक्षा का प्रबन्ध नहीं है। जिन महिला पाठशालाओं या विश्वविद्यालयों में वांछित प्रबन्ध है – वहाँ से शिक्षित स्त्रियों में कहाँ तक परिवर्तन आ पाया है इस पर अनुसंधान की आवश्यकता है। स्त्रियों की स्वतंत्र शिक्षा का प्रबंध तो ठीक है किन्तु पुरुषों की स्वतंत्र शिक्षा का कोई प्रबंध किसी भी देश में

नहीं है। असल में देखा जाएँ तो पुरुष के समकक्ष स्त्री का सम्मान चाहनेवालों ने यह सोचनाही नहीं चाहिये कि दोनों की शिक्षा में कोई अन्तर हो।

जहाँ स्त्री जाग्रत पायी गयी वहाँ तो कुछ और ही सामने आया। स्त्री नौकरी करती है तो 'दहेज' पूर्ण करने के लिए। नौकरी-व्यवसाय करती हैं तो घर के उत्तरदायित्व को निभाने में अवमान मानती है। पुरुष घर के उत्तरदायित्व में अवमान मानें तो भारत का 'घर' भविष्य में न जाने कैसा होगा!

आज तो भारत में स्त्री-शिक्षा का अर्थ इतनाही लेना उचित है कि पुरुषों के समान वह जीवनावश्यक ज्ञान प्राप्त कर सकें। ज्ञान की उपयोगिता के कारण पुरुष और स्त्री के पारस्पारिक सम्बधों पर कुठाराघात होता है या कि भारतीय परम्परा को ठेस पहुँचती है तो वह चिंता और चिंतन का विषय है। अपने अपने उत्तरदायित्व के प्रति जाग्रत रहना ही शिक्षा की सही उपयुक्तता है। इसलिए स्त्री-शिक्षा और पुरुष-शिक्षा में शिक्षा प्रबंध की दृष्टि से अंतर रहने या रखने की आवश्यकता नहीं है। आज की शिक्षा भी पुरुषों के लिए उपयोगी है तो स्त्रियों के लिए भी।

कोई शिक्षा-संस्कार या विचारधारा पुरुष और स्त्री में तनाव या परस्परविरोधी भाव व भाषा पैदा करती हैं तो उसपर गौर करना चाहिये।

महाराष्ट्र की सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, कमलाबाई सोहनी जैसी महिलाएँ उक्त विचार के लिए समर्थनीय है। आज महिला पंतप्रधान है फिर भी किसीने आपत्ति नहीं उठाई।

स्त्री-शिक्षा-संस्कार का प्रश्न वहीं उठ खडा होता है जहाँ स्त्री पुरुष का विद्रोह करती है या कहीं पुरुष स्त्री का। विद्रोह के कारणों का अनुसंधान आवश्यक है न कि शिक्षा-संस्कार को दोष देना। आज भारतके लिए वही शिक्षा-संस्कार उपयुक्त है जो पुरुष-स्त्री में विद्रोह की भावना न जागने दे। यही परिवर्तन स्त्री-शिक्षा की माँग है।

८

# खलाशी

या प्रचंड जीवननौकेचा मी एक खलाशी
तरंगतोय घेऊन भावना, कल्पना, इच्छा मनाशी
धरती आई माझी, आकाश पिता
उदात्त पुष्पसंदेश समजतो मी त्या उल्कापाता
मज हवा कशास किनारा
वसंत, हेमंत, शिशिर माझा सहारा
वर्षा, सकाळ, संध्या माझ्या भगिनी
मनोहर रजनी माझी रागिणी
यांच्याशी नाते माझे अतूट
पण क्षणिक मी, मज मनास चुटपूट
सृष्टीसौंदर्य रस सेवन करण्यास मी अधाशी
या प्रचंड जीवननौकेचा मी एक खलाशी
तरंगतोय घेऊन भावना, कल्पना, इच्छा मनाशी

**निमिष तोटे,** १२ वी – शास्त्र

# साथ

आज माझ्या संगतीला साथ तू देशिल का
स्वप्नातल्या भावनांना साद तू देशिल का ॥ धृ ॥
गर्तेत आहे चाललो मी आज माझ्या
बेरंग या कल्पनांना रंगवितो आज माझ्या
कल्पना माझ्या मनातील मूर्त तू करशिल का ॥ १ ॥
आज लोपलो तसा न कळत संपलो
असिम माझिया व्यथेत, न कळता गुंतलो
स्वप्निल माझ्या व्यथेला, हळूवार तू जपशिल का ॥ २ ॥
व्यर्थ मी जगलो कशाला, प्रश्न हा छळतो मनाला
जन्मतः मरण आपुले घेतले आहे उशाला
जीवहीन या कुडीला नवजन्म तू देशिल का ॥ ३ ॥

**आदेश गोखले,** तृ. व.–शास्त्र (पदार्थ विज्ञान)

# प गा र

अशोक वंजारी, तृतीय वर्ष—साहित्य

कोंबड्यानं बांग दिली. त्यासरशी सरू उठली. आळोखे-पिळोखे देवून तिनं एक लांबलचक जांभय दिली. उशाला ठिवलेली माचिस चाचपडून तिनं बत्ती पेटवली. त्या बत्तीच्या उजेडातच तिनं सहज घड्याळाकडं पाहिलं. पाच वाजायला आलं व्हतं. कशीबशी तिनं चूळ भरली, आन आपल्या भोवतालची आवरा-आवर करून तिनं इस्टो जवळ वढला. त्याला जोरजोरात पंप मारून तिनं तो पेटवला. आन त्यावर च्याला आधन ठिवलं.

तेवढ्यात घड्याळानं घंटा वाजवून पाच वाजल्याचं जाहीर केलं. त्या सरशी तिनं जवळच झोपलेल्या नवऱ्याला हातानं धक्का देतच ती म्हणाली, " आवं ! उठा की आता. कामाला जायचं हाय नव्हं ? " तिच्या आवाजानं विश्यान्या उठला. आनं, संडासाला जायाच्या इराद्यानं त्यानं चिंपाट उचाललं आन बाहेर पडला.

च्या झाल्यावर सरूनं इस्टोवर तवा ठिवला. आन ती पीठ मळू लागली. पीठ मळता-मळता तिचं लक्ष समोरच झोपलेल्या आपल्या चिल्ल्या-पिल्ल्यांकडे गेलं. दोघं कशी गाढ झोपली व्हती. मागल्याच दिवाळीत सरूच्या मोठ्या पोरीचं लगीन झालं व्हतं. तिच्यामागचा दिप्या, हा कालीजात शिकत व्हता. तर सगळ्यात धाकला बबन्या हा आवंदा सातवी पास होवून आठवीच्या वर्गात गेला व्हता. जोडी कशी नक्षत्रावानी दिसत व्हती. आपल्या आठ-बाय आठच्या घरवजा झोपड्याकडं पाहून ती पुन्हा आपल्या उद्योगाला लागली. तोपतुर विश्यान्या आपलं उरकून च्या पियाला जवळच्या पोत्यावर बसला.

डबा भरता-भरताच सरू म्हणाली, " सांजच्याला जरा एरवाळी या ... कालवनाला पैसा न्हाय, तवा येतानाच कालवनाला काय बी घेवून या. तोपतुर मी भात-भाकरी करूनशान ठिवते. "

विश्यान्याने घाईघाईनेच डबा घेतला, नेहमीपरमानं आज बी डब्यात कालवण नव्हतं. आन तो बाहेर पडला.

आज पगाराचा दिवस व्हता. तवा कामावर एरवाळीच हजर व्हायाला हवं. न्हायतर उशीर व्हायचा. आन गेट-वरून पुन्हा माघारी यावं लागल. आज... घरात तर फुटकी पै देखील न्हाय, हा इचार डोक्यात आल्याआल्या त्यो झपाटल्यागत चालू लागला. पण त्याला कायबी केल्या झपा-झपा, फाटक्या वाहणांमुळं चालताच येईना. पगार झाल्या-झाल्या वाहणा घेयाच्या, मागल्यावानी चाल-ढकल करायची न्हाई, असं मनाशी पक्कं करून कसं तरी खरडत-फरकटत तो कंपनीच्या गेटवर पोहचला. त्याच्या-वानीच इतर कामगार बी हजर झालं व्हतं.

आज पगाराचा दिस असल्यामुळं कधी एकदा मुकादम येईल असं त्याला झालं व्हतं. कारण मुकादम आल्याबिगर त्यांना पगार वाटला जात नव्हता. चातक बी इतक्या आतुरतेनं पावसाची वाट बघत नसंल तितक्या आतुरतेनं तो मुकादमाची वाट बघत व्हता. मुकादमाच्या वाटंकडं त्याचं डोळं लागलं व्हतं. आन...एकदाचा त्यो मुकादम आला. त्यासरशी समदी मजूर आपली कारडं घेवूनशान लायनीत उभी राहिली. आज परतेकाच्या चेहऱ्यावर एगळंच तेज व्हतं. कधी एकदा आपला नंबर लागंल

असं परतेकाला झालं व्हतं. महिनाभर मर-मर काम केल्याचा मोबदला मिळंल ह्या इचारानं समदी जण खुश दिसत व्हती. गप्पांना उधान आलं व्हतं. एक-एक जन म्होरं सरकत व्हता. हिशेबानं नोटा घेत व्हता. आन सुरक्षित ठिकाणी ठिवत व्हता. आन अश्या ह्या गोंधळात विशन्याचा नंबर लागला. त्यानं हिशेबानं तिनसं रुपयं मोजून घितलं. त्यासरशी मुकादम म्हनाला,

" विशन्या भडव्या, पुन्हा एकदा मोज कि रं...नोटा. चुकून-माकून एखादी नोट कमी यायाची!"

" काय...मुकादम, गरिबाची चेष्टा करताय, आवं तुमच्यावर इश्वास हाय कि वो...!"

विशन्यानं नोटा पँटीच्या चोर-कप्प्यात ठिवल्या, आन त्यो हात-पाय धुवाय गेला. कारण काही एळानंच कंपनी सुटनार व्हती.

विशन्या कंपनीच्या गेटातून बाहेर आला. त्यासरशी बोळ्यागत टपून बसलेल्या दिलावर पठानानं त्याला हटकलं,

" अबे...वो...विष्नू..., साला पठाणसे गद्दारी करता क्या? साले आमाला चुकवून जायाचा इच्यार है क्या? साला पिछले महिनेमें चुकवून गेला. और इस वक्त बी वैसाच इरादा है क्या?"

विशन्यानं पाहिलं. आता आपली काय सुटका न्हाय. तवा तो पठानाकडं गेला.

" वैसा कुछ नाय, सोचा कल देवून टाकावं."

" कल-बिल कुछ न्हाय, आमको आजच मांगताय. साला मागले महिनेमें भी ऐसाच किया, बोला कल देताय. और दो-चार दिन आयाच नही. इस वक्त आमको ऐसा नही चलेंगा. आजच आमको पैसा मांगताय, साला... हमको भी बाल-बच्चा है, कि नहीं?"

आज पठानाच्या तावडीतून आपली सुटका न्हाय. कशी ही ब्याद टपकली कोन जानं. आता ह्याच्या हातावर कायतरी ठेवलंच पायजे. त्याबिगर हा सोडायचा न्हाय. असा इचार करून विशन्यानं खिश्यातून पन्नास रुपायांची नोट काढली. आन त्याच्या हातावर टेकवली.

" साले पच्याससे काम नही चलेंगा. और सौ निकाल. चल, साला पिछले महिनेमे एक पैसा भी नहीं दिया था. याद हाय कि नाय?"

विशन्यानं पाहिलं ह्यो गडी काय पन्नासनं ऐकनार न्हाय. तवा पठानाच्या हातावर आणखी पन्नास रुपायांची नोट ठेवून, त्याच्या हाता-पाया पडून, त्याला शंभर रुपायांत राजी केलं आन त्यो चालू लागला.

मागल्या दिवाळीत विशन्यानं आपल्या पोरीचं लगीन केलं व्हतं. पोरीचं नशीब लई थोर तवा तिला मागनं बी लई झक्कासपकी आलं व्हतं. मानसं बी जवळचीच व्हती. तवा पोर लांब जानार न्हाय, आन पोरगा बी दोन बुकं शिकला-सवरला व्हता. कुठं तरी चांगल्या ठिकानी सर्व्हिसला व्हता. तवा आपल्या पोरीचं बाळवणं होणार न्हाय. ह्या इचारानं त्याला झपाटलं व्हतं. पण नुसत्या इचारानं लगीन काय व्हत न्हाय. त्याकरता दामाजी खर्च करावं लागतं. आन नेमकी हीच बोंब त्याची व्हती. मुलांकडील मंडळींनं तर उचलच खाल्ली. लगीन दिवाळीतच व्हायाला हवं असा त्यांनी लकडाच लावला. आन विशन्याच्या घरी अठरा-विश्व दारिद्र्यच मुक्कामाला असल्यामुळं त्याच्या त्वांडचं तर पाणीच पळालं. आन अश्या ह्या वक्ताला याजानी पैसा देणारा दिलावर पठाण त्याला देवावानी वाटला. त्याच्याकडनं दोन हजार याजानी घेवून त्यानं पोरीचं हात पिवळं करून तो मोकळा झाला व्हता.

विशन्याचा मधला पोरगा दिन्या हा आता कामाजोगा झाला व्हता. परंतू प्वाराचं कालीज बंद करून त्याला कामाला लावायचं विशन्याला पटत नव्हतं. आपल्या बापजाद्यानं आपल्याला शिकवलं न्हाय, तवा आपलं हे हाल झालं. अशी बारी आपल्या पोरांवर येऊ नये म्हणून विशन्या त्याला लई शिकवणार व्हता. बॅरिस्टर करणार व्हता त्याला. भीक मागायची पाळी आली तरी बी दिन्याला खूप शिकवणार व्हता. आन म्हणूनच दिन्याच्या मनात काम करण्याची इच्छा असतानासुद्धा विशन्या त्याला काम करून देत नव्हता.

इच्यारांच्या तंद्रीत विशन्या कधी बाजारात आला त्ये कळलंच न्हाय. धाकट्या प्वाराला बुकं घ्यायाची व्हती. म्हणूनशान त्यो दुकानात शिरला. आठवीची बुकं घिवून त्यानं पन्नास रुपये शेठजींच्या हातात देऊन तो बाहेर पडला. तेथून काही अंतरावर असलेल्या बोळीत घुसून तो एका झोपड्यात शिरला. पैसे देऊन त्यानं झोपडीतल्या बाईकडनं दारू भरलेला ग्लास घेतला व एका दमात

मांजरीगत डोळे मिटून पिवून टाकला. आन पालथ्या मुठीनं त्वांड पुशीतच तो बाहेर आला. गल्लीतल्या कोळीणीकडून कालवनाला धिवूनशान त्यो घरी पोहोचला.

सरू त्याचीच वाट बघत व्हती. हातातली कालवनाची पिशवी तिच्या हातात देऊन, समोर आलेल्या प्वाराच्या हातात पुस्तकांचं ओझं देऊन विशन्यानं कोपऱ्यातल्या बारदानावर बूड टेकवलं. बबन्या आपल्या नव्या पुस्तकांच्या नादात गुंग झाला. सरी प्वारांना दुपारी खायाला नव्हतं, तवा त्यास्नी भूक लागली असंल ह्या इच्यारानं तिला कसंतरीच झालं. तिला कोरड्यास कधी उरकते व जेवाय कधी वाढते असं झालं व्हतं. विशन्या मात्र आपला कोपऱ्यात विडीचं झुरकं घेत निवांत बसला व्हता.

जेवन-खान झाल्यावर सरूनं भांडी घासून-पुसून ठिवून दिली. आताशी कुठं तिच्या जीवाला आराम मिळाला व्हता. विशन्यानं तिच्या हातावर पगारातलं उरलेलं दीडशे रुपय ठिवलं. सरू त्या पगाराकडं बघतच राहिली. काळजीनं तिला घेरून टाकलं. कारण तिला त्या पगारात दिन्याची परीक्षा-फी, वाण्याचं पैसं देयाचं व्हतं. आन महत्वाचं म्हणजी पुरा महिना उरलेल्या पगारात घालवायाचा व्हता. बत्तीच्या उजेडात काही वेळ ती पगाराकडं बघतच राहिली. काही वेळानं बाहेर पाहिलं तर...बाहेर नेहमीचाच अंधार पसरला व्हता...

♣

---

# वायूलहरी

मनात माझ्या वादळ उठले
विचार सारे उन्मळून पडले
भावनांचे वारे वाहू लागले
कृती साऱ्या गारठून गेल्या
काय हा प्रचंड उत्पात
वायूलहरीने मांडला मनात
सळसळ करीत गेली स्पर्शून
थंडाव्याने तिच्या मन आले शहारून
प्रचंड धूके पडले
त्यात सारे नाहीसे झाले
फक्त वायूलहर आणि मी
कल्पना आली मनात नामी
वाटले विचारावे लहरीला
काय करतेस, कुठे आहेस रहायला
सतवायला असेच आवडते तुला?
पण ... छे ती का उत्तर देणार
थंड ती तिला काय कळणार
जोसात आली ती फार लांबून
पहाता पहाता गेली निघून
दुसरी ... चौथी अनेक लहरी येतील
असेच गोटवून निघून जातील
कधीही त्या थांबणार नाहीत
मागे वळून पहाणार नाहीत

**निमिष तोटे,** १२ वी – शास्त्र

# कुर्सी मिनिस्टरवाली

कुर्सी मिनिस्टरवाली
हुई तू कल ही खाली,
मिल जा मुझको मेरी जान,
हाय रे, मैं तुजपर कुरबान
जनता हैं मेरे पीछे।
फिर भी मैं तेरे पीछे नहीं
सोचने समझने को मारो गोली
मेरे बिना तू रहना न खाली
मेरी जान नेहले पे देहलावाली
कुर्सी मिनिस्टरवाली।
तुझ से न तो मैं नोट माँगू,
न कुर्ता माँगू न कोट माँगू,
सेवा के नाम पर नोट पे वोट माँगू
ईमान बेचकर तुझसे भीखे माँगू
कोठी औरकारवाला, सत्तावाला
सपना आँखों में ढाला
सपनोंने लेली मेरी जान
हे सपनों ही सपनोंवाली
कुर्सी मिनिस्टरवाली.

**अमृता देशपांडे,** तृतीय वर्ष वाणिज्य

# लोकमान्य टिळकांचे शिक्षणविषयक कार्य

**कु. मेधा म. महाजन,** बारावी-वाणिज्य

[ लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा घेण्यात आल्या. त्यांमध्ये गुणानुक्रमे ( १ ) मेधा महाजन ( XII–H ), ( २ ) साधना शेंडे ( XI–I ), ( ३ ) अमिता खोत ( XI–G ), यांना पहिल्या तीन क्रमांकांची पारितोषिके मिळाली. पारितोषिकप्राप्त निबंधापैकी प्रथम क्रमांकांचा निबंध प्रसिद्ध करण्यात येत आहे. ]

भारताला सन १९४७ मध्ये 'स्वराज्य' मिळाले. या स्वराज्याची शिकवण लोकमान्य टिळकांनी सर्व जनतेला दिली. म्हणून भारताचे हल्लीचे पुढारीसुद्धा लोकमान्यांना आपले गुरु मानतात.

लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी झाला. त्यांचे संपूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक. ते लहानपणापासून बुद्धिमान होते. त्यांचे पाठांतर दांडगे होते. अशा या बालकाचे गुण मराठी शाळेत शिकत असतानाच दिसून आले होते.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर कॉलेजमधील शिक्षण घेण्यासाठी त्यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये नाव दाखल केले. तेथे त्यांनी बी. ए. ची पदवी मिळवली. अशा या तरुण मुलांना इंग्रजी राज्यात मोठ्या पगाराची नोकरी तावडतोब मिळत असे. परंतु सरकारची नोकरी करायची नाही असे टिळकांनी ठरवले होते. कॉलेजमध्ये असताना टिळकांनी अनेक मित्र जोडले होते. त्यांपैकी एक गोपाळ गणेश आगरकर. या दोघा मित्रांचा पुढील आयुष्यात देशकार्य करण्याचा निर्धार होता. इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विषयांवरील ग्रंथ वाचले होते. टिळक भारतीय संस्कृतीचे अभिमानी होते तर आगरकरांचा पिंड अतिरिक्त वाचण्यामुळे पाश्चात्य पद्धतीचा बनला होता. परकीय राज्याची देशातून हकालपट्टी झाली पाहिजे असा निर्धार होता. परंतु त्यांचे दृष्टिकोन मात्र वेगवेगळे होते. पहिल्यांदा जनतेमध्ये राजकीय जागृती केली पाहिजे असे टिळकांचे मत होते. तर प्रथम सामाजिक सुधारणांवर भर दिला पाहिजे असे आगरकरांचे मत होते.

टिळक व आगरकरांच्या विचारांची दिशा जरी परस्परविरोधी असली तरी काही गोष्टींत त्यांच्यांत मतैक्य होण्याची शक्यता होती. शिक्षण-क्षेत्रात त्यांच्यामधे विसंवाद असण्याचे काहीच कारण नव्हते. दोघांनी देशातील लोकांना शिक्षण द्यायचे मान्य केले. त्याप्रमाणे पुढे पावले टाकण्यास त्यांनी प्रारंभ केला. मिशनरी संस्थांच्या धर्तीवर खासगी शाळा सुरू करण्याचे त्यांनी ठरवले. शिक्षणाचा प्रश्न हाती घेऊनच देशाचा उद्धार होऊ शकेल याबद्दल टिळकांना खात्री होती.

शाळा सुरू करण्याचा निर्णय टिळक व आगरकरांनी केला होता पण त्यासाठी आर्थिक तरतूद करणे आवश्यक होते. दोघांनी उत्साहाने खर्चाचा अंदाज केला. दरमहा फक्त ७५ रुपये खर्च येणार होता. मग त्यांनी पुण्यातील एका धनिक गृहस्थास पत्र पाठवून स्वतःची योजना सांगितली. परंतु त्या गृहस्थाने मदत करण्यास नकार देऊन त्यांची निराशा केली.

त्याच सुमारास विष्णुशास्त्री चिपळूणकर हे आपली नोकरी सोडून पुण्याला आले. एखादी शाळा काढावी असेही त्यांच्या मनात होते. त्यामुळे टिळक व आगरकर यांच्या विचारात आणखी एक प्रवाह येऊन मिसळला.

१८७३ साली विष्णुशास्त्री सरकारी शाळेत शिक्षक म्हणून काम करीत होते. १८७४ मधे विष्णुशास्त्रींनी आपली निबंधमाला सुरू करून लोकांची मने जिंकून घेतली. या निबंधमालेमुळे शास्त्रीबुवा 'मराठी भाषेचे शिवाजी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

नंतर ठरल्याप्रमाणे १८८० सालच्या प्रारंभी त्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' सुरू केली. टिळक–आगरकर–चिपळूणकर यांच्या विद्वत्तेचा प्रसार सगळीकडे पसरला होता. त्यामुळे पालक भराभर आपली मुले या शाळेत धाडू लागले. १८८१ साली प्राथमिक शाळेत सुमारे सव्तोतीनशे विद्यार्थी होते. १८८५ साली अवघ्या पाच वर्षांत ती संख्या एक हजाराच्या वर गेली. नुसती विद्यार्थ्यांची संख्याच वाढली नाही तर बौद्धिक प्रगतीही झपाट्याने होत गेली. १८८४ साली मॅट्रिकचा निकाल ८९ टक्के लागला. १८८० पासून पुढे सात वर्षे या शाळेच्या विद्यार्थ्यांनी ओळीने जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवली. १८८२ साली शिक्षणाधिकारी सर विल्यम हंटर यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल'ला भेट दिली.

शाळेतले शिक्षण स्वस्त असायला पाहिजे हे शाळेच्या चालकांनी ओळखले होते. त्या प्रमाणात शाळेची फी पुष्कळच कमी ठेवण्यात आली.

साक्षरता आणि शिक्षण यांच्या प्रचारासाठी कित्येक ख्रिस्ती मिशनरी हिंदुस्थानात कार्य करीत होते. पुण्यात देखील मिशनऱ्यांच्या कितीतरी संस्था होत्या. धर्मप्रसाराचे कार्य शाळांमधून फारसे होत नसले तरी मिशनऱ्यांनी शिक्षण-क्षेत्रावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. यामुळे न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेला महत्त्व प्राप्त झाले होते.

टिळक व चिपळूणकर यांनी शिक्षणक्षेत्रात धर्म येऊ दिला नाही. शिक्षणक्रम हाच राष्ट्राच्या भावी उन्नतीचा पाया आहे ही गोष्ट समोर ठेवून त्यांनी कार्य केले. विद्यार्थ्यांच्या अंतःकरणावर नव्या विचारांचे बीजारोपण करावे आणि त्यांना आयुष्याचा नवा मार्ग दाखवावा या हेतूने ही नवी शिक्षणसंस्था जन्म पावली होती.

या शाळेच्या मर्यादित कार्यक्षेत्रात आपल्या कार्यक्षमतेला बांधून टाकण्याची त्यांची अजिबात तयारी नव्हती. त्यांच्या कार्याचे क्षेत्र विशाल होते. त्यांची झेप सामान्य पक्षाची नव्हती तर ती गरूडझेप होती. गगनाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य त्या तिघांच्या अंगी होते. तरुण विद्यार्थ्यांत जागृती करणे ही गोष्ट जितकी आवश्यक होती, त्याहीपेक्षा वयस्क लोकात जागृतीची अधिक आवश्यकता होती. जनतेला आपल्या दारिद्र्याची व दास्याची माहिती करून देणे आवश्यक होते. देशात दास्य प्रस्थापित झाले म्हणजे प्रगत वर्गाच्या साऱ्या आशा-आकांक्षांचा चुराडा होत असतो आणि त्यामुळे एक प्रकारचे नैराश्य निर्माण होत होते.

१८७८-७९ च्या सुमारास महाराष्ट्रात वासुदेव बळवंतांचा उठाव झाला. वासुदेव बळवंत हे सरकारी नोकरीत होते पण त्यांचा ब्रिटिश–द्वेष कडवा होता. ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडण्यासाठी त्यांनी सशस्त्र उठावणी केली. वासुदेवांचे शरीर कसलेले होते. नेमबाजीचे शिक्षण त्यांना अवगत होते. निशाणबाजीचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी गुप्तपणे पुण्यात एक वर्गही सुरू केला होता.

सशस्त्र क्रांतीच्या कल्पनेने काही दिवस टिळकांचे मनही भारावून गेले होते. निशाणबाजीच्या वर्गात टिळकही शिक्षण घेण्यासाठी जात असत. परंतु जनतेच्या पाठिंब्याशिवाय उठाव यशस्वी होणे अशक्य होते. हे लवकरच टिळकांच्या लक्षात आले होते. त्यामुळे प्रस्थापित सत्तेविरुद्ध झालेले अकाली उठाव हे परिणामतः अपायकारक ठरतात. १८८० च्या सुमारास अशा सशस्त्र उठावांबद्दल देशात नुसती तात्त्विक चर्चा चाललेली ऐकू येत होती. पण त्याला जनतेचा प्रतिसाद मिळत नव्हता. या चर्चेचा आवाज चार भिंतींपलिकडे जाऊ शकला नाही. काही वरच्या थरातले लोक सोडल्यास सामान्य जनतेचा या उठावाला अजिबात पाठिंबा मिळविण्यासारखा नव्हता. अंतःकरणात देशभक्तिची ज्योत पेटली म्हणजे कालांतराने ती कृतिरूप धारण करते आणि देशात क्रांती घडवून आणते.

भावी क्रांतीचा पाया घालण्यासाठी टिळकांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वृत्तपत्र सुरू करण्याचे ठरविले. शाळेचे काम सुरळीत चालू असताना मराठी व इंग्रजी साप्ताहिक काढण्याची कल्पना चिपळूणकर यांच्या मनात आली. या पत्रकांची नावे काय असावीत हा प्रश्न सर्वांपुढे होता. चिपळूणकरांनी इंग्रजी वर्तमानपत्रास 'मराठा' हे नाव सुचविले. आणि मराठी वृत्तपत्रास 'विक्रम' अशी नावे सुचविली. 'मराठा' हे नाव सर्वांना आवडले; परंतु 'विक्रम' हे नाव कुणाच्याच पसंतीस पडले नाही.

म्हणून टिळकांनी ‘ केसरी ’ हे नाव सुचवले. ते नाव सर्वांना आवडले आणि त्या नावाबरोबर त्या पत्राचे ध्येय विशद होईल असा एक श्लोकही आहे. त्यामुळे हे नाव सर्वांच्या पसंतीस पडले.

परंतु ही वृत्तपत्रे तयार करावयाची म्हणजे त्यासाठी छापखाना हवा. त्यासाठी थोडेफार पैसेही हवेत. त्याच वेळी नामजोशींचा छापखाना अगदी डबघाईला आला होता. तो छापखाना विकत घ्यायचा असे ठरले. छापखान्याच्या नव्या मालकांनी सारे सामान वाहून शाळेच्या आवारात टेवले.

१८८०च्या ऑक्टोबरमधे ‘केसरी’ आणि ‘मराठा’ ही पत्रे सुरू झाली. १८८१ सालच्या पहिल्या मंगळवारी ही पत्रे प्रसिद्ध करण्याची घोषणा करण्यात आली. ‘ केसरी ’मधे प्रामुख्याने राजकीय आणि आर्थिक विचार येणार होते. राजकारणाची दिशा दर्शविली जाणार होती. निःपक्षपातीवृत्तीने हे सर्व विषय हाताळले जाणार होते. या पत्राने निर्भयता, भारदस्तपणा व ऐट या गोष्टी पुढे व्यक्त केल्या


‘ मराठा ’ पत्राचा पहिला अंक २ जानेवारी १८८१ रोजी निघाला व ‘ केसरी ’चा पहिला अंक ४ जानेवारी १८८१ रोजी प्रसिद्ध झाला. ‘ केसरी ’ सुरू झाल्यापासून विविध विषयांवर केसरीची गर्जना एकसारखी सुरू झाली. आणि त्या पत्रांचा खप दिवसेंदिवस एकसारखा वाढू लागला. देशाच्या प्रगतीला अडसर घालणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर ‘ केसरी ’ने टीकास्त्र सोडले. राजकीय क्षेत्रांतील इंग्रजांचे वर्चस्व, सामाजिक क्षेत्रांतील वरिष्ठ वर्गाचे वर्चस्व, परकीय भांडवलदारांचा जुलूम आणि सावकारांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांची पिळवणूक, अस्पृश्यांचे होणारे अनन्वित हाल, जातिजमातीमधील दिखाऊ दिमाख आणि गोऱ्या लोकांना लाभणाऱ्या असंख्य सवलती. हे सारे विषय ‘ केसरी ’च्या कक्षेत येऊ लागले. या साऱ्या विषयांवर निर्भिडपणे ‘ केसरी ’तून मते मांडली जाऊ लागली. परंतु पुढे टिळक व आगरकर यांच्या उत्साहावर विरजण पडण्याचा प्रसंग लवकरच आला.

जुन्या काळच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक अवशेष या दृष्टीने संस्थानांना महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे साहजिकच त्या काळचे पुढारी त्या संस्थानांकडे आणि त्यांच्या अधिपतींकडे मोठ्या आपुलकीने आणि अभिमानाने बघत असत. त्या काळचे प्रमुख संस्थान म्हणजे बडोदा आणि कोल्हापूर.

कोल्हापूरचे कारभारी–बर्व्यांनी–काही बनावट पत्रे लिहिली. ती पत्रके प्रथम ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाली व नंतर ‘ केसरी ’च्या अंकात ती उद्धृत करण्यात आली. काही दिवसांनी बर्व्यांनी सरकारकडे फिर्याद केली. त्यामुळे सरकारने टिळक–आगरकर यांना १७ जुलै रोजी चार महिन्यांची शिक्षा ठोठावली. केवळ समाजहितासाठी त्या दोघांनी ( टिळक–आगरकर ) खटला स्वतःवर ओढवून घेतला याची जाणीव जनतेला होती. दोन सिंह अनपेक्षितपणे कायद्याच्या पिंजऱ्यात अडकले गेले होते. यात त्यांचा काही दोष नव्हता याची जाणीव जनतेला होती. याचे प्रत्यंतर पुढे १८८४ च्या फेब्रुवारीत आले. या महिन्यात मुंबईचे गव्हर्नर ‘ सर जेम्स फर्ग्युसन ’ यांनी न्यू इंग्लिश स्कूलला भेट दिली. परंतु सरकारच्या मनात टिळक–आगरकर यांच्याबद्दल मुळीच किंतु किंवा द्वेष नाही हे त्यावरून सिद्ध झाले. चार महिने जरी देहदंड त्या दोघांना सोसावा लागला असला तरी जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल आदर व सहानुभूती आहे.

२८ ऑक्टोबरपासून टिळक व आगरकर आपल्या कामावर रुजू झाले. शाळेचा कारभार आपल्या अनुपस्थितीत चांगला चालला होता हे पाहून त्यांना अत्यंत समाधान वाटले.

♡



# गोबर गॅस अथवा जैविक वायू : उर्जा समस्येवरील एक उपाय


**पिनाकपाणी साठे, अजित पाटील, सुरेखा हुंडेकर, गीता मोरवाल, नंदा अस्वारे,** तृतीय वर्ष–शास्त्र ( वनस्पती )


सध्या इंधन-टंचाईवर सतत चर्चा ऐकिवात येते. इंधन म्हणून अनेक पदार्थ वापरण्यात येतात. जळणासाठी पेट्रोल, लाकूड इत्यादींचा उपयोग आपल्या चांगल्याच परिचयाचा आहे. पण ह्यांचा साठा मर्यादित असल्यामुळे आज ना उद्या तो संपुष्टात येण्याचा संभव आहे. म्हणूनच पर्यायी इंधनाचा शोध सतत चाललेला असतो. न संपणारा सूर्यप्रकाश कसा वापरता येईल ह्याचा संशोधक प्रयत्न करीत आहेत हे आपल्याला माहिती आहेच. आपल्याकडे शेणाचा उपयोग गोवऱ्यांच्या स्वरूपात जळणासाठी केला जातो. पण ह्यामुळे शेणखताचे मौल्यवान साधन वाया जात आहे, पण ह्याच शेणाचा उपयोग वायूनिर्मितीकरिता केल्यास ह्या वायूचा जळणाकरिता उपयोग करता येतो, त्याचप्रमाणे शेणाचा उरलेला भाग हा खत म्हणूनही वापरता येईल. शेणापासून निर्माण होणाऱ्या वायूलाच गोबर-गॅस किंवा जैविक वायू असे म्हणतात. ह्या वायूचा आपण परिचय करून घेऊ.

कुठलाही सेंद्रिय पदार्थ कुजण्याच्या प्रक्रियेत सूक्ष्म जीवांच्या वाढीमुळे निरनिराळे पदार्थ निर्माण होतात. त्यातील काही वायूंच्या स्वरूपात असतात. गायी किंवा म्हशीच्या शेणात पचनसंस्थेतून राहिलेले असे अन्न असते. त्यात मुख्यतः साध्या स्वरूपातील शर्करा, सेल्युलोज असे पदार्थ असतात. अशा ठिकाणी सूक्ष्म जीवांची वाढ चांगल्या तऱ्हेने होऊ शकते. विशेषतः पाण्याच्या उपस्थितीत. ह्यात दोन प्रकारचे सूक्ष्म जीव कार्यरत होतात. हे दोन प्रकार त्यांच्या श्वसनक्रियेवर आधारित असतात. एका प्रकारात हवेतील प्राणवायू वापरून सूक्ष्म जीव शर्करा व सेल्युलोज यांच्यावर प्रक्रिया करून त्यांचे आणखी साध्या म्हणजे काही आम्ले व कर्बवायू यांच्यात रूपांतर करून आणतात. अशा स्थितीत दुसऱ्या प्रकारचे सूक्ष्म जीव वाढतात. हे सूक्ष्म जीव आपली श्वसनक्रिया प्राणवायूविरहित स्थितीत करू शकतात. या क्रियेत ते साध्या पदार्थांचे विघटन पुढे चालू ठेवून त्यांचे मिथेन ह्या वायूमध्ये रूपांतर करतात. हा बदल करून आणणाऱ्या सूक्ष्म जीवांना मिथॅनोबॅक्टेरिया म्हणतात. मिथेन वायू ज्वालाग्राही असल्यामुळे तो जळणासाठी वापरता येतो व ह्याच वायूला गोबर-गॅस किंवा जैविक वायू म्हणतात. जैविक वायू साध्या प्रकारातील कुठल्याही सेंद्रिय पदार्थापासून अशाच तऱ्हेने निर्माण होऊ शकतो. उदाहरणार्थ, मानवाची विष्ठा, उरलेला भाजीपाला, कचरा इत्यादी. पण त्यात मिथेनचे प्रमाण कमी असते; कारण ह्यात विघटन न पावणारे पदार्थ जास्त प्रमाणात असतात.

मिथेन वायूनिर्मिती बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असते. उदा० तपमान. तपमान कमी झाल्यास कमी वायू तयार होतो.

गोबर गॅस प्लँट्स् अथवा वायूयंत्र निरनिराळ्या प्रकारचे व आकाराचे असतात, पण सर्वांमध्ये मूळ रचना एकाच प्रकारची असते. साधारणपणे ज्यांच्याजवळ ५ ते ६ गुरे आहेत व घरात ५ ते ६ माणसे आहेत, अशांना १०० घनफुटाचे सयंत्र आवश्यक असते.

सयंत्रात दोन मुख्य भाग असतात. एक म्हणजे पाचित्र किंवा विहीर. ही विहीर जमिनीच्या पृष्ठभागापासून जमिनीत १२ फूट खोल व ६ फूट व्यासाची असते. तिचा

कठडा ६ ते ८ इंच जमिनीच्या वर आलेला असतो. ही विहीर विटांनी बांधलेली असते व तिला आतून सिमेंटचा गिलावा दिलेला असतो. विहिरीच्या वरच्या भागात अधिकच्या चिन्हासारखे लोखंडी, आडवे खांब बसविलेले असतात. ह्याच्या मध्यभागी एक गोलसर उभा खांब बसविलेला असतो. विहिरीच्या तळाला एका बाजूच्या भिंतीला एक भोक टेवलेले असते. जमिनीच्या पृष्ठभागावर विहिरीपेक्षा २·४ फूट उंचीवर एक छोटा चौकोनी हौद बांधलेला असतो. हा हौद विहिरीपासून साधारणपणे ४ ते ३ फूट लांबीवर असतो व त्याच्या तळाला एक भोक ठेवलेले असते. हे भोक विहिरीच्या तळाशी असणाऱ्या भोकाला एका सिमेंटच्या नळीद्वारे जोडलेले असते. ह्यातून शेण विहिरीमध्ये येते. त्याचप्रमाणे ह्या हौदाच्या विरुद्ध बाजूला जमिनीच्या पृष्ठभागाशी कठडा फोडलेला असतो किंवा तिथे एक सिमेंटची नळी बसविलेली असते. ह्यातून विहिरीतील शेणाची मळी बाहेर येत असते.

सयंत्राचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे वायुपात्र अथवा गॅस-होल्डर. हे वायुपात्र ५॥ फूट व्यासाचे असून गोल टोपीच्या आकाराचे व पत्र्याचे असते. ह्याला वरच्या भागात एक भोक असून ते विहिरीच्या मध्यभागी असलेल्या खांबावर अशा रीतीने बसविलेले असते की, ते साधारणपणे ३ ते ४ फूट खालीवर होऊ शकेल. ह्याचा पोकळ भाग विहिरीच्या दिशेने येतो. वायूपात्राच्या वरच्या बाजूला एक नळी बसविलेली असते. तेथून लोखंडी नळीद्वारे अथवा रबरी नळीद्वारे वायू इतरत्र नेण्यात येतो.

सुरुवातीला संपूर्ण विहीर शेण व पाणी ४ : ५ वा प्रमाणात भरतात व नंतर वायूपात्र त्यावर बसवतात. साधारण २–३ आठवड्यांत वायू तयार होऊ लागतो व तो वायूपात्रात जमा होतो. त्यामुळे वायूपात्र हळुहळू वर येते. सुरुवातीचा वायू सोडून दिला जातो. कारण तो जळणास उपयुक्त नसतो. त्यात कार्बवायूचे प्रमाण जास्त असते. पण त्यानंतर रोज एक घमेले शेण पाण्यात मिसळून १ : १ हौदातून टाकतात. दुसऱ्या बाजूने जास्तीचे शेण पातळ द्रवाच्या स्वरूपात बाहेर येते. तसेच वायूपात्रात सतत वायू साठवला जातो. हा वायू मात्र जळणासाठी उपयुक्त असतो. हा नेहमीच्या वायूप्रमाणेच जळतो व त्याची ज्योत निळी व धूरविरहित असते. वायू वापरला गेला की वायूपात्र परत खाली येते. रोज ताजे शेण टाकले असता ५–६ माणसांना पुरेल इतके जळण उपलब्ध होते.

जैविक वायूचे उपयोग पुढीलप्रमाणे आहेत :

( १ ) स्वयंपाकासाठी — जैविक वायू हा उत्तम तऱ्हेने जळतो. ज्योत निळी व वासरहित असते. त्याची उष्णता ५५० °F. इतकी असते. फक्त ह्या वायूला फारच कमी दाब असल्यामुळे, विशिष्ट प्रकारची शेगडी वापरावी लागते. ह्याची भोके मोठी असतात.

( २ ) प्रकाशासाठी – जैविक वायूचा उपयोग विशिष्ट प्रकारच्या दिव्यात–बत्तीत केल्यास चांगला उजेड पडतो.

( ३ ) जनित्रे चालविण्यास — जैविक वायू पाणी खेचणारे पंप चालविण्याससुद्धा उपयोगी पडतो. फक्त पंपामध्ये थोडा फेरबदल करावा लागतो.

( ४ ) खतासाठी — सयंत्रातून बाहेर येणारा पातळ द्रव वाळवून खत म्हणून वापरता येते. हे खत शेण कुजवून केलेल्या खतापेक्षाही अधिक चांगल्या दर्जाचे असते. त्याला वास नसतो व ते लगेच वापरता येते. ह्या खतात नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम ही खनिजे पुरेश्या प्रमाणात असतात.

दिवसेंदिवस जैविक वायूचे महत्त्व वाढत आहे. खेड्यांत विशेषतः शेतकऱ्यांना वरदान ठरले आहे. पण त्यात काही समस्या आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सयंत्र उभारण्यास ४ ते ५ हजारांपर्यंत खर्च येतो व तो सर्व-सामान्य माणसांना परवडणारा नाही. तेव्हा कमीत कमी खर्चात सयंत्र कसे उभारता येईल ह्यावर संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

आणखी एक समस्या म्हणजे तपमान स्थिर ठेवणे. विशेषतः उत्तर प्रदेशात हिवाळ्यात तपमान १० °C च्या खालीच असते. वायूनिर्मिती जवळ जवळ थांबलेली असते. ह्यावर काही प्रमाणात गरम पाणी वापरल्यास उपयोग होतो.

जैविक वायूला फारसा दाब नसतो. त्यामुळे हा वायू सयंत्रापासून १०० फुटांपर्यंतच नेता येतो. तसेच पेट्रोल गॅसप्रमाणे मिथेन द्रव स्वरूपात सिलेंडरमध्ये भरता येत नाही. त्यामुळे हा वायू साठविता येत नाही.

जैविक वायू निर्माण होण्यास बराच कालावधी लागतो. सद्यः परिस्थितीत जैविक वायू इंधन-समस्येवर निश्चितच उपाय आहे हे सिद्ध झालेले आहे. हा वायू जळण म्हणून वापरल्यास सरपणासाठी जी जंगलतोड होते, ती बरीचशी थांबू शकेल. तसेच ह्यापासून चांगले खत मिळून शेती-उत्पादनात वाढ होईल. त्यामुळे गोबर गॅसचा जास्तीत जास्त प्रसार होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ह्यावर अधिक संशोधनाची गरज आहे. जैविक वायूवरील संशोधन IARI, नवी दिल्ली, खादी व ग्रामोद्योग आयोग, मुंबई; इंडियन इन्स्टीटयूट ऑफ सायन्स, बंगलोर; गोबर गॅस रिसर्च स्टेशन, ईटावा; विज्ञान-वर्धिनी, पुणे. इत्यादी संस्थांमधून चालू आहे.

ह्या संशोधनात सयंत्राची किंमत कमी कशी करता येईल? सयंत्राचे तपमान स्थिर ठेवणे, जास्त उपयुक्त सूक्ष्म जीवांचा उपयोग, जास्त व लवकर वायूनिर्मिती, तसेच शेणाऐवजी इतर पदार्थ वापरता येतील का? उदाहरणार्थ, टाकावू केरकचरा, जलपर्णी, कॉंग्रेस गवत इत्यादींचा उपयोग केल्यास ह्या उपद्रवी वनस्पतींचा चांगला उपयोग करून घेता येईल.

◇

# अभिनंदन, तुमचे अभिनंदन

शाब्बास !
झालात एसेस्सी.
शाबास तुमची शाब्बास !
अभिनंदन तुमचं
सायन्सला ' ॲडमिशन ' मिळविल्याबद्दल
जेमतेम ' मार्क्स ' असूनही !

घाबरू नका
अहो आता सारं सोपंय
पहिलं सेमिस्टर देवाचं
दुसरं कॉलेजचं
त्यामुळं कुणीही होतोय पास
छे ! छे ! मार्कांची काळजी कशाला ?
ते काही बीएस्सीच्या ' क्लास 'मध्ये धरले जात नाहीत !

आता जरा सावधान
तिसरं, चौथं, पाचवं नि सहावं सेमिस्टर
इंटर्नल मार्क्स सरांच्या नि मिसबाईंच्या हातांत असतात,
त्यांची बंद मूठ कशी उघडेल याची चिंता करा.

करा सरांजवळ जरा लाडे लाडे
करा ' मिस 'च्या साडीचं नि नेकलेसचं मुबकसं कौतुक
आता परीक्षेचं म्हणालात तर
' प्रगती 'च्या दिशेनं वळा
घ्या ना क्वश्चन बँक सोल्यूशन्स
पाठ करा ' ऑड ' किंवा ' इव्हन ' प्रश्नांची उत्तरं.

प्रश्नपत्रिका कशी सेट करतात माहितेय ?
एक प्रश्न ऑड...
    एक प्रश्न इव्हन...
पुन्हा ऑड...
    पुन्हा इव्हन...
किंवा व्हायसे व्हर्सा...
आणि शेवटी एकच मंत्र
लिहा हो जे काय येतंय ते—
' तमाम रोगोंका एकही इलाज 'च्या
चालीवर कुठल्याही प्रश्नाचं एकच उत्तर
कारण ' सेन्ट्रल असेसमेंट ' आलंय.

तुमच्या उत्तराकडं कोण पाहातोय
ते पाहातात शेजाऱ्यानं किती गठ्ठे तपासले याच्याकडं
अहो, हल्ली म्हणे रोख पैसे मिळतात त्यांना
( शिवाय टीए प्लस डीए )
तर मित्रांनो आणि मैत्रिणींनो
येणेप्रमाणे तुम्ही ' बीएस्सी '
पदवीनं विभूषित व्हाल.

म्हणून स्वीकारा आत्ताच
माझं ॲडव्हान्स ' अभिनंदन '
अभिनंदन तुमचं
कॉंग्रॅटस्—तुम्ही म्हणे आताच बी एस्सी झालात !

**स्मिता देसाई,** द्वितीय वर्ष-शास्त्र

## परिणामकारक धमकी

शेजारणीच्या पतीने शेजारणीला गळयातील सोन्याचे नेकलेस करून आणलेले पाहून आल्यावर जयाकाकू व त्यांचे पती गजाननराव यांच्यातील संवाद खालीलप्रमाणे :

जयाकाकू—पुढच्या महिन्यात जर का मला सोन्याचे नेकलेस केले नाहीतर मी अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेईन.

गजाननराव—ह्यॉ ऽ ऽ ह्यॉ ऽ ऽ ! अगदीच अशक्य.

जयाकाकू—पण मी म्हणते का शक्य नाही ?

गजाननराव—अहो राणीसाहेब ! आधी थोडे तर रॉकेल मिळवा म्हणजे मला या धमकीबद्दल गंभीरपणे विचार करता येईल.

जयाकाकू—नाहीतर मी या कामासाठी गॅस वापरीन.

गजाननराव—मग मला दोन-चार महिने कसली भीती नाही. कालच संपला ना गॅस ?

**दीपक मेणकुदळे,** ११ वी शास्त्र

♣

## खिलौना

क्या मैं
खिलौना हूँ ?
हिलने – डुलनेवाला।
चाबी देते ही बंद पड जाता हूँ।
जैसे,
खिलौना बंद पडता है।
दूसरों के कहने पर मुझे —
यदि चूप रहना पडता है;
पर ही,
मुझे कुछ करना पडता है।
क्या मैं खिलौना हूँ ?
जान बूझकर खिलौना बनना।
अरेरे!...
खिलौने से भी बुरा खिलौना !

**उर्मिला एकबोटे,** ग्यारहवीं वाणिज्य

♣

## राईस प्लेट

एकदा एक गुजराथचा व्यापारी मुंबईतून चालला असता त्याला जेवायची इच्छा झाली. परंतु रोडवर तर कोठेही चांगले हॉटेल दिसत नव्हते. म्हणून त्याने एका माणसास विचारले, " येथे सर्वात उत्तम हॉटेल कोठे आहे ? "

" तुम्ही असं करा, या रस्त्याने सरळ जाऊन बाजूच्या गल्लीत वळा आणि नंतर समोरच्या रस्त्याने जाऊन डाव्या बाजूला वळा. तेथे गर्दी दिसेलच. त्या हॉटेलमध्ये जावा. उत्तम जेवण मिळेल. "

त्या माणसाने सांगितल्याप्रमाणे रस्ता आक्रमिताना व्यापारी घाईगर्दीत समोरच्या रस्त्याने जाताना उजव्या बाजूस वळतो. आणि.. ...

आणि मग......

तो एका कोर्टात शिरतो. तेथे खटला सुरू असतो. काही कारणास्तव गोंधळ झाल्याने न्यायाधीश ओरडतात, " ऑर्डर ...ऑर्डर ! "

" एक राईसप्लेट— " व्यापारी गरजला.

## जोरू का गुलाम

एकदा काकासाहेब नावाचे एक सद्‌गृहस्थ मुंबईहून नागपूरला जायला निघाले होते. जाताना ते आपल्या पत्नीस म्हणाले, " मला महत्त्वाचे काम असल्याने १०–१५ दिवसांनी मी परत येईन. "

परंतु काकासाहेब दुसऱ्याच दिवशी परत आलेले पाहून पत्नीस आश्चर्य वाटले. म्हणून तिने विचारले, " तुम्ही १०-१५ दिवसांनी परत येणार होता ना ? "

त्यावर काकासाहेब म्हणाले, " हो. परंतु मी जेव्हा नागपूरला पोहोचलो त्यावेळी मला समोरच मोठ्या अक्षरात पाटी दिसली. त्यावर लिहिले होते, ' नागपूर में पहली बार आ रहा है, जोरू का गुलाम ' आणि त्यामुळे मला फार राग आला व त्याच पावली मी परत आलो. "

**दीपक मेणकुदळे,** ११ वी शास्त्र

## मॉडर्न कॉलेज

मॉडर्न कॉलेज हमारा
सब को है बेहतर प्यारा
कितना अच्छा दीखता बाहर से सारा!
उतना ही अच्छा अन्दर से है न्यारा।
विद्यार्थियों का क्या कहना
सब के सब हीरा-मोती गहना
अन्दर तो गुणों के स्रोतों का बहना
वाहवा! क्या कहना! क्या कहना!
गुरु तो ब्रह्मा विष्णु
शिष्यों के लिए सहिष्णु
अध्यापन में कर्मेष्णु
शिक्षा, ज्ञान के विष्णु
मॉडर्न कॉलेज हमारा,
इसीलिए है बेहतर प्यारा!
हमारा! हमारा ही हमारा!

**मोनिका राजपूत,** ग्यारहवीं विज्ञान

## यश मिळालं

यश मिळालं,
पण अपयशाचा विचार,
डोक्यात घोळतोय.
कारण त्याच्याच संगतीची,
सवय झालीय.
फोटो, बक्षीस कौतुकाचे बोल,
सारं मिळालं.
पण मन खट्टूच होतं.
वाटत होतं,
अपयश दुखावलं तर नसेल ना?
त्याची साथ सुटली म्हणून...
हो, पण यशाचा भरवसा नाही
तेवढंच आपले तात्पुरतं टॉनिक
यश पचविण्यासाठी...!

**सुजाता गानू,** द्वि. वर्ष–वाणिज्य

♣ ♣

## Money ! Money !! Money !!!

MONEY CAN GIVE YOU
BED BUT NOT SLEEP
BOOKS BUT NOT BRAIN
FOOD BUT NOT APPETITE
CLOTH BUT NOT BEAUTY
HOUSE BUT NOT HOME
MEDICINE BUT NOT HEALTH
LUXURIES BUT NOT HAPPINESS

**Sampat J. Bhandari, T. Y. B. Com.**

## अभिज्ञान

' कवी बनण्यासाठी मी जन्म घेतलाय '
अशा दृढ समजुतीनं
मी कागदावर रेघोट्या मारतोय
अभ्यास अडगळीत ठेवून
मुद्दाम नजर शून्यात लावून बसतोय
प्रतिभेची प्रतीक्षा संपतच नाही
म्हणून
' मोठ्यांच्या ' चरित्रात डोकावू पाहातोय
तर ते म्हणतात
' जनसामान्यात जन्मलो तरी कवी म्हणून
लोकांनी मला डोक्यावर घेतलंय ! '

**राजेंद्र झुंजारराव,** द्वितीय वर्ष–शास्त्र

## एशिआड '८२

मैं बॉक्सर, तू बॉक्सर,
हम बोक्सिग करें,
मैं पंच को, तू ऑडियन्स को बॉक्सिग करें,
मुझे पीटने दे, पीटने दे, तुझको मेरी कसम,
एशियाड '८२, एशियाड '८२.
मैं साईक्लीस्ट, तू साईक्लीस्ट,
हम साईक्लींग करें,
मैं आगे, तू पीछे, हम साईक्लींग करें
मुझे जीतने दे, जीतने दे, तुझको मेरी कसम
एशियाड '८२, एशियाड '८२

**मंजुषा साठे,** ग्यारहवीं–वाणिज्य

☐ ☐

## लाच

देवाचेच ते मंदिर
बऱ्याच लांबपर्यंत रांग लागलीय
दर्शनासाठी
प्रत्येकजण दर्शन घेतोय
पैसा दोन पैसे टाकतोय ॥ १ ॥
एक फाटका भिकारी
रांगेतून हिंडतोय
हवीय त्यास भीक
सहानुभूतीची नव्हे, पैशाची
बऱ्याच दिवसांपासून दिसतोय भुकेला अन्नाचा ॥ २ ॥
त्याला कोणी भीक घालत नाही
घालणार नाही
मंदिरातील परमेश्वर
बसलाय शांत
कारण त्याची मूठ दाबली जातेय ॥ ३ ॥

**राजेंद्र शहा,** १२ वी–सायन्स

# वार्षिक अहवाल

## वरिष्ठ महाविद्यालय

### क्रीडा–संघटना

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध स्पर्धांत भाग घेऊन उत्कृष्ट यश संपादन केले. आणि महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली.

मॉडर्न महाविद्यालयातील कु. मिथिला जबडे, कु. वसुधा तुमपल्लीवार या आजी विद्यार्थिनींना आणि श्री. अतुल वाकणकर या माजी विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाचा यंदाचा 'शिवछत्रपती पुरस्कार' देण्यात आलेला आहे. एकाच वेळी एका महाविद्यालयातल्या तीन विद्यार्थ्यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळण्याचा हा बहुधा पहिलाच योग होय. शिवछत्रपती पुरस्कार मिळविण्याची मॉडर्न महाविद्यालयाची तशी फार जुनी परंपरा आहे. यापूर्वी श्री. श्रीरंग इनामदार (१९७४–७५), कु. सुनीता देशपांडे (१९७८–७९), कु. निशा अंबिके आणि भारती बनबेरू (१९७९–८०) हे सर्व जण या पुरस्काराचे मानकरी ठरले होते. ओळीने तीन वर्षे आणि एकाच वर्षी तीन विद्यार्थ्यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळणे म्हणजे मॉडर्न महाविद्यालयास तिहेरी मुकुटच (हॅट्ट्रिकच) मिळणे होय. महाविद्यालयाच्या लौकिकात भर घालणाऱ्या या सर्व विद्यार्थांचा आम्हास सार्थ अभिमान वाटतो.

आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल सामन्यात मुलांच्या संघाने उपविजेतेपदाचा मान मिळविला.

त्याचप्रमाणे मुलींच्या संघाने ४×१०० मी. रीले स्पर्धेत आपला पूर्वीचा उच्चांक मोडून नवा उच्चांक प्रस्थापित केला. त्याबद्दल कु. वसुधा तुमपल्लीवार, कु. नीता अंबिके, कु. मिथिला जबडे, कु. अर्चना ठाकूरदेसाई यांचे अभिनंदन.

आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धांमध्ये पुढील विद्यार्थिनींनी यश संपादन केले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | कु. मिथिला जबडे | एम्. कॉम. प्र. व. | ८०० मी. धावणे | प्रथम क्रमांक |
| २) | कु. वसुधा तुमपल्लीवार | तृ. व. वाणिज्य | १०० मी. धावणे | तृतीय क्र. |
| ३) | कु. अरुंधती पंडित | प्र. व. वाणिज्य | ८०० मी. धावणे | ,, ,, |
| ४) | कु. रेवती धोपेश्वरकर | प्र. व. वाणिज्य | १५०० मी. धावणे | ,, ,, |
| ५) | कु. अल्पना थोरात | प्र. व. वाणिज्य | थाळी फेक | द्वितीय क्र. |
| ६) | कु, वसुधा तुमपल्लीवार | तृ. व. वाणिज्य | लांब उडी | तृ. क्रमांक |

तसेच आंतर महाविद्यालयीन कुस्ती–स्पर्धेत श्री. राहूल जाधव यांनी ५१ किलो वजनगटात उपविजेतेपद मिळविले.

प्रथमच सुरू झालेल्या आंतरमहाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या पुढील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यलयाच्या कीर्तीत भर टाकली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. शैलश जोशी | द्वि. व. वाणिज्य | ५५ कि. गट | प्रथम क्रमांक |
| २) | ,, उत्तम भिताडे | तृ. व. वाणिज्य | ५० कि. गट | द्वितीय क्र. |
| ३) | ,, विलास बहिरट | द्वि. व. वाणिज्य | ६५ कि. गट | तृतीय क्र. |
| ४) | ,, सिद्धार्थ कसबे | तृ. व. कला | ७५ कि. गट | तृतीय क्र. |
| ५) | ,, दीपक नेलेकर | तृ. व. वाणिज्य | ७० कि. गट | तृतीय क्र. |

तसेच खालील विद्यार्थिनी सुद्धा यशाचे वाटेकरी आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | कु. संगीता जाचक | प्र. व. कला. | ५० कि. गट | प्रथम क्र. |
| २) | कु. स्मिता पंडित | द्वि. व. वाणिज्य | ४५ कि. गट | प्रथम क्र. |

आंतरमहाविभागीय स्पर्धेत पुणे शहर विभागातर्फे प्रतिनिधित्व केलेले आमच्या महाविद्यालयातील खेळाडू पुढीलप्रमाणे :—

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. प्रवीण फुले | तृ. शास्त्र | व्हॉलीबॉल, वॉटरपोलो |
| २) | ,, उत्तम चव्हाण | एम्. कॉम (२) | कबड्डी |
| ३) | ,, विलास नांदगुडे | एम्. कॉम (१) | ,, |
| ४) | ,, यशोधन बाळ | तृ. व. वाणिज्य | वॉटरपोलो |
| ५) | ,, विवेक आसनीकर | तृ. व. शास्त्र | खो–खो |
| ६) | ,, प्रसाद येरवडेकर | प्र. व. शास्त्र | बॉस्केटबॉल |
| ७) | ,, विष्णू पांडे | तृ. व. वाणिज्य | क्रिकेट |
| ८) | ,, रवींद्र पिसाळ | द्वि. व. वाणिज्य | बॉलबॅडमिंटन |
| ९) | ,, पाटे एस्. बी | द्वि. व. शास्त्र | मल्लखांब |

विद्यार्थिनी :—

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. मिथीला जबडे | एम्. कॉम (१) | खो–खो–मैदानी स्पर्धा |
| २) | कु. वसुधा तुमपल्लीवार | तृ. व. वाणिज्य | ,, ,, ,, ,, |
| ३) | कु. सुजाता गांधी | तृ. व. कला | हॉलीबॉल |
| ४) | कु. अलका दीक्षित | प्र. व. कला | ,, ,, |
| ५) | कु. योगिनी सरोदे | प्र. व. कला | ,, ,, |
| ६) | कु. अंजली दीक्षित | प्र. व. कला | ,, ,, |
| ७) | कु. वनिता महाजन | द्वि. व. वाणिज्य | खो–खो |
| ८) | कु. वैशाली गद्रे | तृ. व. वाणिज्य | ,, ,, |
| ९) | कु. नीता अंबिके | प्र. व. वाणिज्य | ,, ,, |
| १०) | कु. मंजिरी दाबके | प्र. व. कला | ,, ,, |

| | | |
|---|---|---|
| ११ ) कु. रश्मी छत्रे | तृ. व. शास्त्र | खो–खो |
| १२ ) कु. अरुंधती पंडित | द्वि. व. वाणिज्य | ,, ,, |
| १३ ) कु. अल्पना थोरात | प्र. व. वाणिज्य | मैदानी स्पर्धा |
| १४ ) कु. स्वाती घाटे | तृ. व. शास्त्र | कबड्डी |
| १५ ) कु. सुजाता थिटे | तृ. व. वाणिस्य | हॅन्डबॉल |
| १६ ) कु. कल्पना सोहनी | प्र. व. वाणिज्य | खो–खो |

आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेत पुणे शहर विभागातर्फे खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| १ ) | श्री. शैलश जोशी. | द्वि. व. वाणिज्य. |
| २ ) | ,, उत्तम भिंताडे. | तृ. व. वाणिज्य. |
| ३ ) | कु. संगीता जाचक. | प्र. व. कला |
| ४ ) | ,, स्मिता पंडित. | द्वि. व. वाणिज्य. |

## आंतर विद्यापीठ क्रीडा-स्पर्धांतील सहभागी विद्यार्थी :

मुले :

| | | | |
|---|---|---|---|
| १ ) | श्री. प्रवीण फुले | तृ. व. शास्त्र | व्हॉलीबॉल, वॉटरपोलो. |
| २ ) | ,, रवीन्द्र पिसाळ | द्वि. व. वाणिज्य | बॅडमिंटन. |

मुली :

| | | | |
|---|---|---|---|
| १ ) | कु. सुजाता थिटे. | तृ. व. कला | हॅन्डबॉल |
| २ ) | ,, सुजाता गांधी. | [illegible]. व. वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| ३ ) | ,, योगिनी सरोदे. | प्र. व. कला | ,, |
| ४ ) | ,, दीक्षित. | प्र. व. कला | ,, |
| ५ ) | ,, मिथिला जबडे. | एम्. कॉम (१) | मैदानी स्पर्धा |

खो-खो महिला आंतर–विद्यापीठीय स्पर्धेत पुणे विद्यापीठास विजेतेपद मिळवून लौकिकात भर टाकणाऱ्या आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचे विशेष हार्दिक अभिनंदन.

| | | |
|---|---|---|
| १ ) | कु. वसुधा तुमपल्लीवार | तृ. व. वाणिज्य (कर्णधार महिला संघ) |
| २ ) | ,, नीता अंबिके. | प्र. व. वाणिज्य |
| ३ ) | ,, वनिता महाजन. | द्वि. व. कला |
| ४ ) | ,, अरुंधती पंडित. | द्वि. व. वाणिज्य |
| ५ ) | ,, वैशाली गद्रे. | तृ. व. वाणिज्य |
| ६ ) | ,, अर्चना ठाकूरदेसाई. | प्र. व. कला |
| ७ ) | ,, मंजिरी दाबके. | प्र. व. कला |
| ८ ) | ,, रश्मी छत्रे. | तृ. व. शास्त्र |

## आमचा विशेष उल्लेखनीय अभिमान—

मॉडर्न महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजमितीस मुलांच्या खो-खो आंतरविद्यापीठीय स्पर्धेत दर वर्षी सिंहाचा वाटा उचलणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी श्री. विवेक आसनीकर यांचा आम्हांला जास्त अभिमान वाटतो.

ह्यांना आंतरविद्यापीठ खो-खो अजिंक्यपद असलेल्या पुणे विद्यापीठाने सतत तीन वर्षे अजिंक्य संघाचे प्रतिनिधी म्हणून खास " सुवर्णपदक " देऊन गौरव केला.

तसेच श्री. शैलश जोशी, द्वितीय वर्ष वाणिज्य, हा विद्यार्थी दिल्ली येथील १९८२–८३ त झालेल्या अखिल भारतीय ज्युडो स्पर्धेत ५५ किलो गटात ' रौप्यपदकाचा ' मानकरी ठरला.

कु. रश्मी छत्रे ह्या विद्यार्थीनीस आंतर विद्यापीठ क्रीडा संघटनेतर्फे राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती मागील सतत तीन वर्षापासून देण्यात येत आहे.

तिन्ही विद्यार्थांचा आम्हास अत्यंत अभिमान वाटतो. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

सालाबादप्रमाणे आम्ही आंतरवर्गीय सामने आयोजित केले होते. त्यात विद्यार्थी-विद्यार्थीनींनी प्रचंड प्रमाणात उत्साहात स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्या.

त्यातील यशाचे व बक्षिसाचे मानकरी :

१ ) सर्वसाधारण विजेतेपद : तृ. व. शास्त्र.
२ ) मैदानी स्पर्धा : वैयक्तिक विजेतेपद ( मुले ) श्री. किरण सणस प्र. व. वाणिज्य
३ ) ,, ,, ,, ,, ( मुली ) कु. वसुधा तुमपल्लीवार.

शरीर–सौष्ठव स्पर्धेत श्री. क्षीरसागर एस. डी., प्र. व. वाणिज्य ह्यांनी " मॉडर्न श्री " हा किताब मिळविला.

हा १९८२–८३ या वर्षाचा अहवाल पूर्ण करण्यापूर्वी आमचे सहकारी विद्यार्थी, मार्गदर्शक प्राध्यापक, जिमखाना कार्यवाह, क्रीडा प्रतिनिधी विद्यार्थी, आणि सदोदित प्रोत्साहन व उत्तेजन देणारे आमचे माननीय प्राचार्य श्री. गंभीरसर यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. रवीन्द्र पिसाळ,** | **प्रा. किरण लागू,** | **डॉ. अशोक पाथरे,** | **कु. सुजाता थिटे** |
| ( द्वितीय वर्ष वाणिज्य ) | क्रीडा–संघटक | कार्याध्यक्ष | ( द्वितीय वर्ष कला ) |

♠ ♠

## कनिष्ठ महाविद्यालय : क्रीडा अहवाल

१९८२–८३ ह्या शैक्षणिक वर्षात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेऊन चांगली प्रगती दाखविली. सुमारे २५० विद्यार्थी–विद्यार्थिनींनी भाग घेतला.

जिल्हा परिषदेने भरविलेले या आंतरशालेय पावसाळी व हिवाळी सत्र–स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी ( मुले–मुली ) पुढील खेळांत भाग घेऊन महाविद्यालयाच्या कीर्तीत भर टाकली.

हॉलीबॉल, बॅडमिंटन, बास्केट बॉल, टेबल टेनिस, खो–खो, कबड्डी, मैदानी स्पर्धा, हॉकी–मुले, फुटबॉल–मुले.

त्याचप्रमाणे ह्या वर्षापासूनच नवीन सुरू झालेल्या हॅंडबॉल व ज्यूडो ( मुले ) ह्या खेळात तर आमच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य दाखविले. हॅंडबॉल मुलींची टिम अजिंक्य ठरली तर मुलांची उपविजयी झाली. ज्युडोत राजेंद्र यादव हा बारावी कलेचा विद्यार्थी त्याच्या गटात अजिंक्य ठरला.

इतर खेळांतील ( स्पर्धांतील ) विशेष नैपुण्य—

१ ) व्हॉलीबॉल ( मुले ) पुणे जिल्हा विजेतेपद व आंतरविभागीय उपविजेतेपद.
२ ) बास्केटबॉल ( मुले ) विजेतेपद.
३ ) बॅडमिंटन ( मुले ) विजेतेपद.

## वैयक्तिक व मैदानी स्पर्धा

१ ) कुस्ती : शशिकांत उभे, बारावी शास्त्र, ५२ किलो गट, विजेतेपद.

२ ) ८०० व १५०० मीटर धावणे : पोपट काळे, बारावी कला, १ ला क्रमांक.

३ ) गोळा फेक : पाटील एस. आर., अकरावी वाणिज्य, प्रथम क्रमांक.

४ ) २०० व ४०० मीटर पळणे : माधवी भावे, अकरावी वाणिज्य, प्रथम व द्वितीय क्रमांक.

५ ) ४ × १०० मीटर रीले : तृतीय क्रमांक.

## उल्लेखनीय अभिमान

ह्यावर्षी खालील ९ विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्यातर्फे निरनिराळया खेळांसाठी निवड झाली.

| | | |
|---|---|---|
| १ ) | कु. मंजिरी नातू | खो–खो |
| २ ) | कु. कांचन दाते | हँडबॉल |
| ३ ) | कु. अंजली भिडे | ,, |
| ४ ) | श्री. उमेश दळवी | ,, |
| ५ ) | श्री. रवीन्द्र भट | ,, |
| ६ ) | श्री. संजीव सावर्डेकर | ,, |
| ७ ) | श्री. संजय दोरगे | व्हॉलीबॉल |
| ८ ) | श्री. राजेंद्र यादव | ज्यूडो |
| ९ ) | श्री. गिरीश पोतनीस | बास्केट बॉल |

वरील सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.

## आंतरवर्गीय स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे यंदाही सांघिक व वैयक्तिक खेळांच्या आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. त्या यशस्वी रीतीने पार पडल्या. ह्या वर्षीचे मुलांचे वैयक्तिक नैपुण्यपद भिडे समीर, ११ वी वाणिज्य ह्या विद्यार्थ्यास व मुलींचे कु. भारती दाबके ११ वी शास्त्र ह्या विद्यार्थिनीस मिळाले. सर्वसाधारण क्रीडा–नैपुण्यपद — ११ वी शास्त्र तुकडी–सी ह्या वर्गास मिळाले.



कै. अल्पेश पंड्या

खडकी स्टेशनवर अपघाती निधन ( १३ सप्टें. १९८२ )

श्री. नटवरलालजी पंड्या यांनी अकरावीत ( शास्त्र ) शिकत असणाऱ्या कै. अल्पेश ह्या आपल्या चिरंजीवाच्या दुःखद निधनानिमित्त त्याची स्मृती म्हणून महाविद्यालयास काही क्रीडासाहित्य भेटीदाखल दिले आहे. कै. अल्पेशच्या अकाली निधनाने महाविद्यालयास अतीव दुःख झाले.

क्रीडा विभागास प्राचार्य, उप-प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, कार्यवाह, उपकार्यवाह तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी–क्रीडा–प्रतिनिधींचे सहकार्य लाभले. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. धन्यवाद.

**प्रा. बनसुडे**
उप–कार्याध्यक्ष

**श्री. विनोद छाब्रा, श्री. व्ही. एम. शेरीकर**
क्रीडा–संघटक

# शारीरिक शिक्षण विभाग

## " शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् "

बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकास करणे हे अत्यावश्यकच आणि ह्याच दृष्टिकोणातून महाविद्यालय विद्यार्थ्यांकडे सतत लक्ष देत आहे. १९८२–८३ ह्या शैक्षणिक वर्षात कनिष्ठ व वरिष्ठ विभागांचे शारीरिक शिक्षणाचे तास अनुक्रमे ६ जुलै व २० जुलै १९८२ रोजी सुरू झाले.

प्रथम वर्ष शास्त्र, वाणिज्य व कला ह्या वर्गांसाठी आठवड्यातून तीन दिवस सकाळी ६–४५ ते ७–२५ या वेळात तर ११ वी व १२ वी सकाळी ७–२५ ते ८ १० व सायंकाळी ३–४५ ते ६–०५ ह्या वेळात तास ठेवण्यात आले होते. ह्याच वर्षात वरिष्ठ व कनिष्ठ विभागातून संघनायक म्हणून काही विद्यार्थ्यांची निवड केली गेली होती. संघनायकांना योग्य प्रशिक्षण देण्यात आले.

वरिष्ठ विभागातील जे विद्यार्थी खूप दूर राहात असल्याने सकाळी ६–३० ते ७–१५ या वेळात उपस्थित राहू शकत नव्हते, त्यांची वर्ष अखेरीस शारीरिक क्षमता–कसोटी घेण्यात आली.

तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता–कसोटी २४ सप्टेंबर १९८२ रोजी सुरू झाली. यात १) १०० मी. पळणे, २) गोळा फेक, ३) लांब उडी या कसोटयांचा समावेश होता.

महाविद्यालयाचे दुसरे सत्र ६ डिसेंबर १९८२ रोजी सुरू झाले. त्यात १२ वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा, १२ व १३ फेब्रुवारी रोजी घेण्यात आल्या. त्यांत वरील कसोटयांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांकडून योगासने, सूर्यनमस्कार, भारतीय व्यायाम इ. उपक्रमांबरोबरच हॉकी, फूटबॉल, बास्केटबॉल, खो–खो, व्हॉलीबॉल, थ्रोबॉल, कब्बडी ह्या खेळांची माहिती, खेळाचे तंत्र, कौशल्य, खेळातील डावपेच व नियम शिक्षकांनी समजावून देवून विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतला.

क्रीडासंचालक वेळोवेळी आरोग्य सल्ला, शारीरिक शिक्षणाची माहिती त्यापासून होणारे फायदे, योग, प्राणायाम सूर्यत्राटक व डोळ्यांचे व्यायाम ह्यांची प्रात्यक्षिकांसहित माहिती देत होते.

### वैद्यकीय तपासणी

वरिष्ठ महाविद्यालयाची वैद्यकीय तपासणी या वर्षीसुद्धा शा. शि. विभागाकडे सोपविण्यात आली होती. ती दि. १५ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. संघनायक, शिक्षक व संचालकांनी वैद्यकीय तज्ज्ञांना मदत करून ती यशस्वीपणे पार पाडली.

स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट) व प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) हे आपले राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने पार पडले.

खालील विद्यार्थ्यांनी १९८२–८३ या वर्षाकरिता उत्कृष्ट शारीरिक शिक्षण–संघनायक म्हणून काम केले.

१) श्री. गिरीष देसाई प्र. व. शास्त्र
२) ,, राजेंद्र कापसे प्र. व. वाणिज्य 'ब'
३) ,, सिताराम शिंदे प्र. व. कला
४) ,, किरण सणस प्र. व. वाणिज्य
५) ,, रविंद्र पिसाळ तृ. व. वाणिज्य
६) कु. कांचन म्हसकर द्वि. व. शास्त्र
७) ,, वसुधा वैद्य द्वि. व. शास्त्र
८) ,, कृती नागरेचा प्र. व. वाणिज्य
९) ,, राजश्री बेडेकर प्र. व. वाणिज्य
१०) ,, सुजाता पत्की ११ वी शास्त्र
११) ,, माधवी भावे ११ वी शास्त्र
१२) ,, मनिषा गंभीर ११ वी वाणिज्य

शारीरिक शिक्षण विभागाला ज्यांनी ज्यांनी सहकार्य दिले त्यांचे आभारी आहोत.

धन्यवाद,

कि. शं. लागू
संचालक

## NCC

१९८२-८३ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी खाली दर्शविलेल्या विविध NCC Units मध्ये दाखल झाले होते.

| | Unit | No. of Cadets |
|---|---|---|
| 36 | MAH. BN. | 53 |
| 3 | MAH. Armed Squn. | 3 |
| 2 | MAH. Girls | 11 |
| 1 | MAH. Signal | 9 |
| 3 | MAH. Naval | 48 |
| 3 | MAH. Air Squn. | 19 |
| | Total | 143 |

NCC कॅडेटस व ऑफिसर्स यांनी वृक्षारोपण, रक्तदान, श्रमदान इ. विविध उपक्रमांत भाग घेतला होता.

Pre-R. D. कॅम्पसाठी १५ कॅडेटस् निवडले गेले होते. २६ जाने. ८३ रोजी दिल्ली येथील प्रजासत्ताकदिन संचलनामध्ये महाविद्यालयाचा विद्यार्थी आर्यमाने यू. एम. याने भाग घेतला होता.

ओतूर येथे झालेल्या वार्षिक शिक्षण शिबिरामध्ये झालेल्या विविध स्पर्धांमध्ये आमच्या कॅडेटसनी स्पृहणीय यश मिळविले.

सर्वोत्तम कॅडेट स्पर्धेमध्ये SGT शेख एम. बी. ह्याने दुसरा क्रमांक मिळवला. NCC ची सिंहगड येथे सायकलवरून सहल गेली होती.

Cpl. गोगावले, Cpl. हजारे व Cpl. भोसले यांनी Army Attachment Camp पूर्ण केला.

— **Capt. Padmakar Apte**

## ग्रंथालय

फेब्रुवारी १९८२ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची एकूण संख्या ३४,७१८ झाली. यामध्ये महाविद्यालयाने घेतलेले ग्रंथ (कनिष्ठ आणि वरिष्ठ विभाग), पुस्तक पेढीतील ग्रंथ, स्टुडन्टस रिक्रीएशन लायब्ररी, त्याचप्रमाणे कला, वाणिज्य आणि शास्त्र संघटनांतर्फे घेण्यात येणारे ग्रंथ समाविष्ट आहेत. ग्रंथालयामध्ये एकूण ८० नियतकालिके येतात. त्याचप्रमाणे पुणे आणि मुंबईतील जवळजवळ सर्व मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे घेतली जातात.

विद्यापीठ अनुदान मंडळ, पुस्तक पेढीतून या वर्षी प्रथम सत्रात १३० विद्यार्थ्यांना आणि द्वितीय सत्रात १३० विद्यार्थ्यांना पुस्तक–संच विनामूल्य देण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत वर्षभर खुली ठेवण्यात आली.

आळंदीहून येणाऱ्या आणि मॉडर्न महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी आळंदीमध्ये, आळंदी असोसिएशन ऑफ मॉडर्न कॉलेज स्टुडण्टस् ही संस्था स्थापन केली आहे. या संस्थेतर्फे एक ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे.

ग्रंथालयाचे उद्घाटन माननीय प्राचार्य स. य. गंभीर यांचे हस्ते झाले. ह्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक शं. ना. नवलगुंदकर आणि श्री. द. गो. बापट उपस्थित होते. ह्या ग्रंथालयाला मॉडर्न महाविद्यालयातर्फे एकूण सुमारे २०० ग्रंथ भेट म्हणून देण्यात येणार आहेत.

३१ जानेवारी १९८३ अखेर झालेल्या २८० कामकाजाचे दिवसात रोज सुमारे ४८२ ग्रंथ याप्रमाणे एकूण १,३५,०९२ ग्रंथ वाचण्यासाठी देण्यात आले.

दर वर्षीप्रमाणे या वर्षीही खाली नमूद केलेल्या मान्यवर व्यक्ती आणि संस्था यांनी ग्रंथालयाला अमूल्य ग्रंथ भेट म्हणून दिले.

१ ) प्राचार्य स. य. गंभीर
२ ) डॉ. भीमराव कुलकर्णी
३ ) प्रा. म. आ. कुलकर्णी
४ ) प्रा. पी डी. आपटे
५ ) डॉ. ए. एल. पाथरे
६ ) प्रा. अ. गो. गोसावी
७ ) श्री. द. गो. बापट
८ ) सौ. सरोज पटवर्धन
९ ) श्री. एम. आर. ढवळे
१० ) श्री. जी. डी. पुंडे
११ ) श्री. एल. एम. नाडगीर
१२ ) श्री. एम. पी. चितळे
१३ ) श्री. बाठिया
१४ ) श्री. ठकरार
१५ ) श्री. खांडेकर
१६ ) श्री. चौगुले
१७ ) सौ. कल्याणी भाण्डे
१८ ) कु. बागूल
१९ ) कु. शुभदा थिटे
२० ) महाराष्ट्र राज्य, शिक्षण खाते
२१ ) राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ
२२ ) विद्यापीठ अनुदान मंडळ
२३ ) ब्रिटिश लायब्ररी, पुणे
२४ ) आंतरभारती प्रकाशन
२५ ) श्री. रावणशद्
२६ ) आय. बी. एच. पब्लिशिंग कंपनी
२७ ) प्रा. पी. एस. चिरपुटकर
२८ ) प्रा. पी. डी. पारखी
२९ ) रसायन विभाग, पुणे
३० ) गरवारे ट्रस्ट

**द. गो. बापट,**
ग्रंथपाल

## वार्षिक स्नेहसम्मेलन

दि. २२, २३ आणि २४ जानेवारी १९८३ ला यंदाचे वार्षिक स्नेहसम्मेलन उत्साहाने साजरे झाले. आनंद–मेळावा, वर्गनिहाय विविध गुणनिदर्शन, करमणूकप्रधान खेळ आणि अल्पोपाहार अशा चार क्षेत्रांत आनंद आणि उत्साह विभागला होता. आनंद–मेळाव्याला प्राध्यापक, विद्यार्थि–विद्यार्थिनींखेरीज अनेक अभ्यागतांनी भेट दिली. संयम, सहकार्य आणि सद्भावना यांमुळे आनंदमेळा आनंदपर्यवसायी झाला. वर्गनिहाय विविधगुणनिदर्शनांतून अनेक कलाकारांना आपल्या सुप्त गुणांचा आविष्कार करता आला. क्रीडाक्षेत्रात अनेकांचा सहभाग होता. अल्पोपाहाराची व्यवस्था कौतुकास्पद होती.

प्राचार्य गंभीर, उपप्राचार्य रायकर, प्रा. गोसावी, प्रा. पाथरे, प्रा. आपटे, प्रा. महाजन आणि प्रा. कुलकर्णी यांच्य कुशल संयोजनाला सर्व प्राध्यापकांनी, कर्मचाऱ्यांनी, विद्यार्थि–प्रतिनिधींनी आणि विद्यार्थि-विद्यार्थिनींनी परिश्रमपूर्वक साथ दिल्याने स्नेहसम्मेलन यशस्वी झाले.

**शं. ना. नवलगुंदकर**
संमेलन–प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना

प्रा. एम्. ए. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रा. पी. जी. दीक्षित व प्रा. एम. जी. गोहेल यांच्या सहकार्याने यंदाचे वर्षी पथकाचे योजकत्व प्रा. बी. जी. वाणी यांनी स्वीकारले. उप-प्राचार्य एस. आर. रायकर आणि डॉ. ए. के. पाण्डे या महाविद्यालय समन्वय समितीच्या सदस्यांचे पथकाला सतत सहाय्य मिळत गेले.

प्रा. एम्. ए. कुलकर्णी यांच्या विद्यार्थ्यांसाठी केलेल्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने १९८२–८३ च्या पहिल्या सत्राच्या नेहमीच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. दुसऱ्या सत्रात प्रा. एस्. एन्. नवलगुंदकर यांनी "सामाजिक कार्यातील राजकीय अडचणी" या विषयावर तर प्रा. कुलहळ्ळी, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, यांनी "सामाजिक समस्या म्हणजे काय व त्यांचे स्वरूप" या विषयावर व्याख्यान देऊन एक चर्चासत्र पूर्ण केले. या चर्चा–सत्रात कर्वे समाज संस्थेच्या काही विद्यार्थ्यांनीही भाग घेतला.

"वृक्षारोपण" : यंदाच्या वर्षीच्या विशेष सामाजिक कार्यक्रमाची सुरुवात मा. प्राचार्य स. य. गंभीर यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपणाने झाली व पाठोपाठ महाविद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन साजरा केला. या वर्षी शासकीय मध्यवर्ती मनोरुग्णालयाच्या आवारात वृक्षे लावणीचा विशेष प्रकल्प हाती घेण्यात आला. या प्रकल्पात मनोरुग्णालयाचे निवासी-अधिक्षक डॉ. देशमुख यांनी विशेष पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या कार्याचे चित्रीकरण करण्यापासून ते लघुपट व चित्रपट दाखविण्यापर्यंतचे सहाय्य करून विद्यार्थ्यांत एक चैतन्य निर्माण केले. "वृक्षगंगा" हा महाराष्ट्र राज्याच्या आंतर–विद्यापीठीय रा. से. योजनेचा कार्यक्रमात विद्यार्थी भिंताडे उ. सु. आणि डुंबरे मा. ह. यांनी महाविद्यालयाचे विद्यार्थी-प्रतिनिधित्व करून सहभाग दिला. कात्रज उद्यान संवर्धनासाठी पुण्यातील काही पथकांनी एक दिवशीय वृक्षारोपणाने जी सेवा केली त्या सेवेत याच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक होती कात्रज उद्यान संवर्धनाचा पुढील कार्यक्रम म्हणून संवर्धनाची योजना राबविण्याची दीर्घकालीन तयारी महाविद्यालयाने महानगरपालिकेला कळविली आहे. मुंबई येथील आरे येथे झालेल्या "वृक्ष स्नेह संस्कार" छावणीतही पथकाचे प्रतिनिधित्व केले गेले.

पुण्यातील रा. से. योजनेच्या विद्यार्थिनींसाठीचे पहिले आणि नाविन्यपूर्ण द्विदिवशीय "जाणीव शिबीर" महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात सेंट मीरा कॉलेज, स. प. महाविद्यालय, नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, हडपसर} महाविद्यालय, यशवंतराव मोहिते महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय व श्री शाहू मंदिर महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी भाग घेतला व सद्यस्थितीच्या संदर्भात 'जाणीव' करून घेतली. या शिबिराचे मार्गदर्शन




राष्ट्रीय सेवा योजनेने भरविलेले रक्तदान शिबिर

पुणे विद्यापीठातील डॉ. दुर्गा दीक्षित यांनी केले होते. या शिबिराचे उद्‌घाटन मा. प्राचार्य स. य. गंभीर यांनी केले व डॉ. भालचंद्र फडके, निरंतर शिक्षण व प्रौढ शिक्षण संचालक, पुणे विद्यापीठ, प्रा. सत्यरंजन साठे, प्राचार्य विधि महाविद्यालय, इत्यादी प्रभृतींनी भेटी व व्याख्याने देऊन शिबीर यशस्वी करविले. 'रोटरॅक्ट क्लब, पुणे पश्चिम 'चे अध्यक्ष संजय जाजू यांनी त्यांच्या क्लबच्या वतीने रक्तदान–शिबीर घेतले. या शिबिरात ११६ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून नवीन उच्चांक प्रस्थापित केला. रक्तदानाच्या उत्तेजनार्थ क्लबतर्फे एक फिरती ढाल ठेवण्यात आली असून अधिकाधिक रक्तदानाबद्दल एस. वाय. बी. एस्सीच्या वर्गाने यंदाचे यशाचा मान घेतला. या शिबिरात कार्य केलेल्या विद्यार्थ्यांना क्लबने त्यांच्या वार्षिक समारंभात प्रशस्तिपत्रके वाटली. 'ग्रामायन 'तर्फे शिवतक्रार–म्हाळुंगे येथे भरविण्यात आलेल्या शिबिरात, विद्यार्थी शिर्के वि. श्री., मनोहर मी. य., जोशी म. वा., रत्नपारखी प्र. प. व डुम्बरे मा. ह. यांनी ग्रामीण विद्यार्थी, ग्रामीण समाज व ग्रामीण कार्यकर्ते यांचे बरोबर समाज सेवेचे सहकार्य केले.

१९८२–८३ चे संघनायक म्हणून व विशेष विद्यार्थी म्हणून विद्यार्थी शिर्के वि. श्री., मनोहर मी. य., कु. नीता गोरे, कु. दुधाने शु. तु. व कु. ढमढेरे ज. ध. यांची निवड करण्यात आली. तर यंदाचे 'कै. शंकर शेलार, समाजसेवा पारितोषिक' विद्यार्थी केसकर राजेंद्र यास देण्यात आले.

फिल्म इन्स्टीटयूटला पथकाने भेट दिली. या भेटीत इन्स्टीटयूटच्या 'प्रोटोटाइप युनिटने' तयार केलेले पाच लघुपट विद्यार्थ्यांना दाखविले. सामाजिक समस्येसंबंधी प्रा. पोखरापूरकर यांनी विशेष विवेचन केले.

**श्री. शिर्के वि. श्री., मनोहर मि. य., कु. गोरे नी. श्री., कु. दुधाळे शु. तु.**
विद्यार्थी प्रतिनिधी

**प्रा. बा. गो. वाणी**
कार्यक्रमाधिकारी

## कर्नावट–करंडक आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

मॉडर्न महाविद्यालयाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या वादस्पर्धा दि. २० ऑगस्ट १९८२ या दिवशी आयोजित करण्यात आल्या. "सत्रपद्धतीमुळे उच्च शिक्षणाचे हित साधत आहे." हा वादप्रस्ताव होता. स्पर्धांचे उद्‌घाटन स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दि. ब. केरूर यांच्या हस्ते झाले. परीक्षक म्हणून विधि महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस्. व्हि. कुलकर्णी व नेस वाडिया महाविद्यालयाचे प्रा. शामराव जोशी यांनी काम पाहिले. यावेळी निरनिराळ्या महाविद्यालयांच्या एकूण १३ संघांनी व २६ स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. धुळे येथील विद्यावर्धिनी सभेच्या महाविद्यालयाच्या संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून करंडक जिंकला. वैयक्तिक पारितोषिके श्री. सतीश मोघे (प्रथम) विद्यावर्धिनी, धुळे व कु. गीता मेहेंदळे (द्वितीय) विधि महाविद्यालय, पुणे यांनी मिळविली.

**डॉ. सु. व्यं. धायगुडे**

## पदव्युत्तर विद्यार्थी संघटना

ह्या वर्षी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सु. ग. दातार ह्यांच्या अध्यक्षतेखाली ह्या संघटनेचे कार्य सुरू झाले. यंदा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून खालील विद्यार्थ्यांची निवड झाली—

१) श्री. दाढे सुनील — एम्. कॉम्. पार्ट १
२) कु. गोडखिंडी विद्या — एम्. कॉम्. पार्ट २

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून विविध तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. 'सहकार व्यवस्थापन' ह्या विषयावर वैकुंठलाल मेहता इन्स्टिटयूटमधील डॉ. गो. स. कामत यांचे, 'कंपन्यांचे आर्थिक नियोजन' ह्या विषयावर श्री. गुर्जर ह्यांचे व 'केस स्टडीज'वर श्री. शामकांत गोखले ह्यांची उद्‌बोधक व्याख्याने झाली. तसेच विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या विषयांतील संदर्भ त्वरित उपलब्ध व्हावेत ह्यासाठी असे संदर्भ संकलित करण्यात आले. हे कार्य विद्यार्थ्यांनीच उत्साहाने केले. सत्राअखेर एम्. कॉम्. पार्ट १ चे विद्यार्थी पार्ट २ च्या विद्यार्थ्यांसाठी निरोप–समारंभ आयोजित करीत आहेत.

रोटरी क्लब पूना ( वेस्ट ) च्या वतीने आयोजित केलेल्या मि. युनिव्हर्सिटी ह्या स्पर्धेत श्री. सुनील दाढे ( एम्. कॉम. पार्ट १ ) ह्याची मि. युनिव्हर्सिटी म्हणून निवड झाली. त्याचे मनःपूर्वक अभिनंदन. मा. प्राचार्य, उपप्राचार्य, अध्यक्ष व सल्लागार प्राध्यापकांच्या सातत्याच्या मार्गदर्शनाने व प्रोत्साहनामुळे संघटना यशस्वीरीत्या कार्य करू शकली हे नमूद करावयास आनंद वाटतो.

**सुनील दाढे,**
प्रतिनिधी–पार्ट १

**कु. विद्या गोडखिंडी**
प्रतिनिधी–पार्ट २

## कनिष्ठ महाविद्यालय

कनिष्ठ महाविद्यालयात या वर्षी इयत्ता अकरावीच्या १० तुकड्या व बारावीच्याही १० तुकड्या अशा एकूण २० तुकड्या होत्या. त्यात कला शाखेच्या ४, शास्त्र शाखेच्या ८ व वाणिज्य शाखेच्या ८ अशी विभागणी होती.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. दिनांक १९ ऑगस्ट १९८२ रोजी बारावी शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांसाठी 'बारावी शास्त्र शाखेनंतरचे अभ्यासक्रम' या विषयावर डॉ. श्री. वा. चितळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच महत्त्वाच्या कोर्सेसबद्दलच्या माहितीची चक्रमुद्रित टिपणे विद्यार्थ्यांना वाटण्यात आली. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरांचा उपयुक्त कार्यक्रमही झाला. एकंदरीत विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्तम होता.

बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी विषयाची निवड कशी करावी हा पेच नेहमीच विद्यार्थ्यांना असतो. आपल्या महाविद्यालयात कोणकोणते विषय शिकविण्याची सोय आहे आणि आपल्याला पुढे काय करावयाचे आहे हे ठरवून विषयांची निवड कशी करावी यासंबंधी प्रा. सु. ग. दातार व प्रा. अ. गो. गोसावी यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना उपयुक्त व बहुमोल मार्गदर्शन केले.

जर्मनीहून आलेल्या व सध्या रानडे इन्स्टिट्यूटमध्ये जर्मन विषय शिकवित असलेल्या प्रो. शाईन यांनी ११ वी च्य विद्यार्थ्यांना जर्मनी या देशाची भौगोलिक माहिती देणाऱ्या स्लाईडस् दाखविल्या. जर्मन ॲल्पस ( German Alps ) नद्या व विविध वस्तूंबद्दलची माहिती त्यांनी अतिशय सोप्या भाषेत पण मनोरंजक पद्धतीने विद्यार्थ्यांना सांगितली. विशेषतः स्लाईडस् दाखविल्यामुळे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना मनापासून आवडला.

बारावी जर्मनच्या विद्यार्थ्यांसाठी जर्मन वास्तुशिल्प हा थोडासा क्लिष्ट विषय निवडून त्यांनी विद्यार्थ्यांना पुन्हा वेधक अशा स्लाईडस्च्या साहाय्याने गोटिक, रोमानिक इ. वास्तुशिल्पकलांची माहिती दिली.

लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू स्पष्ट करणाऱ्या विविध घटनांसंबंधीची एक खुली निबंध स्पर्धा अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावलीत.

१ ) कु. मेधा महाजन, ११ वी एच्
२ ) कु. साधना शेंडे, ११ वी आय्
३ ) कु. अनिता खोत, ११ वी जी
४ ) कु. नीता संसारे, १२ वी ए
५ ) कु. सीमा ठोमरे, १२ वी ए
६ ) कु. सुषमा कुलथे, ११ वी एच्

वाणिज्य विषयाशी संबंधित अशी एक अभिनव निबंधस्पर्धा अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. प्रथम पारितोषिक योग्य निबंध नव्हता.

द्वितीय क्रमांक – कु. मीना देशपांडे व तृतीय क्रमांक – कु. ज्योती मुथा यांना मिळाली.

प्रा. सीताराम रायकर व प्रा. सुरेश दातार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नाट्याभिनय, नाट्यवाचन, कथाकथन आणि एकांकिका या कलाप्रकारातील नैपुण्य दाखविण्यासाठी दरवर्षीप्रमाणे या वेळीही दि. १०, ११ व १२ जानेवारी १९८३ रोजी वरील प्रकारातील आंतर-वर्गीय स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. प्रत्येक कलाप्रकारात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

दिनांक १३ जानेवारी १९८३ रोजी माननीय चांदेकरसाहेब, प्रादेशिक शिक्षण उपसंचालक आणि वेगवेगळ्या विषयातील तज्ञांच्या तुकडीने कनिष्ठ महाविद्यालयाची तपासणी ( Inspection ) केली. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील सुसंवादाचे व खेळीमेळीच्या वातावरणाबद्दल श्री. चांदेकरसाहेबांनी प्रशंसोद्गार काढले. तसेच सर्व शिक्षकांसमवेत सभा होऊन त्यांनी काही मौलिक सूचनाही केल्या.

कनिष्ठ महाविद्यालय समितीतीमध्ये या वर्षी डॉ. ( सौ. ) माधवी मित्र, श्री. आर. व्ही. जोशी, श्री. जे. पी. चिंचोरे व सौ. जे. पी. गोडबोले यांचा समावेश होता.

कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक, कला, सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमांसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे उत्कृष्ठ सहकार्य मिळाले हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. या सगळ्यांच्या सहकार्यामुळेच आम्ही विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवू शकलो. त्यांचे हार्दिक आभार !

**प. स. चिरपुटकर,**
उपप्राचार्य

## कलामंडळ

दरवर्षीप्रमाणेच कलामंडळाच्या उत्साही कलाकारांनी या वर्षीही अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

दिनांक २५ ऑगस्ट ८२ रोजी, कलामंडळाच्या उत्साही कलाकारांचे एक पथक कोंढवा येथे कुष्ठरोगी – इस्पितळामध्ये गेले. तेथे त्यांनी रोग्यांसाठी एक विविधगुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. यात खालील विद्यार्थ्यांचा समावेश होता—

| | | | |
|---|---|---|---|
| प्रेमकुमार सबापती, | देवदत्त पाठक, | वडगाकर, | कु. सुनंदा शाळिग्राम, |
| संजय गायकवाड, | सुनील कुलकर्णी, | कु. अनिता गर्दे, | कु. शुभदा गोडबोले, |
| यशवंत कुलकर्णी, | विलास कुलकर्णी, | गगनविहारी बोराटे, | कु. मेधा जोशी, |
| अतुल चौधरी, | अशोक रानडे, | कु. राजश्री देशमुख, | कु. सुषमा गटणे, |
| विकास पेशवे, | कु. मीना माने, | कु. वर्षा बरके, | कु. स्मिता सोमण. |
| आनंद पाध्ये, | कु. शुभदा शहा, | कु. सीमा ठोंबरे, | |

कलामंडळाच्या या वर्षाची सुरुवात, अशा प्रकारे समाजकार्याने झाली. यानंतर दिनांक २९ ऑगस्ट ८२ रोजी, पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका–स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाने श्री. राजीव जोशी यांनी लिहिलेली ' बंदी ' ही एकांकिका सादर केली. विद्यार्थी दिग्दर्शक होते यशोधन बाळ. भाग घेणारे कलावंत—यशोधन बाळ, मंजुषा दाते, गौरी जोशी. पडद्यामागे साह्य करणारे विद्यार्थी होते—प्रेमकुमार सबापती, राजश्री बेडेकर, विजय वैद्य, विकास पेशवे, वैशाली वाबळे, महेश गोडबोले आणि सचिन शेटये.

डेक्कन जेसीज क्लबच्या वतीने यंदा प्रथमच पुण्यात आंतरमहाविद्यालयीन पथनाट्यस्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने अभिमानास्पद प्रयोग सादर करून दुसरा क्रमांक मिळविला आणि रु. १०१|– चे रोख बक्षीस मिळविले. राजीव कुलकर्णी यांनी ' आजका अभिनेता आजका नेता ' या विषयावर लिहिलेले पथनाट्य, विद्यार्थ्यांनी फर्ग्युसन रस्त्यावर दि. २८ सप्टेंबर ८२ रोजी एका पावसाळी सायंकाळी सादर केले. यात खालील विद्यार्थ्यांचा सहभाग होता :

यशोधन बाळ, कृती नागरेचा, सुकेतू नागरेचा, आरती शेंडे, मंजिरी काळे, सुशील जोशी, संजय गायकवाड, त्यागराज खाडिलकर, गगनविहारी बोराटे, निमिष तोटे, गिरीश राव, वैशाली वाबळे. या कलाकारांपैकी गगनविहारी बोराटे आणि वैशाली वाबळे यांना अभिनयाची विशेष बक्षिसे मिळाली.

सप्टेंबर महिन्यामधेच अहमदनगर येथे झालेल्या दोन स्पर्धांमध्ये आपल्या कलाकारांनी भाग घेतला. लायन्स क्लब सुगम संगीत स्पर्धेमध्ये त्यागराज खाडिलकर, गीता चिपळूणकर आणि शारदा करंडक कथाकथन स्पर्धेमध्ये आनंद पाध्ये, सविता जोशी.

दि. ३० ऑगस्ट ८२ रोजी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या छोटेखानी आणि सुबक सभागृहामध्ये साहित्य आणि कलाप्रेमी मंडळी जमलेली होती. आमच्या कलामंडळाने आयोजित केलेला एक आगळा कार्यक्रम. सुप्रसिद्ध लेखक श्री. पु. ल. देशपांडे यांनी वाचलेल्या ' मर्ढेकरांच्या कविता '. आपल्या प्रत्ययकारी काव्यवाचनाने पु. लं.नी श्रोतृवर्गाला संमोहित करून टाकले.

गरवारे महाविद्यालयाच्या स्टुडन्ट्स ॲक्टिव्हिटी सेंटरतर्फे झालेल्या संगीत स्पर्धेत त्यागराज खाडिलकर याने नाट्यसंगीत विभागात दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तसेच कालिदास संगीत स्पर्धेत कु. मृदुला कुलकर्णी, कु. सुजाता गानू आणि कु. गोखले यांनी समूहगीत सादर केले. पेटीवर साथ होती देवदत्त पाठक यांची.

दिनांक २५ ऑक्टोबर ८२ रोजी कलामंडळ आणि साहित्य-संघटना यांनी संयुक्तपणे एक चर्चासत्र घडवून आणले. 'टिळक आणि आगरकर' या नाटकावर चर्चा केली. डॉ. य. दि. फडके, डॉ. अरविंद देशपांडे, डॉ. श्री. दा. संगोराम, प्रा. सीताराम रायकर या प्रमुख वक्त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी चर्चासत्र रंगविले.

कलामंडळ व साहित्य-संघटना यांच्या वतीने आयोजित केलेल्या 'टिळक आणि आगरकर' या नाटकाच्या परिसंवादाचे अध्यक्ष **डॉ. य. दि. फडके** यांचा सत्कार.



महाविद्यालयाबाहेरील तरुण आणि उगवत्या कलाकारांचे कौतुक आमच्या कलामंडळाने नेहमीच केलेले आहे. औरंगाबाद येथील श्री. नंदकिशोर देशमुख यांच्या एकपात्री प्रयोगाचा कार्यक्रम महाविद्यालयामध्ये दि. १५ डिसेंबर ८२ रोजी आयोजित केला.

ड्रॉपर्स नाट्यवाचन स्पर्धेमध्ये आम्ही विजय तेंडुलकरांचे ' कमला ' हे नाटक वाचले. यात भाग घेणारे विद्यार्थी होते गगनविहारी बोराटे, सुशील जोशी, राजश्री बेडेकर, मंजिरी काळे आणि गौरी जोशी.

फिरोदिया करंडक स्पर्धेमध्ये दि. ८ जानेवारी ८२ रोजी महाविद्यालयाने विविध-गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमातील कलाकार त्यागराज खाडिलकर यास ' मिमिक्री 'चे प्रथम पारितोषिक मिळाले. इतर कलाकार होते गगनविहारी बोराटे, अनिता गर्दे, अरविंद गायकवाड, गिरीश राव, निमिष तोटे, विद्याधर भागवत, शुभदा शहा, वडगावकर, देवदत्त पाठक, संजय गायकवाड, गजगौरी पुरंदरे. या कार्यक्रमाला श्री. जे. पी. चिन्चोरे यांचे मार्गदर्शन लाभले होते.

बी. जे. मेडिकल महाविद्यालयाच्या संगीत स्पर्धेत आपल्या कलामंडळाने सादर केलेल्या वाद्यवृंदामधील गायिका अनिता गर्दे हिला गायनाचे खास पारितोषिक मिळाले. वाद्यवृंदातील कलाकार होते त्यागराज खाडिलकर, प्रेम सबापती, यशोधन बाळ, आनंद पाध्ये, अरविंद गायकवाड, संजय गायकवाड, अतुल चौधरी, कांबिये, कुलकर्णी, अय्यर, सचिन शेटये.

महाविद्यालयांतर्गत स्पर्धेचे हे ४ थे वर्ष दि. १०, ११, १२ जानेवारी १९८३ या तीन दिवसांत नाट्याभिनय, नाट्यवाचन, कथाकथन व एकांकिका या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. नेहमीप्रमाणे या वर्षी सुद्धा बहुसंख्य विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कला-प्रकारात भाग घेतला.

या स्पर्धेसाठी प्रा. व्ही. जी. जोशी व प्रा. सौ. शाळीग्राम यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे—

**नाट्याभिनय :**

प्रथम क्रमांक : कु. वंदना देशपांडे, द्वितीय क्रमांक : बिपीन नांदुर्डीकर.

**कथाकथन :**

प्रथम क्रमांक : सदानंद दाते, द्वितीय क्रमांक : आनंद पाध्ये, तृतीय क्रमांक : संदीप बक्षी.

**नाट्यवाचन :**

**वरिष्ठ महाविद्यालय :**

प्रथम क्रमांक : वेरावती द्वितीय क्रमांक : कमला तृतीय क्रमांक : अश्रूंची झाली फुले

**कनिष्ठ महाविद्यालय :**

प्रथम क्रमांक : चोरी झालीच नाही द्वितीय क्रमांक : कोण आहे आत ?

**नाट्यवाचन : वैयक्तिक पारितोषिके**

**वरिष्ठ महाविद्यालय :**

प्रथम क्रमांक : विकास पेशवे, द्वितीय क्रमांक : मनीषा जोशी, तृ. क्रमांक : कु. रोहिणी दिकसंगीकर

**कनिष्ठ महाविद्यालय :**

प्रथम क्रमांक : प्रसाद गणपुले, द्वितीय क्रमांक : कु. आरती शेंडे.

**एकांकिका :**

उत्कृष्ट प्रयोग निर्मितीसाठी असलेले पारितोषिक : ' अंकूर '

उत्कृष्ट अभिनयासाठी असलेली वैयक्तिक पारितोषिके —

प्रथम क्रमांक : गगनविहारी बोराटे, द्वितीय क्रमांक : अशोक रानडे,

तृतीय क्रमांक : त्यागराज खाडिलकर, चतुर्थ क्रमांक : जयंत निंबधे.

या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन श्री. जे. पी. चिंचोरे यांनी केलेले होते.

युवक महोत्सव एकांकिका स्पर्धेत आम्ही राजीव कुलकर्णी यांनी लिहिलेली ' वेरावती ' ही एकांकिका यशस्वीरीत्या सादर केली. यशोधन बाळ याने ही एकांकिका दिग्दर्शित करून त्यामध्ये कामही केले होते. दि. २० जाने. ८३ रोजी सादर केल्या गेलेल्या या एकांकिकेतील इतर कलाकार होते. अनंत डोरले, देवदत्त पाठक, धनंजय वेर्णेकर, आनंद पाध्ये, विजय वैद्य, संजय भोसले, सुहास साठे, विनय माडीवाले, विकास पेशवे, मिलिंद दाते, शुभदा शहा, वंदना देशपांडे. एकांकिकेला पार्श्वसंगीत सुशील जोशी याने दिले होते.

इंजिनीअरिंग कॉलेज व रोट्रॅक्ट क्लब यांनी घेतलेल्या आंतरमहाविद्यालयीन लोकनृत्य स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाने कौतुकास्पद कामगिरी करून दुसरा क्रमांक व थम्स-अप कप पटकाविला. या यशाचे मानकरी होते—मीरा सातपुते, रोहिणी सातपुते, संदीप तवले, अभय म्हस्के, अनंत सोवळे, रेणू चौधरी, मिलिंद शाळीग्राम, इच्छा पाटील, जसविंदरसिंग, सुधीर जगताप, शुभदा शहा, अंजली मैत्राणी, नीता गोरे, बिपिन पाटोळे, मेधा तिळगुळकर संजय बालगुडे, परिमला गोखले, देवदत्त पाठक, सुजाता गानू , सुनील कुलकर्णी, संजय गायकवाड.

महाविद्यालयाच्या संघाने जळगाव येथे फेब्रु. ८३ मध्ये झालेल्या युवकमहोत्सवात भाग घेतला. कु. सीमा पुंडले या विद्यार्थिनीने मराठी परिसंवादात दुसरा क्रमांक आणि रौप्यपदक मिळविले. महाविद्यालयाच्या समूहनृत्याला चौथा क्रमांक मिळाला.

विकास पेशवे या विद्यार्थ्याने लिओ क्लब पुणे यांनी घेतलेल्या एकपात्री अभिनय स्पर्धेत चौथ्या क्रमांकाचा करंडक मिळविला.

असे हे कलामंडळाचे आणखी एक यशस्वी वर्ष पार पडले. अनेकांचे सहकार्य महाविद्यालयातून मिळाले. विशेष आभार मानायचे ते प्राचार्य गंभीर, कार्यालयीन कर्मचारी आणि जिमखाना विभागातील सहकारी प्राध्यापक यांचे. सर्व संगीत-नृत्यादी स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना खास मार्गदर्शन केले. प्रा. सौ. लीना पाटणकर यांनी- विविधगुणदर्शनपर स्पर्धा, आणि महाविद्यालयांतर्गत नाट्यस्पर्धा पार पाडण्यास बहुमोल मदत झाली श्री. जे. पी. चिंचोरे यांची. पुरुषोत्तम एकांकिका स्पर्धा युवक महोत्सवातील विविध कला प्रकार, पथनाट्य स्पर्धा व इतर आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांसाठी श्री. राजीव कुलकर्णी यांचे बहुमोल मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांना लाभले. श्री. सुहास साठे, ड्रामा सेक्रेटरी, यांचीही वेळोवेळी स्पर्धांसाठी मदत झाली.

**मुकुंद महाजन**
विद्यार्थी प्रतिनिधी

**वि. भा. देशपांडे**
कार्याध्यक्ष : कलामंडळ

## नियोजन चर्चा मंडळ

१९८२-८३ साठी नियोजन चर्चा मंडळाच्या व्यवस्थापन-समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश होता. प्राचार्य स. य. गंभीर ( अध्यक्ष ) प्रा. रमेश शहा ( कार्याध्यक्ष ), प्राध्यापक सदस्य— प्रा. सौ. व्ही. एस. कुलकर्णी, प्रा. वाय. एम. सुमंत आणि प्रा. सुमन कौशल.

विद्यार्थी प्रतिनिधी— कु. सविता सबनीस, श्री. उदय दिडोरकर, कु. सीमा पुंडले, कु. वैजयंती राजवाडे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक भेटी आणि कामकाजाची प्रत्यक्ष माहिती यावर नियोजन चर्चा मंडळाने अधिक भर दिला.

प्रथम सत्रामध्ये जिल्हा उद्योग केंद्र, शेती विभाग संशोधन केंद्र, लघुउद्योग विकास संस्था, इलेक्ट्रॉनिक्स टेस्टींग आणि डेव्हलपमेंट केंद्र अशा विविध संस्थांची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीच्या वेळी श्री. एस. पी. बाध ( जनरल मॅनेजर ), श्री. पी. एच. भावे, श्री. व्ही. के. गोखले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध योजना विद्यार्थ्यांना समजावून दिल्या. विविध यंत्रसामुग्रीचा प्रत्यक्ष वापर कसा केला जातो, त्याचा अर्थव्यवस्थेला कोणत्या पद्धतीने फायदा होता याची तांत्रिक माहिती अतिशय सोप्या पद्धतीने दिली.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शैक्षणिक भेट २९ सप्टेंबर १९८२ रोजी आयोजित करण्यात आली. बँकेच्या सर्व विभागाची—विशेषतः ठेवी विभाग, कर्ज विभाग, निरसन केंद्र विभाग, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट विभागाच्या प्रत्यक्ष कामकाजाची श्री. बाबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माहिती दिली.

आक्टोबर १९८२ मध्ये मुंबईच्या ' फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईज ' या संघटनेच्यावतीने ' सेठ वालचंद हिराचंद वक्तृत्वस्पर्धा ' आयोजित करण्यात आली. ह्या स्पर्धेमध्ये कु. ज्योती गिरमे ( तृतीय वर्ष साहित्य ) प्रथम क्रमांक, कु. रोहिणी खाडिलकर ( ११ वी आय )– द्वितीय क्रमांक, कु. सीमा कुलकर्णी ( तृतीय वर्ष साहित्य )– तृतीय क्रमांक हे स्पर्धक यशस्वी झाले.

द्वितीय सत्रामध्ये पुण्यामध्ये नवीनच स्थापन झालेल्या पूना स्टॉक एक्स्चेंजला १७, १८, १९ व २० जानेवारी १९८३ या काळात शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. एक्स्चेंजचे सेक्रेटरी श्री. मनोहर गाजे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक्स्चेंजच्या कामकाजाची संपूर्ण माहिती प्रत्येक बॅचला समजावून दिली. आणि २॥ ते ३॥ या काळात एक्स्चेंजच्या व सभासदांच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती समजावून घेण्याची संधी उपलब्ध करून दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई द्वारा आयोजित, ' वालचंद हिराचंद यांचे भारताच्या आर्थिक प्रगतीत योगदान ' या विषयांवरील निबंधस्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थीगटात कु. सविता सबनीस ( तृतीय वर्ष साहित्य ) या विद्यार्थिनींच्या निबंधास प्रथम क्रमांकाचे ३००/— रु.चे पारितोषिक मिळाले.

प्रा. ठाकूरदास बंग यांचे ' भारतीय नियोजनातील त्रुटी ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांचा देशाच्या विकासात प्रत्यक्षात सहभाग, सामाजिक जाणीव यावर त्यांनी आपल्या व्याख्यानात विशेष भर दिला.

संघटनेच्या कार्यक्रमात ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

**कु. सविता सबनीस**
विद्यार्थी प्रतिनिधी

**प्रा. रमेश शहा**
कार्याध्यक्ष

## वादविवाद मंडळ

१९८२–८३ या शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागांतील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्तरांवरील विविध वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये उत्साहाने भाग घेऊन आपले प्राविण्य प्रस्थापित केले.

कर्नावट करंडक वादस्पर्धा ( पुणे ), न्या. रानडे वादस्पर्धा, स्व. दीनदयाल उपाध्याय स्पर्धा ( पुणे ), डॉ. पद्मश्री विखे पाटील स्पर्धा ( प्रवरानगर ), लिओ क्लब वक्तृत्व स्पर्धा ( पुणे ) इत्यादी स्पर्धांमध्ये कु. सीमा पुंडले, कु. ज्योति गिरमे, आनंद पाध्ये, बिपीन नांदुर्डीकर, मनोज जोशी या स्पर्धकांनी मॉडर्न महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

कर्नावट करंडक वाद–स्पर्धेत कु. सीमा पुंडले हिने उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक मिळविले. न्या. रानडे वादस्पर्धेत प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र मिळविले. दीनदयाल वाद-स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. डॉ. पद्मश्री विखे पाटील वाद स्पर्धेत द्वितीयक्रमकांचे पारितोषिक मिळविले. जळगाव येथे झालेल्या २७ व्या युवक महोत्सवात द्वितीय क्रमांकाचे रौप्यपदक मिळविले. त्यांचे हे यश निश्चितच प्रशंसनीय आहे.

लिओ क्लब स्पर्धेत मनोज जोशी याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तसेच बिपीन नांदुर्डीकर याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. दीनदयाल वादस्पर्धेत उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक मिळविले. त्यांचे हे यश निश्चितच प्रशंसनीय आहे.

' स्व. दीनदयाल उपाध्याय करंडक ' मॉडर्न कॉलेजने मिळविला. कु. सीमा पुंडले व बिपीन नांदुर्डीकर यांचा त्यात सहभाग होता.

**डॉ. शं. ना. नवलगुंदकर,**
**प्रा. जयंत जोर्वेकर**

# शास्त्र-संघटना

**व्यवस्थापन समिती :**

**अध्यक्ष :** प्राचार्य स. य. गंभीर.

**कार्याध्यक्ष :** प्रा. चं. गु. कुलकर्णी

**प्राध्यापक सदस्य :** श्री. रा. वा. जोशी, श्री. भा. वा. भोमे, कु. नयना पु. कारखानीस, सौ. मंगला भि. शिंदे.

**विद्यार्थी प्रतिनिधी :** तृतीय वर्ष शास्त्र : श्री. सु. अ. घायाळ, श्री. श. प्र. चांदकर, श्री. आ. घ. पाध्ये, कु. वा. पां. करमकर, श्री. ज. वि. साठे, श्री. अ. श्री. गोरे,
द्वितीय वर्ष शास्त्र : श्री. पा. ना. ठकार, श्री. गि. वि. अंकलेकर, श्री. मु. श. बवरे, कु. गौ. श. पाटील, श्री. श्री. सो. ठकार, श्री. गि. प्र. ढेकणे श्री. अ. रा. डुमणे, श्री. वे. स. वेदमणी.

**कार्यालयीन व्यवस्था :** श्री. भू. र. दोशी

**( १ ) उद्घाटनाचे व्याख्यान :** दि. ६ ऑगष्ट १९८२

विषय : Role of Computers in Industry, in Every day life.
व्याख्याते : श्री. अ. नी. गोडबोले, बी. ई. ( मेक. ), हायर डिप्लोमा इन् जर्मन, मॅनेजर, कॉम्प्युटर सर्व्हिसेस, किर्लोस्कर कमिन्स.

**( २ ) विज्ञान कथास्पर्धा :** वरिष्ठ महाविद्यालयांतील शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ' विज्ञान कथास्पर्धा आयोजित करण्यात आली. एकूण १४ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. डॉ. सु. व्यं. धायगुडे यांनी परीक्षक म्हणून काम केले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे—

| बक्षीस क्रमांक | कथेचे नाव | कथा लेखक |
|---|---|---|
| पहिला | शास्त्र-संग्राम | श्री. अनिल श्रीपाद गोरे, तृतीय वर्ष शास्त्र |
| दुसरा | दुसऱ्या पृथ्वीवर | श्री. गिरीश उ. देसाई, प्रथम वर्ष शास्त्र |
| तिसरा | परग्रहावर | श्री. श्रीकांत सोपानदेव ठकार, द्वितीय वर्ष शास्त्र. |

**( ३ ) प्रोत्साहन :** शास्त्र संघटनेकडून शास्त्रीय प्रतिकृती तयार करणे, शास्त्रीय नित्योपयोगी साधने तयार करणे, उपकरणे तयार करणे यासाठी होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत आणि सल्ला या स्वरूपात प्रोत्साहन दिले जाते. खालील दोन गोष्टींचा जरूर उल्लेख करावा वाटतो.

( i ) श्री. सुधीर जोशी ( तृतीय वर्ष शास्त्र ) या विद्यार्थ्यांची ' इलेक्ट्रॉनिक्स फॉर यू ' या मासिकात आजपर्यंत खालील तीन स्वतः रेखलेली विद्युत-मंडले प्रसिद्ध झालेली आहेत.

( अ ) मिनिएचर लॅम्प फ्लॅशर : छोटे दिवे याला जोडले असता ते उघडझाप करतात.

( ब ) मिनी इमर्जन्सी लाईट : वीज जाताच याचा दिवा लागतो.

( क ) सिग्नल इंजेक्टर : रेडिओ, टेपरेकॉर्डर यांसारख्या उपकरणांच्या दुरुस्तीसाठी याचा उपयोग होतो. बाजारात मिळणाऱ्या इंजेक्टरपेक्षा हा इंजेक्टर आकाराने लहान व किंमतीने कमी आहे

( ii ) तृतीय वर्ष शास्त्र च्या विद्यार्थ्यांनी ' जैविक वायू संयम ' ( गोबर गॅस प्लँट )ची चलित प्रतिकृती तयार केली. विद्यार्थ्यांना डॉ. पांडे यांनी मार्गदर्शन केले.

**(४) मध्यावधी व्याख्यान :** दि. १७ फेब्रुवारी १९८३.

**विषय :** Working of a Practical Heat Engine.

**व्याख्याते :** श्री. एस्. एन्. बोस, इंजिनीअर रस्टन हार्नबी कंपनी.

**(५) व्यवसाय मार्गदर्शन शिबीर :** संघटनेच्या सहकार्याने हे शिबीर दि. १८, १९ व २० फेब्रुवारी १९८३ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. या शिबिरात १०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. हे शिबीर एकूण पाच सत्रांमध्ये घेण्यात आले.

**सत्र पहिले :** या सत्रात 'स्वयं रोजगार' या विषयावर पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. श्री. आर. पी. बेंद्रे (विकास अधिकारी, पश्चिम विकास महामंडळ), श्री. एस. व्ही. गुळवणी, (अधिकारी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ), श्री. चावरे (उद्योग निरीक्षक, जिल्हा उद्योग केंद्र) आणि महाराष्ट्र बँकेचे दोन अधिकारी श्री. मुकुंद देशपांडे आणि श्री. अरविंद गर्दे या तज्ज्ञांनी 'स्वयं रोजगार' या विषयावर व्याख्यान व चर्चा या द्वारे मार्गदर्शन केले.

याच सत्राच्या दुसऱ्या भागांत उपप्राचार्य रायकर यांनी विद्यार्थ्यांना 'अर्ज कसे लिहावेत ?' या विषयी व्याख्यान दिले. आणि दिलेल्या जाहिरातींना अनुसरून विद्यार्थ्यांना अर्ज लिहून आणण्यास सांगितले.

**सत्र दुसरे :** 'पदवी परीक्षेनंतर पुढे...' या विषयावर प्रा. चं. गु. कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले.

**सत्र तिसरे :** प्रा. (सौ.) शाळीग्राम आणि प्रा. (सौ.) सेन यांनी या सत्राचे संचालन केले. मानसशास्त्रीय चांचण्यांचे शिक्षण विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह देण्यात आले. 'समूहचर्चे'चे मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिकांसह करण्यात आले.

**सत्र चौथे :** या सत्रांत प्रथम उपप्राचार्य रायकर यांनी विद्यार्थ्यांनी लिहलेल्या अर्जांचे विश्लेषण केले. त्यानंतर 'विविध चांचण्यांची तयारी कशी करावी ?' याविषयी श्री. ए. आर. बोर्डे (ट्रेनिंग सेंटर, स्टेट बँक ऑफ इंडिया) यांनी मार्गदर्शन केले. 'मुलाखती कशा द्याव्यात ?' यावर प्रा. एस. जी. दातार यांनी व्याख्यान दिले. या व्याख्यानानंतर 'मुलाखतींची प्रात्यक्षिके' विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. या मुलाखती श्री. ए. जी. भावे (गौरी फाईन केमिकल्स) प्रा. दातार, प्रा. गोसावी व प्रा. डॉ. (सौ.) मित्रा यांनी घेतल्या. या मुलाखतींचे नंतर विश्लेषण करण्यात आले.

**सत्र पाचवे :** या सत्राचा विषय होता, 'नोकरी देणाऱ्यांच्या अपेक्षा'. श्री. आर. एम्. निर्मल (पर्सोनेल मॅनेजर टेल्को), श्री. शंकरराव खरात (माजी उपकुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ), प्रा. गौतम सेन (विभागप्रमुख, संरक्षण विद्यापीठ) आणि श्री. एन्. जी. देशपांडे (ॲडमिनीस्ट्रेटीव्ह इक्झिक्यूटिव्ह, इंडो स्वे इंजिनीअरींग) या तज्ज्ञ व्यक्तींनी हे बहुमोल मार्गदर्शन केले.

**सत्र सहावे :** ६ मार्च १९८३ रोजी 'Energy; Crisis and Dilemma' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. तृतीय वर्षाच्या १८ विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. या चर्चा सत्राचे संयोजन प्रा. क. म. गोखले यांनी केले.

**(६) अभ्यासविषयक वक्तृत्व-स्पर्धा :** भारतीय भौतिकी संघटना (पुणे शाखा) यांच्यातर्फे ७ व ८ मार्च १९८३ रोजी व्याख्यान-स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या सहा मुलांनी भाग घेतला. श्री. रविशंकर आणि श्री. सु. गो. जोशी या आमच्या विद्यार्थ्यांनी त्यात अनुक्रमे पहिले व दुसरे बक्षीस मिळविले. तसेच श्री. अ. श्री. गोरे यांस उत्तेजनार्थ प्रमाणपत्र मिळाले. प्रा. अ. वा. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

(७) **निरोप :** १४ मार्च १९८३ रोजी तृतीय वर्ष शास्त्रच्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष शास्त्रच्या विद्यार्थ्यांतर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला.

संघटनेच्या कामात ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांची शास्त्र संघटना आभारी आहे.

**चं. गु. कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

## वाणिज्य–संघटना

वाणिज्यसंघटनेचा १९८२–८३ मधील कार्यक्रमांचा अहवाल सादर करण्यास आनंद होत आहे. या वर्षासाठी खालीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.

अध्यक्ष : प्रा. माधवी मित्र.
प्राध्यापक सल्लागार : प्रा. पी. सी. मुथा, प्रा. भारती डोळे, प्रा. प्रेमा आगाशे.
विद्यार्थी प्रतिनिधी : यू. एम्. शेख, अशोक रानडे, संतोष शर्मा, देवदत्त पाठक, उर्मिला उंडे, विद्या गांधी, संगीता पोटफोडे, संगीता येरवडेकर, मनीषा जोशी, सुहास साठे, कुमार लाखाणी.

कार्यालयीन कामाची जबाबदारी श्री. दिलीप खोपकर यांनी समर्थपणे सांभाळली.

वाणिज्य संघटनेतर्फे या वर्षी खालीलप्रमाणे कार्यक्रम करण्यात आले—

**चर्चासत्र :** या वर्षी पुण्यामध्ये नवीन शेअर बाजाराची स्थापना करण्यात आली आहे. त्या निमित्ताने 'शेअर बाजाराची आर्थिक मदतीस मदत' या विषयावर पोस्ट ग्रॅज्युएट स्टुडंटस असोसिएशनच्या सहकार्याने चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. चोप्रा, संचालक टाईम्स इकॉनॉमिक स्टडीज डिव्हिजन, यांनी चर्चा-सत्राचे सूत्रचालन केले. श्री. योगेश शहा, उपाध्यक्ष पुणे शेअर बाजार, श्री. पटनी, अध्यक्ष, भागधारक संघटना, प्रा. प्रमोद पारखी, प्रा. कर्नावट यांनी चर्चेत भाग घेतला. प्रा. माधवी मित्र यांनी सुरुवातीस शेअर बाजारांचे कार्य व त्यांवरील आक्षेप यांचा आढावा घेऊन चर्चेसाठी काही मुद्दे सभेपुढे ठेवले. इतर काही प्राध्यापक व विद्यार्थी यांनीही चर्चेत भाग घेतला.

**शैक्षणिक भेटी :** या वर्षी विद्यार्थ्यांनी खालील औद्योगिक व व्यावसायिक संस्थांना भेटी दिल्या.
साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि.
टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह कं. लि.
मूर्ती चॉकोलेट फॅक्टरी.

**भित्तिपत्रक :** 'कॉम' या भित्तिपत्रकाचे या वर्षी दोनच अंक प्रकाशित झाले. यापैकी एक 'शेअर बाजार' विशेषांक होता. भित्तिपत्रकाच्या संदर्भात विद्यार्थी प्रतिनिधींनी अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे.

**प्रकल्प अहवाल स्पर्धा :** दरवर्षाप्रमाणे या वर्षीही प्रकल्प अहवाल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या दहा गटांनी भाग घेऊन दहा विविध विषयांवरील प्रकल्प अहवाल सादर केले. डॉ. दिलीप सरवटे, व्यवस्थापन सल्लागार व प्रा. अ. गो. गोसावी यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांचे मनःपूर्वक आभार. खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात आली—

प्रथम पारितोषिक : 'ब्यूटी पार्लर'
सुजाता दातार, राजश्री भागवत.

द्वितीय पारितोषिक : 'रस्त्यावरील जाहिराती'
मिलिंद पंडित, अशोक रानडे, एस. आरावकर, संजय कात्रा.

तृतीय पारितोषिक : 'पी. एम. टी. तोट्यात का ?'
विवेक भालेराव, संतोष शर्मा, चंद्रशेखर कराडकर, सुनील पितळे.

**निबंधस्पर्धा :** कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली. दरवर्षीपेक्षा यंदा प्रतिसाद कमी मिळाला. फक्त ६ निबंध स्पर्धेसाठी लिहिले गेले. प्रा. सीताराम रायकर व प्रा. सु. ग. दातार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले व खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात आली.

प्रथम पारितोषिक : कोणासही नाही. द्वितीय पारितोषिक : मीना देशपांडे. तृतीय पारितोषिक : ज्योती मुथा.

परीक्षकांचे मनःपूर्वक आभार.

**व्यवसाय व नोकरी मार्गदर्शन शिबीर :** तृतीय वर्षातील शास्त्र, कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी शास्त्रसंघटनेच्या सहकार्याने व्यवसाय मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. त्यात नोकरीसाठी अर्ज कसा करावा, सामान्यज्ञान आणि बुद्ध्यंक दर्शविणाऱ्या चाचण्यांसाठी तयारी कशी करावी, मुलाखतीस जाताना काय काळजी घ्यावी, स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असल्यास कोण कोणती मदत बँका आणि इतर संस्थांकडून मिळू शकते, इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कॉलेजमधील प्राध्यापकांखेरीज श्री. शंकरराव खरात, श्री. गौतम सेन, श्री. ए. आर. बोर्डे, श्री. ए. जी. भावे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, त्याबद्दल वाणिज्यसंघटना त्यांची ऋणी आहे.

**तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप :** संघटनेतर्फे दरवर्षी प्रमाणे या वर्षीही तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दर्शविण्याचा आणि निरोप देण्याचा कार्यक्रम करण्यात आला.

वरील सर्व कार्यक्रमांसाठी ज्या सर्वांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**माधवी मित्र**
कार्याध्यक्ष

## माजी विद्यार्थी संघटना

मॉडर्न महाविद्यालय, माजी विद्यार्थी संघटनेच्या, १९८२–८३ या वर्षात एकूण दोन प्रातिनिधिक सभा अनुक्रमे दिनांक २९-७-८२ आणि दिनांक ६-१-८३ रोजी झाल्या.

दिनांक ६ जानेवारी १९८३ रोजी झालेल्या सभेत दिनांक २६ जानेवारी १९८३ रोजी माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळावा घेण्याचे ठरले व त्याची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

दिनांक २६ जानेवारी १९८३ रोजी सकाळी ८॥ वाजता माजी विद्यार्थी मेळावा ग्रंथालयात संपन्न झाला. या प्रसंगी परस्पर–परिचय, अल्पोपाहार आणि चित्रपट इत्यादी कार्यक्रम पार पडले. मेळाव्यास सुमारे १५० विद्यार्थी आणि बहुतांश शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**प्रा. मुकुंद महाजन**

## साहित्य–संघटना

साहित्य संघटनेच्या कार्याचा शुभारंभ १ ऑगस्ट १९८२ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या दिवशी श्री. भा. द. खेर यांच्या व्याख्यानाने झाला.

यंदा साहित्य संघटनेने कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी वर्गासाठी साहित्यिक कला-गुणांचा विकास व्हावा म्हणून 'लो. टिळक' निबंध–स्पर्धा आयोजित करून एक नवा उपक्रम सुरू केला.

एकूण ३४ विद्यार्थ्यांनी त्यात भाग घेतला होता व पुढीलप्रमाणे पारितोषिके मिळविली—

१ ) कु. मेधा महाजन ( १२ वी एच ) प्रथम पारितोषिक.

२ ) कु. साधना शेंडे ( ११ वी आय ) द्वितीय पारितोषिक.

३ ) कु. अमिता खोत ( ११ वी जी ) तृतीय पारितोषिक.

४ ) सीमा ठोमरे ( १२ वी ए ) उत्तेजनार्थ.

५ ) कु. सुषमा कुलथे ( ११ वी एच ) उत्तेजनार्थ.

सोमवार दि. २५ ऑगस्ट १९८२ रोजी 'टिळक आणि आगरकर' नाटकावर कलामंडळाच्या सहकार्याने परिसंवाद आयोजित करण्यात आला.

'हिन्दी – दिन' हा दिनांक १४–९–१९८२ रोजी अतिशय उत्तम तऱ्हेने साजरा झाला. श्री. उमरणीकर यांनी 'हिन्दी और भारतीय भाषाऐं' या विषयावर आपले विचार प्रगट केले.

'मानसशास्त्र' विभागातर्फे येरवडा येथील सरकारी मनोरुग्णालयास भेट. श्री. महेशकर यांनी मनोरुग्णासंबंधी माहिती सांगून वेगवेगळ्या प्रकारचे मनोरुग्ण विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष दाखविले.

'कामायनी' मतिमंद मुलांच्या शाळेस भेट, 'कामायनी'च्या इमारत निधीसाठी विद्यार्थ्यांनी तिकिटे खपविली व आपली सामाजिक बांधिलकीची जाण प्रकट केली.

मराठी विभागाच्या सहाय्याने यंदा तृतीय वर्ष कला विद्यार्थ्यांसाठी खालील कार्यक्रम सादर करण्यात आले :

डॉ. सुरेश धायगुडे यांचे 'कर्मयोग' या विषयावर व्याख्यान. 'ज्ञानेश्वरीच्या तिसरा अध्यायावर चर्चासत्र', अध्यक्ष : डॉ. वि. भा. देशपांडे. निबंध वाचक : कु. सुनिता माळी, सविता सबनीस, सीमा कुलकर्णी, ज्योती गिरमे, विनिता भावे, प्रतिभा गुळुमकर, संजीवनी कुलकर्णी–सर्व तृ. व. कला विद्यार्थिनी. 'भाऊसाहेबांची कैफियत' चर्चासत्र–अध्यक्षा : सौ. निर्मला मोने, निबंधवाचक–सुनिता माळी, ज्योती गिरमे, संजीवनी कुलकर्णी, सीमा कुलकर्णी, सीमा सदलगे, मालन प्रभुदेसाई, मनीषा बर्डे, सविता सबनीस, अन्नपूर्णा गोडसे, मंगला बारसकर, वरील तिन्ही कार्यक्रमांचे संयोजन डॉ. द. दि. पुंडे यांनी केलेले होते. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

गुरुवार दि. १७ मार्च १९८३ रोजी साहित्य संघटनेच्या द्वितीय वर्ष बी. ए. च्या वर्गातील विद्यार्थ्यांमार्फत बी. ए. च्या शेवटच्या सत्रातील विद्यार्थ्यांसाठी निरोप व शुभेच्छा-समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी तृ. व. कला शाखेतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास ग्रंथालयातील "पित्ती सभागृहासाठी" एक घड्याळ भेट दिले.

साहित्य संघटनेच्या सर्व कार्यक्रमांत यंदा विद्यार्थीवर्गाचा उत्साह व सहकार्य प्रकर्षाने दिसून आला.

**म. आ. कुलकर्णी**, कार्याध्यक्ष.

## पदभ्रमण मंडळ

आपल्या महाविद्यालयाच्या पदभ्रमण मंडळाने या वर्षी स्पृहणीय कामगिरी केली.



पदभ्रमण मंडळ कळसूबाई शिखरावरून उतरताना ...

गतवर्षी आपल्या महाविद्यालयाने पार पाडलेली पदभ्रमणे तसेच गत वर्षांच्या विद्यापीठीय पदभ्रमणातील आपल्या महाविद्यालयाचा सहभाग बघून, पुणे विद्यापीठातल्या विकेंद्रीकरण उपक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयास संघवी केशरी महाविद्यालय, चिंचवड आणि कला आणि वाणिज्य महाविद्यालय, हडपसर यांचे नेतृत्व सोपविले होते.

या उपक्रमाच्या अंतर्गत आपल्या महाविद्यालयाने दि. २७–१२–१९८२ ते दि. २–१–१९८३ या काळात कळसूबाई ते हरिश्चंद्रगड हे पदभ्रमण आयोजित केले. या पदभ्रमणात आपल्या महाविद्यालयाच्या ३० आणि अन्य महाविद्यालयांच्या १० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या पदभ्रमणाचे नेतृत्व उपप्राचार्य श्री. सीताराम रायकर यांनी केले.

याशिवाय १९८२–८३ या वर्षात आपल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खालील पदभ्रमणे आयोजित करण्यात आली व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रतिसाद देऊन ती यशस्वी केली.

| दिनांक | पदभ्रमण | सहभागी झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| १५–७–१९८२ | वाघदरी व नागफणी (Duke's Nose a Tiger's Leap) | २२ विद्यार्थी व २४ विद्यार्थिनी |
| १५–८–१९८२ | पुरंदर | २५ विद्यार्थी व ५ विद्यार्थिनी |
| १९–९–१९८२ | तिकोना | २५ विद्यार्थी व ६ विद्यार्थिनी |
| ६ ते ८ नोव्हें. १९८२ | पेब किल्ला व माथेरान | ५० विद्यार्थी व २५ विद्यार्थिनी |
| २० व २१ नोव्हें. १९८२ | सिंहगड-राजगड–तोरणा | १६ विद्यार्थी व ६ विद्यार्थिनी |

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. यशोधन बाळ व कु. अंजली बिद्रे यांनी यूथ होस्टेल्सतर्फे लिंगाण्याचा एक अत्यंत अवघड सुळका सर केला. त्यांचे विशेष अभिनंदन.

पदभ्रमण मंडळाचे सर्व उपक्रम यशस्वी करण्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**प्रा. रायकर,**
**प्रा. गोहेल**

## प्राध्यापक अभ्यासमंडळ

अभ्यासमंडळातर्फे पहिल्या सत्रात ( १ ) डॉ. अशोक पाथरे यांचे 'महाराष्ट्रातील लघु उद्योगधंदे' या विषयावर व ( २ ) प्रा. सौ. सुधा शाळिग्राम यांचे 'मानसिक स्वास्थ्य' या विषयावर व्याख्यान व चर्चा असा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी अनुक्रमे ( १ ) किर्लोस्कर कमीन्सचे आर्थिक सल्लागार डॉ. एस्. एस्. मुतालिकदेसाई व ( २ ) पुणे विद्यापीठातील मानसशास्त्र या विषयाचे प्रपाठक डॉ. सी. जी. देशपांडे हे होते.

दुसऱ्या सत्रात : ( १ ) डॉ. हेमंत घाटे यांचे 'पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम' या विषयावर व्याख्यान व चर्चा व ( २ ) प्रा. अरविंद मंगरूळकर यांचे 'शाकुंतलातील काही मर्मस्थळे' या विषयावर व्याख्यान व चर्चा झाली.

डॉ. पाथरे व डॉ. घाटे यांना पुणे विद्यापीठाकडून पीएच्. डी. ही पदवी मिळाल्याबद्दल शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच 'एम्. फिल्' ही पदवी प्रथम श्रेणी मिळाल्याबद्दल भूगोल विभागाच्या कु. नयना कारखानीस व प्रा. वाल्मीक अहिरराव यांचाही सत्कार करण्यात आला.

**भीमराव कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

## GYMKHANA REPRESENTATIVES
## ( SENIOR COLLEGE )

| Sr No. | Class | Division | Name of the Gymkhana Representative |
|---|---|---|---|
| 1. | F. Y. B A. | | Shinde S. G. – Hockey |
| 2. | F. Y. B. Sc. | A | Pore M. R. – Basket ball |
| 3. | F. Y. B. Sc. | B | Bhat H. V. – Foot ball |
| 4. | F. Y. B. Com. | A | Kathavate S. K. – Wrestling |
| 5. | F Y. B. Com. | B | Chaudhari R. A. |
| 6. | F. Y. B. Com. | C | Pisal T. B. |
| 7. | S. Y. B. A. | | Miss Thite S. C. – I. C. S. R. ( Ladies ) |
| 8. | S. Y. B. Sc. | A | Gandhi M. R. |
| 9. | S Y. B. Sc. | B | Relekar P. A. – Cricket |
| 10. | S. Y. B. Com. | A | Bhosale P. S |
| 11. | S. Y. B Com. | B | Pisal R. C. – I. C. S. R. ( Gents ) |
| 12. | S. Y. B. Com. | C | Badve R. A – Volley ball |
| 13. | T. Y. B. A | | Inamdar M. G. – Indian Games |
| 14. | T. Y. B. Sc. | | Walunj B. D. – Minor Games – II |
| 15. | T. Y. B. Com. | A | Renake V. A. – Minor Games – I |
| 16. | T. Y. B. Com. | B | Bal Y. D. – Athletics |
| 17. | T. Y. B. Com. | C | Rathi D. M. |

## CLASS REPRESENTATIVES
## ( SENIOR COLLEGE )

| Sr.No. | Class | Division | Name of the Class Representativ |
|---|---|---|---|
| 1. | F. Y. B. A. | | Kamble V. S. |
| 2. | F. Y B Sc. | A | Pathak A. P. |
| 3. | F. Y. B. Sc. | B | Nagarkar S. K. |
| 4. | F. Y. B. Com. | A | Sathye S. R. |
| 5. | F. Y. B. Com. | B | Patole B. V. |
| 6. | F. Y. B. Com. | B | Bhosale S. A. |
| 7. | S. Y. B. A. | | Tupare G. R. |
| 8. | S. Y. B. Sc. | A | Mahajan M. S. |
| 9. | S. Y. B. Sc. | B | Konde A. J. |

| Sr.No. | Class | Division | Name of the Class Representative |
|---|---|---|---|
| 10. | S Y. B Com. | A | Vedpathak A M. |
| 11. | S. Y. B. Com. | B | Nerlekar D. R. |
| 12. | S. Y B. Com. | C | Agarwal R B. |
| 13. | T. Y. B A. | | Dindorkar U. W. |
| 14. | T. Y. B. Sc. | | Deo P. R. |
| 15. | T. Y. B. Com. | A | Oswal V. S. |
| 16. | T. Y. B. Com. | B | Jain A. B. |
| 17. | T. Y. B Com. | C | Shaikh S. H. |
| 18 | M. Com. Part–I | | Dadhe S. S. |
| 19. | M. Com. Part–II | | Kothavade R. E. |

## CLASS REPRESENTATIVES
## ( JUNIOR COLLEGE )

| Sr No. | Class | Division | Name of the Claas Representative |
|---|---|---|---|
| 1. | XI–Arts | A | Miss Sane M. K. |
| 2. | XI-Arts | B | Dorge S. K. |
| 3. | XI–Science | C | Pathak A. B. |
| 4. | XI–Science | D | nominated |
| 5. | XI–Science | E | Joshi S. A. |
| 6. | XI-Science | F | Oswal R. G. |
| 7. | XI-Commerce | G | Murthy S. S. |
| 8. | XI-Commerce | H | Sanas U. M. |
| 9. | XI-Commerce | I | Shah H. K. |
| 10. | XI–Commerce | J | Avachat A. L. |
| 11. | XII-Arts | A | Yadav R. V. |
| 12. | XII-Arts | B | Domale B. M. |
| 13. | XII-Science | C | nominated |
| 14. | XII–Science | D | Chaudhari N. M. |
| 15. | XII-Science | E | Kulkarni N. S. |
| 16. | XII-Science | F | Bhosale A. P. |
| 17. | XII–Commerce | G | Bhandari R. H. |
| 18. | XII-Commerce | H | Bhilare S. B. |
| 19. | XII-Commece | I | Kokate P. S. |
| 20. | XII-Commerce | J | Kamble V. B. |

# १९८२–८३ सालातील विविध पारितोषिकांचे मानकरी

## प्राध्यापक-निधी पारितोषिके

| | |
|---|---|
| कु. संसारे नीता सूर्यकान्त | अकरावी साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| नवाथे उमेश गजानन | अकरावी शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. शिरगावकर उषा नीळकंठ | अकरावी वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. सहस्रबुद्धे रेखा विष्णू | बोर्डाच्या १२ वी साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| रासने रणजीत भास्कर | बोर्डाच्या १२ वी शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. गांधी विद्या दीपचंद | बोर्डाच्या १२ वी वाणिज्य परीक्षेत महाविद्यलयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. ज्ञानसागर मीना श्रीधर | प्रथम वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. चिरपुटकर शुभांगी रामचंद्र | प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. आडवी सुजाता हनुमन्त | प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. चावरे शुभदा जयन्त | द्वितीय वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. कानविन्दे अर्पणा मुरलीधर | द्वितीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. भट जयश्री माधव | द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| सौ. गन्धे माधवी प्रकाश | तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| वेल्हे अविनाश गजानन | तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यलयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| दाते मिलीन्द भालचन्द्र | तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| कु. गोटखिन्डी विद्या शंकर | एम. कॉम. भाग–१ परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. |
| भिडे संजय नीलकंठ | एम. कॉम. भाग–२ परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. |

## देणगीतून दिलेली पारितोषिके

**श्रीमती सावित्रीबाई यशवन्त सुकटनकर पारि.**

| | |
|---|---|
| रासने रणजीत भास्कर | बोर्डाच्या १२ वी परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल |
| **कै. प्रा. अश्विनीकुमार फडके पारि.** | बोर्डाच्या १२ वीच्या परीक्षेत गणित विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. |
| सोंडूर किरण मुकुंदराव | १२ वी शास्त्र परीक्षेत |
| साठे नितीन हिंमतलाल | ,, |
| जुन्नरकर राजेंद्र निवृत्तीनाथ | ,, |
| कु. फणसळकर सुचित्रा श्रीराम | १२ वी वाणिज्य परीक्षेत. |
| **प्रकाश भागवत पारि.** | |
| विशाळ मिलींद माधव | बी. एस्सी. परीक्षेत फिजिक्स विषयामध्ये महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. |
| **वासुदेव व्यंकटेश पारि.** | |
| सौ. गन्धे माधवी प्रकाश | विद्यापीठाच्या बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. |

**नारायणराव भागवत पारि.**

कु. चिरपुटकर शुभांगी रामचंद्र — विद्यापीठाच्या प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत गणित विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

**वासुदेव व्यंकटेश पंडित पारि.**

सौ. गन्धे माधवी प्रकाश — पुणे विद्यापीठाच्या बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

बेल्हे अविनाश गजानन — पुणे विद्यापीठाच्या बी. एस्सी. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

दाते मिलिन्द भालचंद्र — पुणे विद्यापीठाच्या बी. कॉम. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

**सौ. लक्ष्मीबाई ताटके पारि.**

कु. चिरपुटकर शुभांगी रामचंद्र — विद्यापीठाच्या प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत गणित विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

**चंद्रकांत मोरेश्वर शिंदे पारि.**

ढब्बू चंद्रशेखर वीरभद्र — विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत संख्याशास्त्र या विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

**मातोश्री मुळाबाई कर्नावट पारि.**

दाते मिलिन्द रामचंद्र — विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स अकौंटिंग व ऑडिटिंग ह्या विषयात महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

**माई भिडे पारि.**

बेल्हे अविनाश गजानन — विद्यापीठाच्या बी. एस्सी. परीक्षेत रसायन विषयात महाविद्यालयात सर्वात जास्त गुण मिळाल्याबद्दल.

**अश्विन पुंडलिक आंतरमहाविद्यालयीन काव्यस्पर्धा**

श्री. शुक्ल जयकिशोर — आंतरमहाविद्यालयीन काव्यस्पर्धेमध्ये पहिल्या उत्कृष्ट कविता लिहिणाऱ्या विद्यार्थी कवीस.

**कै. श्री. शंकर शेलार सेवा पारि.**

श्री. केसकर राजेंद्र — लागोपाठ दोन वर्षे एन. एस. एस. मध्ये भाग घेणाऱ्या व तृतीय वर्ष कला विभागात शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यास.

**माजी विद्यार्थी पारितोषिक**

सौ. गन्धे माधवी प्रकाश — विद्यापीठाच्या बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

बेल्हे अविनाश गजानन — विद्यापीठाच्या बी. एस्सी. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

दाते मिलिंद भालचंद्र — विद्यापीठाच्या बी. कॉम. परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल.

**दामोदर ट्रॉफी**

कु. कुलकर्णी सीमा मधुकर — महाविद्यालयात १९८२–८३ सालातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी.

## राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | कु. केसरी स. प्र. | ११ वी सायन्स |
| २) | श्री. दिवेकर. प्र. ब. | ,, |
| ३) | ,, कल्याणकर अ. पां. | ,, |
| ४) | ,, लोहोकरे श. सु. | ,, |
| ५) | कु. पवार व. पा. | ,, |
| ६) | ताम्हणकर सं. गो. | ,, |
| ७) | ,, शिर्के ध शि. | ,, |
| ८ | कु. नातू मं. व. | ,, |
| ९) | श्री. झावरे सु. धों. | ,, |
| १०) | कु. मुथा ज्यो. त. | ११ वी कॉमर्स |
| ११) | ,, श्रोत्री हे. ज. | ,, |
| १२) | श्री. बोराडे वि. म. | १२ वी सायन्स |
| १३) | ,, डोंगरे. कै. रा. | ,, |
| १४) | कु. फिरोदिया इं. मा. | ,, |
| १५) | श्री. जोग श्री. र. | ,, |
| १६) | कु. शेख र. अ. | ,, |
| १७) | ,, शुक्ल रा. वि. | ,, |
| १८) | ,, शिरगांवकर उ. नि. | १२ वी कॉमर्स |
| १९) | ,, मोरे शा. ह. | एफ. वाय. बी. एस्सी. |
| २०) | ,, रावत अं. सु. | ,, |
| २१) | ,, शेवाळे नि. चं. | ,, |
| २२ | ,, भागवत रा. गो. | एफ. वाय. बी. कॉम. |
| २३) | ,, पोटफोडे सं. बा. | ,, |
| २४) | ,, चिरपुटकर शु. रा. | एस. वाय. बी. एस्सी. |
| २५) | ,, गानू सु. य. | एस. वाय. बी. कॉम. |
| २६) | श्री. घारे म. र. | ,, |
| २७) | कु. करमरकर वा. पां. | टी. वाय. बी. एस्सी. |
| २८) | ,, केदारी ज्यो. बा. | टी. वाय. बी. कॉम. |
| २९) | ,, रणदिवे शु. भा. | ,, |
| ३०) | ,, गोडखिंडी वि. शं. | एम. कॉम. पार्ट २ |
| ३१) | श्री. दाते मि. भा. | एम. कॉम. पार्ट १ |

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. इनामदार ज. मे. | ११ वी सायन्स |
| २) | कु. जाधव क. बा. | ,, |
| ३) | ,, कुलकर्णी शै. बा. | ,, |
| ४) | श्री. कुडाळकर प्र. द. | ,, |
| ५) | ,, लोणकर ग. शि. | ,, |
| ६) | ,, तांबोळी श. मि. | ,, |
| ७) | झेंडेपाटील वि. ह. | ,, |
| ८) | श्री. भोजवानी म. ना. | ११ वी कॉमर्स |
| ९) | कु. खोले के. अ. | १२ वी सायन्स |
| १०) | श्री. उदास गि. पु. | एफ्. वाय. बी. एस्सी. |
| ११) | ,, पलांडे सु. शि. | एस्. वाय. बी. एस्सी. |
| १२) | ,, गोरडे शि. बा. | टी. वाय. बी. एस्सी. |
| १३) | ,, गोरडे वि. का. | ,, |
| १४) | कु. काळे ज्यो. वि. | ,, |
| १५) | ,, कणसे सु. अ. | ,, |
| १६) | ,, लेणे शैलजा वि. | टी. वाय. बी. कॉम. |

## राज्यसरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | कु. सापटणेकर मं. वि. | ११ वी सायन्स |
| २) | कु. पाटणकर कि. ह. | १२ वी सायन्स |
| ३) | श्री. भोसले वि. गे. | एफ्. वाय. बी. एस्सी. |
| ४) | कु. शिंदे नी. व. | ,, |
| ५) | ,, थोरात उ. सी. | ,, |
| ६) | ,, गांधी वि. दी. | एफ्. वाय. बी. कॉम. |
| ७) | ,, वेर्णेकर सु. रा. | ,, |
| ८) | ,, वाळुंज. अ. गे. | एफ. वाय. बी. ए. |
| ९) | ,, चावरे शु. ज. | टी. वाय. बी. ए. |
| १०) | ,, कुलकर्णी सी. म. | ,, |
| ११) | ,, छत्रे र. स. | टी. वाय. बी. एस्सी. |
| १२) | ,, देशमुख क. शा. | ,, |

## १. भारत सरकारची हिंदी शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | कु. पंढरपुरे अ. चिं. | एफ्. वाय. बी. ए. |
| २) | ,, चव्हाण प्रे. विठ्ठल | एस्. वाय. बी. ए. |
| ३) | ,, सबनीस स. ज. | टी. वाय. बी. ए. |

राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती : ग्रामीण विभागातून येणाऱ्या हुषार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी.

| | | |
|---|---|---|
| १) | कु. तगारे शु. कु. | टी. वाय. बी. ए. |

## प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती

१) कु. वैशंपायन स. वि. — एफ्. वाय. बी. एस्सी.
२) ,, जोशी हे. प्र. — टी. वाय. बी. एस्सी.
३) ,, कुलकर्णी अ. गो. — ,,

## पब्लिक स्कूल स्कॉलरशिप

१) श्री. दर्ये म. वि. — १२ वी सायन्स
२) ,, तुपे अ. बा. — ,,

## राष्ट्रीय प्रज्ञाबोध शिष्यवृत्ती

१) श्री. दाढे सु. श्री. — एम. कॉम. पार्ट १

## श्री साईबाबा संस्थान शिर्डी शिष्यवृत्ती

१) कु. कुलकर्णी शै. वा. — ११ वी सायन्स
२) ,, देशपांडे सं. र. — १२ वी कॉमर्स
३) श्री. पानमंद द. कृ. — टी. वाय. बी. ए.

## ई. बी. सी. शिष्यवृत्ती (कनिष्ठ महाविद्यालय)

१) कु. रासकर सु. ब. — ११ वी आर्टस
२) श्री. इनामदार ज. म. — ११ वी सायन्स
३) कु. वामणे ल. ल. — ,,
४) ,, सुर्वे उ. ना. — ११ वी कॉमर्स
५) ,, गटणे सु. कृ. — ,,
६) श्री. हडवळे अं. तु. — १२ वी सायन्स
७) ,, जोशी अ. शं. — ,,
८) ,, संकपाळ रा. शि. — ,,
९) ,, जाचक प्र. अ. — ,,
१०) कु. कडसकर सु. बा. — १२ वी कॉमर्स

## सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी-सवलत

१) श्री. भालेकर शैलेंद्र — १२ वी सायन्स
२) कु. जाधव ल. य. — ,,
३) ,, इनामदार सु. भा. — ,,
४) श्री. राणे राजेंद्र व. — ,,
५) ,, मुकुंद पंडित — एफ. वाय बी. एस्सी.
६) ,, भारद्वाज सं. का. — ,,
७) कु. जोगळेकर वं. रा. — एफ. वाय. बी. कॉम.
८) श्री. मिलींद पंडित — एफ. वाय. बी. कॉम.
९) ,, वायदंडे वि. ग. — ,,
१०) कु. बारसकर मं. रा. — टी. वाय. बी. ए.
११) ,,राणे छा. व. — टी. वाय्. बी. कॉम्.

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी – सवलत

१) कु. पाटील शा. रा. — ११ वी कॉमर्स
२) पेठे म. म. मा. — ,,
३) बोधनी शै. रा. — १२ वी आर्टस
४) पाटील वं. रा. — एफ्. वाय बी. कॉम
५) श्री. उग्नराव वि. बा. — ,,
६) ,, भोज सं. क. — एस्. वाय. बीएस्सी.
७) कु. पाटील व. रा. — एस्. वाय. बी. कॉम
८) श्री. फडतरे अ. अ. — ,,
९) ,, अच्युत दि. द. — टी. वाय. बी. एस्सी
१०) ,, भटेनरा रा. अ. — टी. वाय. बी. कॉम
११) ,, भैरवकर भा. के. — एम. कॉम. पार्ट २
१२) कु. शाह भा. र. — ,,

---

## ई. बी. सी. फी सवलत मिळणारे विद्यार्थी

कनिष्ठ महाविद्यालय – २९०.

वरिष्ठ महाविद्यालय – ४९०.

प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत. कनिष्ठ महाविद्यालय – ६६, वरिष्ठ महाविद्यालय – ९३.

एस्. एस्. सी. डी. एड्. शिक्षकांच्या मुलांन मिळणारी फी सवलत—

कनिष्ठ महाविद्यालय –७ वरिष्ठ महाविद्यालय –१७

## महाविद्यालयीन शिष्यवृत्ती

कनिष्ठ महाविद्यालय –७१ वरिष्ठ महाविद्यालय–१४०

## महाविद्यालयीन फी – सवलत

वरिष्ठ महाविद्यालय –४

भारतीय सरकारची शिष्यवृत्ती : ( मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ) कनिष्ठ महाविद्यालय १५०, वरिष्ठ महाविद्यालय १००.

महाराष्ट्र राज्य शासनाची फी सवलत ( मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ).

कनिष्ठ महाविद्यालय –४०, वरिष्ठ महाविद्यालय –२५.

• • •




Cover Printed by Trimurti Printing Agency